वर्ष तेरावे: अंक २ रा

# जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी
व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे मासिक

संपादक
डॉ. दत्ता देशकर
श्री. प्रवीण महाजन




## चिपळूण जल साहित्य सम्मेलन वृत्तांत

१३, १४, १५ जानेवारी २०१७











डॉ. दत्ता देशकर– सम्मेलनाची पार्श्वभूमी
समजाऊन सांगतांना




उद्घाटक श्री. अनंतराव गिते यांचे भाषण




स्वागताध्यक्ष श्री. रविंद्र वायकर उपस्थितांचे स्वागत करतांना




डॉ. अशोक कुकडे यांचा अध्यक्षीय समारोप

# जलसंवाद


भारतीय जलसंस्कृती मंडळ, औरंगाबाद पुरस्कृत

■ फज्र ब्रवारी २०१७

■ संस्थापक संपादक
डॉ. दत्ता देशकर
कै. प्रदीप चिटगोपेकर

■ वर्तमान संपादक
डॉ. दत्ता देशकर – ०९३२५२०३१०९
श्री. प्रवीण महाजन – ०९८२२३८०१११

■ मुखपृष्ठ व सजावट
अजय देशकर

■ अंतर्गत मांडणी व अक्षर जुळवणी
आरती कुलकर्णी

■ मुद्रण –
श्री. जे प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०

■ वार्षिक वर्गणी : ५०० /–
पंचवार्षिक वर्गणी : रू. २०००/–
दशवार्षिक वर्गणी : रू. ३५००

■ जाहिरातींचे दर
मलपृष्ठ क्र. ४ रू. १००००/–
वेष्टण पृष्ठ २ व ३ रू. ७५०० /–
आतील रंगीत पान रू. ५००० /–
आतील साधे पान रू. ३०००/–

या अंकाचे मूल्य : रू. ७०/–


## अनुक्रमणिका


- संपादकीय / ४
- जलदिंडी –जलसंस्कृतीचा जागर
  सौ. मनिषा दामले / ५
- संमेलनाचे उद्धघाटन / ८
- मुलाखत : नाम फाऊंडेशन
  सौ. स्नेहल जोशी / १४
- सत्र पहिले – निसर्गस्नेही जीवन पध्दती
  सौ. प्राची जोशी / १५
- सत्र दुसरे – कोकणातील जलसाठवणूक
  सौ. अंजली बर्वे / १९
- पाणी आणि ग्रामविकास
  श्री. धनंजय चितळे / २३
- कवी संमेलन
  श्री. अरूण इंगवले / २६
- फेरोसिमेंट टाकीचे प्रात्यक्षिक
  श्री. उल्हास परांजपे / २९
- सत्र तिसरे – कोकणातील पाणी आणि पर्यचन विकास
  श्री. धीरज वाटेकर / ३१
- सत्र चवथे – कोकणातील पाणी आणि औद्योगिकरण
  सौ. मनिषा दामले, सौ. चची जोशी / ३४
- सत्र पाचवे – जलसाक्षरता प्रचार आणि प्रसार
  श्री. मधुसूदन केतकर / ३८
- समारोप / ४१
- प्रमुख पाहुणे डॉ. मधवराव चितळे यांचे भाषण / ४३
- तरच विश्वात शोभूनी राहो!
  चिपळून येथील जल साहित्य संमेलनाचे संचित
  श्री. विनोद रापतवार/ ४७
- जलसाहित्य संमेलनातून जलप्रबोधनास चालना !
  डी. धीरज वाटेकर / ५०



जलसंवाद हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. दत्ता देशकर यांनी श्री.जे. प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० येथे छापून अे – २०१, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंटस, पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर हिल्स, पुणे – ४११०४५ येथे प्रसिध्द केले. संपादक डॉ. दत्ता देशकर
फोन : ०९३२५२०३१०९ Email : jalasamvad@gmail.com,

# संपादकीय

जलसंवादचे संपादक डॉ. दत्ता देशकर यांनी प्रस्तुत अंकाचे अतिथी संपादकत्व मजकडे सोपविले त्याबद्दल सुरवातीलाच मी त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो. मी अनेक वर्ष वार्ताहाराचे काम केलेले आहे पण आज माझेवर टाकलेली जबाबदारी त्यापासून पूर्णपणे भिन्न आहे. जलसंवादसारख्या पाणी विषयाला वाहिलेल्या मासिकाचे संपादकीय लिहिण्याचा मान मला मिळालेला आहे हे मी माझे भाग्य समजतो. या नवीन जबाबदारीचा एक भाग म्हणून सदर अंक वाचकांना सादर करतो.

१३, १४ व १५ जानेवारीला चिपळूण येथे १० वे जलसाहित्य सम्मेलन संपन्न झाले. या सम्मेलनाचा वृत्तांत देणे हे विशेष अंक म्हणून या अंकाचे प्रयोजन आहे. अशा प्रकारचे सम्मेलन मी प्रथमतःच अनुभवले. जल साहित्य सम्मेलनाबद्दल मी या आधीही ऐकले होते पण उपस्थित राहण्याचा योग मात्र प्रथमच आला. त्यामुळे पाणी या विषयावर सम्मेलन असते तरी कसे याबद्दल कुतूहल निश्चितच होते. पाणी हाही सम्मेलनाचा विषय असू शकतो असे आतापर्यंत वाटले नव्हते. एक संपूर्ण सम्मेलन घेण्याइतके पाणी या विषयाला पैलू असू शकतात याची जाणीवही नव्हती. पण या सम्मेलनाला उपस्थित राहिल्यानंतर मात्र पाणी या शब्दाची व्याप्ती काय असते याचे प्रत्यंतर आले. या तीनही दिवशी मी पूर्णपणे पाणी मय झालो होतो.

ज्या भागात असे सम्मेलन घेतले जाते त्या भागातचे पाणी प्रश्न काय आहेत याचा सुरवातीला मागोवा घेतला जातो व त्याला अनुसरुन चर्चा सत्रांची मांडणी केली जाते. या सम्मेलनात कोकणातील पाणी साठविण्यातील अडचणी, पाणी असूनसुद्धा कोकणातील औद्योगिकरणातील अडचणी, पर्यावरणाला अनुकूल अशी जीवन पद्धती व पाणी आणि पर्यटन विकास हे चार महत्वाचे मुद्दे चर्चेला घेण्यात आले होते. या वर मते मांडणारे विचारवंत महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकांणांहून आमंत्रित करण्यात आले होते. पाण्यासारखा अवघड विषय सुद्धा किती सोपा करुन मांडला जाऊ शकतो याची प्रत्येक वक्त्याने खबरदारी घेतल्यामुळे सर्व विषय श्रोत्यांच्या मनापर्यंत निश्चितच पोहेचू शकले. पुण्याचे डॉ. प्रमोद मोघे, डॉ. दि. मा. मोरे, डॉ. विश्वास येवले, श्री. सतीश खाडे, श्री. अभिजित घोरपडे, श्री. चेतन गोगावले, श्रीमती मंजूषा ओक, कोल्हापूरचे डॉ. अनिलराज जगदाळे, जळगावचे श्री. विनेद रापतवार, यांच्यासारख्या विचारवंतांचा या संदर्भात खास उल्लेख करावा लागेल. निव्वळ बाहेरचेच नव्हे तर खुद्द कोकणातील डॉ. चंद्रकांत मोगल, संजय यादवराव, श्री. विजय जोगळेकर, श्री. विनय महाजन, श्री. सतीश कामत यांनीही या संदर्भात आपले पडखड विचार व्यक्त केले.

उद्घघाटन सोहोळा व समारोप तर दृष्ट लागण्यासारखे झाले. श्री. अनंतराव गिते व श्री. रविंद्र वायकर यांनी राजकारण बाजूला ठेवून कोकण विभागात पाण्याचे संदर्भात काय केले जाऊ शकते याबद्दल बहुमोल विचार मांडले. आधी केले, मग सांगितले ही उक्ती सम्मेलनाध्यक्ष लातूरचे डॉ. कुकडे यांनी सार्थ ठरविली. लातूरने जलसंधारणात कशी आघाडी घेतली व भविष्यातील दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी काय प्रयत्न करण्यात आले याचा आढावा आपल्या भाषणात घेतला. डॉ. चितळेसाहेबांसारखे विचारवंत समारोपासाठी लाभले हे सम्मेलनाचे भाग्यच समजले पाहिजे. त्यांनी जलप्रश्न सोडविण्यासाठी कोकणाची भविष्यातील दिशा काय असावी याचे मार्मिक विवेचन केले.

या सम्मेलनातील दोन खुल्या मुलाखती तर आगळ्या वेगळ्या ठरल्या. नाम फाऊंडेशनचे प्रतिनिधी श्री. राजाभाऊ शेळके आणि त्यांचे सहकारी यांनी आपल्या मुलाखतीत नाम फाऊंडेशनने केलेल्या कार्याचा आढावा घेतला व कोकणात शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कशाप्रकारचे प्रयत्न केले जाणार आहेत याचे विवेचन केले. ज्यांनी कोकणच्या ग्रामीण विकासासाठी आपले आयुष्य व्यतीत केले असे डॉ. प्रसाद देवधर यांचीही मुलाखत खूपच बोलकी ठरली. पाणी या विषयावरील कविताही सम्मेलनाचे खास आकर्षण ठरले.

कोणत्याही सम्मेलनाचे यश मोजण्याचे चार निकष असतात. सम्मेलनातील चर्चा, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था व नियोजनातील व्यवस्थितपणा हे ते चार निकष होत. या चारही निकषात सम्मेलन आयोजकांना पैकीच्या पैकी गुण द्यावे लागतील इतके सुंदर आयोजन केल्या गेले त्यावद्दल संयोजकांचे अभिनंदन करतो.

डॉ. देशकरांनी अतिथि संपादकाची जी जबाबदारी माझेवर सोपविली त्याबद्दल पुन्हा त्यांचे आभार मानून माझे संपादकीय संपवितो.

**संजय झेंडे – अतिथि संपादक**

# जलदिंडी –जलसंस्कृतीचा जागर

**मनिषा सुनील दामले,चिपळूण**
**मो.९४०४१५८९१०**



सूत्रसंचालक

**जलदिंडी**
**शुक्रवार दिनांक १३.१.२०१७**
**वेळ सकाळी ९ वाजता**

चिपळूण नगरीत प्रथमच जलसाहित्य संमेलन आयोजित करण्यात आले. त्यामुळे जनमानसात या संमेलनाविषयी विशेष औत्सुक्य होते. या संमेलनाच्या आयोजना मागील संकल्पना सर्वदूर पोहचावी, जल साक्षरता व जल जागृती निर्माण व्हावी या हेतूने दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी सकाळी शहरातून जलदिंडी काढण्यात आली. या जलदिंडीमध्ये वाशिष्ठीसह अन्य पवित्र नद्यांचे जल असलेले कलश ठेवण्यात आले होते जलसाहित्य संमेलनाच्या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर चैतन्यमय वातावरण निर्मिती झाली. संमेलनाच्या उद्घाटन व समारोप समारंभास तसेच विविध सत्रांना उपस्थित राहून चिपळूणकरांनी दाद दिली.

“ झुळझुळ गाणे मंजुळवाणे
गात वाहती झरे
शिलोच्यातून झुरझुर येथे गंगाजल पाझरे ” !!

निसर्ग कवी माधवांनी अशा सुंदर शब्दात ज्या चिपळूण नगरीचं वर्णन केले आहे, त्या निसर्ग वैभवसंपन्न अशा चिपळूण नगरीत १० वे जलसाहित्य संमेलन दिनांक १३ ते १५ जानेवारी, २०१७ या कालावधीत पार पडले. जलसाहित्य संमेलन चिपळूणमध्ये प्रथमच होत असल्यामुळे वातावरण निर्मितीसाठी संमेलनाच्या उद्घाटनाच्या दिवशी म्हणजे दिनांक १३ जानेवारी रोजी सकाळी जलदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. दिंडीचा शुभारंभ सकाळी ९ वाजता लोकमान्य टिळक वाचन मंदिरामध्ये करण्यात आला. लोकमान्य टिळक स्मारक मंदिर संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब जाधव यांनी जलदिंडीतील पालखीचे पूजन केले आणि जलदिंडीस प्रारंभ झाला. भारतीय संस्कृतीची जोपासना नदीकाठावर झाली. मानवी जीवनातील नदीचे महात्म्य लक्षात घेऊन गंगा, यमुना, सिंधु, नर्मदा, अलकनंदा, तुंगभद्रा, कोयना, कृष्णा, घटप्रभा, गोदावरी या तसेच अन्य पवित्र नद्यांचे पाणी असलेले कुंभ या दिंडीत होते. हे पुष्पमालांनी सजवलेले जलकुंभ घेऊन जलदिंडी निघाली. याशिवाय मानससरोवर आणि पंपासरोवरातील जल असलेले कुंभ या दिंडीत ठेवण्यात आले होते. कोकणच्या



सौंदर्यात भर घालणाऱ्या बारमाही वाहणाऱ्या वाशिष्ठीचा जलकुंभ पालखीत होता. तर जगबुडी, सावित्री आणि शास्त्री यांचे जलकुंभ दिंडीत अग्रभागी होते. याशिवाय खास मक्केवरुन आणलेल्या झमझम सरोवराच्या जलाने भरलेला कुंभ दिंडीची शोभा वाढवित होता.

ढोल ताशाच्या गजरात जलकुंभांनी भरलेली दिंडी निघाली. पुढे लेझीमच्या तालावर नाचणारे विद्यार्थी दिंडीकडे चिपळूणकरांचे लक्ष वेधून घेत होते. नऊवारी साडी नेसून, फेटे घालून सजलेल्या एस.पी.एम.च्या विद्यार्थिनी दिंडीच्या अग्रभागी होत्या. त्यांच्या पाठीमागे एकेका शाळेचे व महाविद्यालयाचे विद्यार्थी –विद्यार्थिनी दिंडीची व्याप्ती वाढवित होते. थोडे मागे परांजपे मोतीवाले हायस्कूल, बांदल हायस्कूल, युनायेड स्कूल यांचे झांजपथक होते. त्यांच्या मागोमागच रमाई कॉलेजचे पथक होते. त्यांच्या हातात पाण्याचे महत्व विशद करणारे फलक होते. त्यापाठोपाठ आनंदराव पवार महाविद्यालयाचे लेझीम पथक सामिल झाले. त्यानंतर आलेले पागशाळेचे हरीत सेना पथकही लक्षवेधक ठरले. पाणी बचतीचा संदेश देणारा फलक झळकाविणारे आर.सी. काळे कॉलेजचा एनसीसीचा चमू जनप्रबोधनाची धुरा वाहताना दिसत होता. एस.पी.एम.शाळेचा ग्रुप जलचर आणि उभयचर प्राण्यांच्या मुखवट्यांआधारे जणुकाही या मूक प्राण्यांचे मनोगतच मांडत होता. या सर्व विद्यार्थ्यांच्या हातात असलेले फलक खूपच वेधक आणि अंर्तमुख करणारे होते

" दुष्काळाची संपविण्या आपत्ती
काळजीने वापरावी जलसंपत्ती "

" आस धरा कास धरा
पाणी बचतीचा ध्यास धरा "

" पाणी हे बहुमोल
नका करु मातीमोल"

" आता राबवु जलनीती
नको दुष्काळाची भिती"

या दिंडीत चिपळुणातील स्नेहवर्धिनी महिला मंडळ तसेच अन्य महिलावर्ग मोठ्यासंख्येने सहभागी झाला होता. "लोटिस्मा" कडून निघालेली जलदिंडी जुना–भैरी, नवा–भैरी, राऊत आळी, वडनाका, अण्णासाहेब खेडेकर स्टेडिअमला वळसा घालून आली. काही काळ नगरपालिकेसमोर दिंडी थांबली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना मानवंदना देत पुन्हा जोमाने निघाली. जलदिंडी पाहण्यासाठी चिपळूणकरांनी दुर्तफा गर्दी केली होती. एरव्ही धार्मिक पालखी पाहण्याची सवय असलेले नागरिक प्रथच वाशिष्ठी आणि सिंधू नदीचे जलकुंभ ठेवण्यात आलेली पालखी पाहत होते. उत्स्फूर्तपणे जलदिंडीत सहभागी होत होते. पालखीची धुरा वाहण्यासाठी लगबगीने धावपळ करणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती. जलदिंडीचा संपूर्ण मार्ग रांगोळ्यांनी सुशोभित करण्यात आला होता. स्वतःच्या घरी मंगलकार्य असल्याप्रमाणे प्रत्येक चिपळूणकर या दिंडीत उत्साहाने सहभागी होत होता.

चिंचनाक्यावर दिंडी आल्यानंतर चौकात झांजपथकाने उत्तम सादरीकरण केले. याठिकाणी मोठा समुदाय जमला होता. जलसंस्कृती मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पाण्याचे महत्व अधोरेखित करणारे घोषवाक्य असलेले स्टीकर्सचे वाटप या ठिकाणी केले. शहराच्या मध्यवर्ती भागातून बाजारपेठेतून निघालेली ही जलदिंडी



बसस्थानकाला वळसा घालून संमेलनस्थळी म्हणजे ब्राह्मण सहाय्यक संघ परिसरात उभारण्यात आलेल्या भंवरलालजी जैन नगरात दाखल झाली. लोटिस्माचे कार्याध्यक्ष प्रकाश देशपांडे, बापूसाहेब काणे,आप्पासाहेब जाधव आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी या जलदिंडीचे स्वागत केले. कार्यकर्ते मोठ्यासंख्येने यावेळी उपस्थित होते.

जल जीवन, जलपूजन, जल संचित, संजीवक असे हे पवित्र –जीवनदायी जल,जलकुंभ आणि अभूतपूर्व अशी दिंडी चिपळूणकरांनी अनुभवली.

## ।। श्रध्दांजली ।।



श्री प्रदीप मान्नीकर यांचे दिनांक २० जानेवारी २०१७ रोजी अकाली निधन झाल्याची दु:खद वार्ता आली आणि समस्त जल–परिवार जणू शोक सागरात बुडून गेला. सिंचन सहयोग, भारतीय जलसंस्कृती मंडळ, सरोवर संवर्धिनी, उर्जा सहयोग, जीओ फोरम, इंडीयन वॉटर वर्कस् असोसिएशन, इंस्टीट्यूशन ऑफ इंजीनिअर्स, जलसंवाद ह्या पाणी विकास कार्याशी संबंधीत संघटना आणि त्यांचे कार्यकर्ते व मान्यवर यांची औरंगाबादच्या मासिक पाणी कट्ट्यावर दिनांक ०४ फेब्रुवारी २०१७ रोजी विशेष सभा पार पडली. या सभेत श्री प्रदीप मान्नीकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आणि त्यांनी पार पाडलेल्या कार्याचे गौरवपूर्वक स्मरण करण्यात आले. श्री प्रदीप मान्नीकर यांचे जलसंपदा विभागातील एक कार्यकारी अभियंता म्हणून विशेष योगदान राहिले आहे. शासनाने त्यांची दुसऱ्या महाराष्ट्र जल–सिंचन आयोगात विशेषत्वाने नियुक्ती केली होती. या कार्यकाळात त्यांचे कार्यकौशल्य प्रकर्षाने दिसून आले. सिंचन आयोगाच्या निष्कर्षांची सुसूत्रपणे मांडणी करणे, त्यातील माहितीचे अनेक प्रकारे विश्लेषण करून ती अहवालात उपलब्ध करून देणे, अहवालाचे संगणकीकरण करणे या कार्यात त्यांचा विशेष सहभाग होता.

एक स्थापत्य अभियंता असूनही संगणकीय कामकाजात त्यांना मोठा रस होता. यात त्यांनी विशेष तज्ज्ञता मिळवली होती. आपल्या या तज्ज्ञतेचा लाभ त्यांनी जलसंपदा विभागास आपले कामकाज गतीशील व पारदर्शक बनविण्याचे कामी मोठ्या प्रमाणावर मिळवून दिला. त्यांनी अनेक संगणकीय आज्ञावली स्वप्रयत्नातून विकसित केल्या. जसे, सिंचन व्यवस्थापनासाठी विविध प्रकल्पांचे स्थिती दर्शक (बेंचमार्कींग) अहवालासाठी संगणकीकृत प्रणालीची निर्मिती आणि कार्यालयांच्या वापरासाठी विकसित केलेली ई–पत्रव्यवस्थापन (आवक–जावक) प्रणालीचा विशेष उल्लेख करावा लागेल. या त्यांच्या कामगिरीबद्दल राज्य शासनाच्या गतिमान प्रशासन अभियान स्पर्धेतील दुसरा राज्यस्तरीय पुरस्कार विभागास प्राप्त झाला, ही स्थापत्य अभियंत्यासाठी गौरवास्पद बाब म्हणावी लागेल.

सिंचन सहयोग औरंगाबाद या संस्थेचे सचिव म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले आहे व संस्थेचे उद्दीष्ट सफल करण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. पाणी परिवारातील सर्व संस्थांना त्यांच्या कार्याचे सदैव स्मरण राहील व त्यापासून प्रेरणा घेऊन या संस्था आपले कामकाज पुढे चालू ठेवतील. डी प्रदीप मान्नीकर यांना सदगती लाभो आणि त्यांच्या अकाली मृत्यूच्या धक्क्यातून सावरण्यास त्यांच्या पत्नी उज्ज्वलाताई तसेच कुटुंबियांना बळ मिळो, ही इश्वर चरणी प्रार्थना.

औरंगाबाद (प्र.द. वझे) दिनांक ०४–०२–२०१७
समस्त जल परिवार, सिंचन सहयोग, भारतीय जलसंस्कृती मंडळ, सरोवर संवर्धीनी, उर्जा सहयोग, जीओ फोरम, इंडीयन वॉटर वर्कस असोसिएशन, इंस्टीट्यूशन ऑफ इंजीनिअर्स, जलसंवाद

# संमेलनाचे उद्‌घाटन

**१० वे जलसाहित्य संमेलन, चिपळूण जि.रत्नागिरी  दिनांक १३ ते १५ जानेवारी,२०१७**
**उद्‌घाटन समारंभ**
**दिनांक १३ जानेवारी, २०१७**
**चिपळूण**

जिथे भूमी संपते आणि समुद्र सुरु होतो अशा भूमीस अपरान्त भूमी म्हणतात. वाशिष्ठी नदीच्या काठावर ऐतिहासिक व धार्मिक स्थळांच्या परिसरात वसलेली चिपळूण नगरी अपरान्त भूमीतील एक सुंदर नगरी. या भूमित शुक्रवार दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी सायंकाळी दहावे जल साहित्य संमेलन अतिशय उत्साही वातावरणात सुरु झाले. चिपळूण नगरीचेच नव्हे तर संपूर्ण कोकणाचे सांस्कृतिक कुलदैवत असलेल्या लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर या संस्थेने दहाव्या जलसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्याची जबाबदारी स्वीकारली होती. वाचनालय म्हणजे निव्वळ पुस्तक देवघेव नव्हे करणारे केंद्र नव्हे तर समाजापर्यंत ज्ञान नेलं पाहिजे. जमीन, माणसं, पाणी आणि अक्षर समजून घ्यावं या धारणेतून काम करणारी ही संस्था. चिपळूणच्या या वाचनालयाने यापूर्वी म्हणजे सन २०१२ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजनाची तर २०१४ मध्ये राज्यातील शंभर वर्ष पूर्ण झालेल्या ग्रंथालयांचे अधिवेशन आयोजित करण्याची जबाबदारी पार पाडली आहे. या संमेलनांच्या यशस्वी आयोजनाचा प्रभाव दहाव्या जलसाहित्य संमेलनात पदोपदी जाणवत होता.

चिपळूण शहरात मुख्य बसस्थानकाच्या मागील बाजूस असलेल्या ब्राह्मण सहाय्यक संघ परिसरात स्व.भवरलालजी जैन नगरीत दहावे जलसाहित्य संमेलन भरविण्यात आले होते. या नगरीत कृषी भूषण स्व.रजजित खानविलकर व्यासपीठ उभारण्यात आले होते. १३ जानेवारी रोजी सकाळी शहरातून



काढण्यात आलेल्या जलदिंडीमुळे आधीच वातावरण निर्मिती झालेली असल्यामुळे चिपळणूकर मोठ्यासंख्येने उद्घाटन समारंभास उपस्थित होते. त्याआधी भारतीय जलसंस्कृती मंडळ आणि लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर यांनी संयुक्तपणे चिपळूण परिसरातील १४ महाविद्यालयांमध्ये जलसाक्षरतेवर व्याख्याने आयोजित केली होती. भारतीय संस्कृतीची जोपासना नदीकाठावर झाली. मानवी जीवनातील नदीचे महात्म लक्षात घेऊन गंगा, यमुना,सिंधु, नर्मदा, अलकनंदा, तुंगभद्रा, कोयना, कृष्णा, घटप्रभा, गोदावरी या तसेच अन्य पवित्र नद्यांचे पाणी असलेले पुष्पमालांनी सजवलेले जलकुंभ व्यासपीठाजवळच ठेवण्यात आले होते. याशिवाय मानससरोवर आणि पंपासरोवरातील जल असलेला आणि वाशिष्ठीचा जलकुंभ याठिकाणी होता. जगबुडी, सावित्री आणि शास्त्री आणि खास मक्केवरुन आणलेल्या झमझम सरोवराच्या जलाने भरलेला कुंभ देखील होता. यासर्व जलकुंभांचे चिपळूणवासीयांनी सकाळी निघालेल्या जलदिंडीच्या निमित्ताने दर्शन घेतले होतेच.

उद्घाटन समारंभासाठी व्यासपीठावर केंद्रीय अवजड उद्योग मंत्री अनंतरावजी गिते, लातूरचे जलपुरुष डॉ.अशोकराव कुकडे,संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्रजी वायकर,आमदार सदानंदजी चव्हाण,भारतीय जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.दत्ता देशकर, लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर या संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब जाधव, कार्याध्यक्ष प्रकाशजी देशपांडे, मानद सचिव प्रकाशजी काणे, विनायक ओक आदि मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे कार्यवाह धनंजय चितळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्याची जबाबदारी स्वीकारली होती. ते संतसाहित्याचे अभ्यासक असल्याची प्रचिती वारंवार येत होती. योग्य ठिकाणी चपलख ओव्या आणि श्लोकांची पखरण करीत त्यांनी उद्घाटन समारंभाची ऊंची वाढविली. प्रांरभी प्रकाशजी देशपांडे यांनी प्रास्ताविकात कोकण भूमीचे वैशिष्ट्ये विशद करीत कोकणातील पाण्याच्या स्थितीचा थोडक्यात धांडोळा घेतला. जलसाक्षरतेसंदर्भात वाचनालयातर्फे आयोजित करण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. भारतीय जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.दत्ता देशकर यांनी जलसाहित्य संमेलन आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. संस्कृती जी निर्माण झाली, तिचा जो विकास झाला तो पाण्यामुळे झाला हे सर्वांना माहितच आहे. उत्तरोत्तर जो विकास होत चाललाय तो देखील पाण्यामुळे होतोय हे देखील आपल्या लक्षात आलय. पण या संस्कृतीचा विनाश होतो की काय इतकी आपण पाण्याची दुर्दशा करुन टाकली आहे. पाण्याचा अर्निबंध वापर, पाणी प्रदुषित करणे आणि पाण्यावर विविध संकटे आणणे हाच एक कलमी कार्यक्रम मानवाने हाती घेतलेला दिसतो आहे. त्यामुळे ही संस्कृती लयाला जाते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. हे जे मरणाचे संकट पाण्यावर येत चालले आहे त्याला आपण किती दूर नेऊ शकतो हे आता समाजाचं महत्वाचं काम आहे. ते अधिक चांगल्या पध्दतीने व्हावं यासाठी ज्येष्ठ जलतज्ञ डॉ.माधवराव चितळे यांनी सन २००२ मध्ये भारतीय जल संस्कृती मंडळाची स्थापना केली. या संस्थेतर्फे अशा स्वरुपाची संमेलने आयोजित करण्यात येत असतात. त्यानिमित्ताने स्थानिक पाणी प्रश्न, त्यांची व्याप्ती, उपाय या अनुषंगाने चर्चा होत असते. या चर्चेअंती निघालेले निष्कर्ष, उपाय आपण समाजासमोर, सरकारसमोर मांडत असतो. या संमेलनामध्ये देखील कोकणातील पाण्याच्या अनुषंगाने विषय घेण्यात आले आहेत. कोकणातील जिल्ह्यांमध्ये मध्ये धो धो पाऊस परंतू उन्हाळ्यामध्ये काही ठिकाणी पिण्यासाठी पाणी नसते. त्यामुळे कोकणामध्ये पाण्याची साठवण कशी करावी या विषयावर या संमेलनामध्ये स्वतंत्र सत्र आयोजित करण्यात आलं आहे. त्याच बरोबर पाणी आणि पर्यटन, पाणी आणि उद्योग, कोकणातील जल वाहतुक या विषयांवर देखील दोन दिवसांमध्ये चर्चा होणार आहे, असे डॉ.देशकर यांनी स्पष्ट केले. भारतीय जलसंस्कृती मंडळाच्या कार्यपध्दतीचा त्यांनी थोडक्यात परिचय करुन दिला. या जलसाहित्य संमेलनाचा उपयोग कोकणच्या पाणी



व्यवस्थापनासाठी व्हावा अशी अपेक्षा आमदार सदानंद चव्हाण यांनी व्यक्त केली. कोकणात पाऊस भरपूर पडतो. आपण पाणी साठविले देखील आहे, परंतू पिण्या व्यतिरिक्त पाण्याचे महत्व आपण जाणलेले नाही. या पाण्याचा उपयोग शेती, उद्योग यासाठी होऊन येथील तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात. यासाठी या जलसाहित्य संमेलनात मंथन व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

साधन संपत्तीचा अद्याप पर्याप्त उपयोग नाही – केंद्रीय मंत्री अनंतराव गिते

दहाव्या जलसाहित्य संमेलनाचे उद्घाटक केंद्रीय अवजड उद्योग मंत्री अनंतराव गिते यांचे यावेळी भाषण झाले ते म्हणाले : खरं म्हणजे सर्वप्रथम धन्यवाद दिले पाहिजेत लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराला. प्रामुख्याने प्रकाश देशपांडे आणि बापू काणे यांना सर्वाधिक धन्यवाद द्यायला हवेत. चिपळूणमध्ये झालेल्या साहित्य संमेलनाला मी उपस्थित होतो, ग्रंथालयांच्या शतक महोत्सवी अधिवेशनालाही उपस्थित होतो आणि या दहाव्या जलसाहित्य संमेलनालाही उद्घाटक म्हणून मी उपस्थित आहे. लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर आणि त्याची प्रकाश देशपांडे आणि बापू काणे ही दोन झपाटलेली माणसे यांच्यामुळेच हे तीनही कार्यक्रम चिपळूण मध्ये उत्तमरित्या पार पडले. साहित्य संमेलन तर आतापर्यंतच्या सर्व साहित्य संमेलनांमधले क्रमांक १ चे साहित्य संमेलन ठरले. या तीनही कार्यक्रमांसाठी मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. पाणी म्हणजे जीवन. मनुष्य, प्राणी आणि वनस्पती, किंबहुना सर्वांच्याच जीवनात पाण्याला अनन्यसाधारण महत्व आहे. इथे दत्ता देशकर यांनी जलसाक्षरतेचा उल्लेख केला. आज खरोखरच जलसाक्षरतेची गरज आहे. या संमेलनात तीन दिवस आपण त्यावर चर्चा करणार आहोत. माझ्या अनेक सभांमध्ये किंवहुना लोकसभतील माझ्या भाषणांमध्ये सुद्धा मी उल्लेख केला आहे की महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस कोकणात पडतो आणि पहिला टँकर सुद्धा कोकणणातच लागतो. ही वस्तुस्थिती आहे. धो धो पाऊस कोकणात पडतो आहे. निसर्गाने काही कमी केलेले नाही. पण निसर्गाने आपल्याला जे काही दिलं आहे त्याचा योग्य विनियोग आपण आजही करू शकलेलो नाही. म्हणून पाणी ही समस्या बनली आहे आणि ही समस्या हळूहळू सर्वांना भेडसावते आहे. अर्थात, ही समस्या संपूर्ण जगाकरता आहे. त्यामुळेच कदाचित या पुढची युद्ध ही पाण्यासाठी होतील. पाण्याचे एवढे महत्व असताना हे पाणी आपण किती वापरावं,कसं वापरावं यासाठी कायदे, नियम देखील आपण केले आहेत.







पण त्या कायदे आणि नियमांचे किती पालन आपण करतो आहोत? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळेच कायदे, नियम असूनही जलसाक्षरतेवर चर्चा करण्याची वेळ आज आपल्यावर येते आहे. सुदैवाने मला सलग सहावेळा कोकणाचे प्रतिनिधीत्व संसदेत करण्याची संधी मिळाली. ते करीत असताना देश फिरण्याची संधी मिळाली, जग बघण्याची संधी मिळाली. अनेक प्रगत राष्ट्र पाहाता आली. देशाच्या कानाकोपऱ्यात मी गेलो.सुदैवाने या वर्षी उशीरापर्यत चांगला पाऊस पडला. त्या आधीची सलग चार वर्षे महाराष्ट्रातील अनेक भागात दुष्काळ होता. मी एकदा लातुरला एका कार्यक्रमाच्या निमित्ताने गेलो होतो तेव्हा कळाले की लातूर शहरात आठवड्यातून एकदाच नळाला पाणी येते. तिथे जैन समाजाचे एक व्यापारी आहेत. ते मोठ्या प्रमाणात पाणीदान करतात. ज्या विहीरीवरून ते पाणीदान करतात त्या विहिरीवरही त्यांच्या बरोबर मी गेलो होतो, असे त्यांनी सांगितले.

दहावे जलसाहित्य स्व.भवरलालजी जैन नगरीत भरविण्यात आले होते. स्व.भवरलालजी जैन यांचे सुपुत्र आणि जैन उद्योग समुहाचे संचालक अभयजी जैन यांचे याप्रसंगी भाषण झाले. कोकणातील पाणी उपलब्धता आणि शेतीची प्रचलित पध्दत याविषयी त्यांनी निरीक्षणे नोंदविली. कोकणात पाऊस जास्त पडतो मात्र शेती करण्याची पारंपारिक पध्दत, आधुनिक तंत्रज्ञानाची कमतरता यामुळे अपेक्षित उत्पादकता वाढलेली दिसत नाही. सरासरी जमीन धारणा कमी, अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या जास्त ही समस्या देखील येथे आहे. झाडांना किंवा पिकांना पाणी न देता मुळांना पाणी देण्याचं तंत्र स्वीकारलं तर उत्पादकता वाढण्यास मदत होईल. कोकणसाठी आम्ही आंब्याची नवीन जात विकसित करण्यासाठी संशोधन करीत आहोत शिवाय आंब्यावर प्रक्रिया करणारा उद्योग कोकणात सुरु

करण्याचा आमचा मानस आहे अशी घोषणा अभयजी जैन यांनी व्यक्त केली.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्रजी वायकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. दहावे जलसाहित्य संमेलन रत्नागिरी जिल्ह्यात होतोय याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केल. यापूर्वी नऊ जलसाहित्य संमेलने राज्यातील विविध भागात झाली असतील, त्यावेळी तेथील समस्यांच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेचा गोषवारा संकलित करुन काही उपाययोजना अमलात आणण्यासाठी देखील प्रयत्न करण्याचे आवाहन रवींद्रजी वायकर यांनी केले.


दहाव्या जलसाहित्य संमेलनाचे अध्यक्षपद लातूरचे डॉ. अशोकराव कुकडे यांनी भूषविले. लातूरमधील भीषण पाणी टंचाईची प्रसिध्दी ! सर्वाधीक झाली. या जलसंकटचा संदर्भ आपल्या भाषणात प्रारंभीच घेत डॉ. कुकडे यांनी मनोगत व्यक्त केले. पाण्याशी संबंध प्रत्येकाचा असतो. योगायोगाने प्रत्यक्ष कामात उतरावे लागले. लातूरच्या पाणी प्रश्नासाठी मांजरानदीवर केलेल्या कामासंदर्भात त्यांनी अनुभव कथन केले. इच्छाशक्ती, पारदर्शी व्यवहार आणि संकल्पपूर्तीचा ध्यास असेल तर रचनात्मक कार्य उभे राहू शकते. इच्छाशक्ती वरिष्ठ पातळीपासून थेट खालच्यास्तरापर्यंत झिरपली पाहिजे असे त्यांनी सांगितले. उद्घाटन सोहळयाची सांगता लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराचे प्रकाशजी काणे यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

*****






# मुलाखत : नाम फाऊंडेशन



**मुलाखत घेणार : सौ. स्नेहल जोशी**
**मुलाखत देणार : श्री. राजाभाऊ शेळके, श्री. गणेश थोरात**
**व समीर चांदवडकर**

**नाम फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांची मुलाखत** :

संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळाच्या झळा पसरत असतांना त्या झळांत होरपळून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. दुष्काळ व आत्महत्या हे तर महाराष्ट्रात एक समीकरण बनत चालले आहे. या वर्षीच्या दुष्काळाने तर कडीच केली व त्यामुळे आत्महत्यांचे प्रमाणही वाढले. याचा परिणाम दोन संवेदनाशील मनावर झाला. श्री. नाना पाटेकर व श्री. मकरंद अनासपुरे या दोन सिनेक्षेत्रात प्रसिद्ध असलेल्या त्या दोन व्यक्ती होत. शेतकऱ्यांना निव्वळ शाब्दिक सहानुभूती दाखवून काम भागणार नाही तर त्यांना आपण काही आर्थिक मदतही केली पाहिजे अशी त्यांची भावना झाली. नानांनी नवीन गाडी घेण्यासाठी काही पैसे बाजूला काढून ठेवले होते. नवीन गाडी घेण्यापेक्षा आपण या गरजू शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदतीचा हात पुढे केला पाहिजे अशा भावनेने नानांनी मकरंद अनासपुरेला फोन केला व आपण या बाबतीत काही काम केले पाहिजे असी इच्छा प्रदर्शित केली. नाना पाटेकरचा ना व मकरंद अनासपुरेचा म ही अद्याक्षरे घेवून या विचारातून नाम फाउंडेशन या संस्थेचा जन्म झाला व आत्महत्या ग्रस्त कुटुंबियांना मदत करणारी एक संस्था महाराष्ट्रात जन्मली. पाणी प्रश्नावर चर्चा करण्यासाठी जमलेल्या चिपळूणच्या जल साहित्य सम्मेलनात या संस्थेबद्दल व तिच्या कार्य़ाबद्दल माहिती व्हावी या उद्देशाने सम्मेलनाच्या प्रमुखांनी श्री. मकरंद अनासपुरे यांची मुलाखत घेण्याची कल्पना उचलून धरली व त्यासाठी एक सत्र घ्यावयाचे ठरले. मकरंदने त्याला तात्काळ अनुमती दिली. पण काही अपरिहार्य कारणांमुळे मकरंद कार्यक्रमाला येवू शकला नाही व त्याने या कार्याशी जोडले गेलेले श्री. राजाभाऊ शेळके, श्री. गणेश थोरात व श्री. समीर चांदवडकर यांना या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्याची माहिती द्यावी अशी विनंती केली. त्या बरहुकूम हे तीनही कार्यकर्ते सम्मेलनाला आलेत व मुलाखतीचा कार्यक्रम पार पडला. श्रीमती स्नेहल जोशी यांनी ही मुलाखत घेण्याची जबाबदारी स्विकारली त्याचा हा वृत्तांतः

**प्रश्न : राजाभाऊ, तुम्ही या कार्याशी कसे काय जोडले गेले?**




**उत्तर** : मी आणि मकरंद दोघेजण नाट्य क्षेत्रातील सहकलाकार. सुरवातीला मी नाम फाउंडेशनच्या कार्याचा साक्षीदार होतो. पण हळूहळू मी या कार्यात ओढला गेलो आणि आज मी पूर्णवेळ या कार्याशी जोडला गेलो आहे. श्री. गणेश थोरात हे सिव्हील इंजिनियर आहेत व स्वतःचे काम संभाळून या कामाला मदत करतात. तर श्री. समीर चांदवडकर हे कोकणातील या कार्याला जोडले गेलेले कार्यकर्ते आहेत.

**प्रश्न : नामच्या कार्यला कोठून सुरवात झाली?**

**उत्तर** : सर्व प्रथम नानाने मकरंदला फोन करुन आपल्या मनातील चिंता बोलून दाखविली. स्वतःजवळ गाडी घेण्यासाठी जमा केकेली रकम मी या कामाला देऊ इच्छितो असे सांगितले. मी व मकरंद दोघेही बीडचे. आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना भेटून आत्महत्या केलेल्या ११२ जणांची यादी त्यांचेकडून मिळविली व त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याचे ठरविले. मकरंदने स्वतःची रक्कम यात भर म्हणून घातली. एवढेच नव्हे तर इतर सिने कलाकारांना अपील करुन त्यांचेकडूनही काही मदत मिळविली. स्टेजवर आम्ही बसलो असतांना ज्यांना मदत करायची त्या तरुण विधवा आपल्या मुलाबाळा बरोबर समोर बसलेल्या पाहून आमचे डोळे भरुन आले. त्यांचेच पैकी एका महिलेला आम्ही बोलण्याची विनंती केली. आम्हाला आर्थिक मदत नको तर जगण्यासाठी धीर व हिम्मत द्या असे मनोगत तिने बोलून दाखविले. एकंदरच वातावरण मनाला सुन्न करणारे होते.

**प्रश्न : नाना व मकरंद यांच्या नावाच्या वलयाचा मदत जमा करण्यासाठी फायदा झाला का?**

**उत्तर** : तशी थोडीफार मदत झाली असली तरी यामुळे फायदा झाला असे म्हणता येणार नाही. सोशल मिडीयाने हा प्रश्न फारच उचलून धरला. दूरदर्शनवरील कार्यक्रमाचे प्रक्षेपण फार दूरवर पोहोचले व त्यातून मदतीचा ओघ सुरु झाला. ही मदत निव्वळ देशातूनच नाही तर परदेशातूनही सुरु झाली. मुंबईच्या एका श्रीमंत महिलेने आपले नाव कळू न देता अशा कुटुंबांसाठी घरे बांधण्याच्या कार्याला मोठा हातभार लावला. यामुळे नामचे नाव गावागावात पोहोचले. गावातील कार्यकर्ते व सरपंच अशा कुटुंबांची माहिती आम्हाला कळवतात व त्यांना मदत पोहोचवण्याची व्यवस्था केली जाते. या कार्यक्रमामुळे एक मोठा फायदा झाला. प्रत्येक गावात दोन गट असतात. कोठोकोठे तर तीन गट सतात. हे गट नेहेमी परस्परांचे पाय खाली ओढण्यास तत्पर असतात. पण आमच्या कामात मात्र गाव आपसातील तेढ बाजूला ठेवून पुढे येते व मदत अगदी योग्य ठिकाणी पोहोचते.

**प्रश्न : या सर्व कामात तरुण पिढीचे योगदान काय आहे?**

**उत्तर** : चांदवडकर म्हणाले, आम्ही प्रत्येक गावात कार्यकर्त्यांची फळी उभारली आहे. यापैकी जवळपास सर्वच कार्यकर्ते तरुणांपैकी आहेत. मीही राजाभाउंमुळे या कामात ओढलो गोलो. मकरंदने महाराष्ट्रासमोर एक कोटी झाडे लावण्याचे लक्ष्य ठेवले आहे व आमचे सर्वांचे ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. यात निव्वळ झाडे लावणे महत्वाचे नसून ती जगवणेसुद्धा अपेक्षित आहे. आम्हाला सरकारी अधिकाऱ्यांकडूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे. आजकाल बरेचसे जिल्हाधिकारी तरुण आहेत. त्यांना मदत करण्याची इच्छाही आहे. बरेचदा तर ते आउट ऑफ दे वे जाऊन सुद्धा मदत करतात. त्यांच्या मदतीचे स्वागतच आहे.

**प्रश्न : इथे खरा प्रश्न आहे तो हा की शेतकरी आत्महत्या करण्याइतका टोकाचा विचार का करतात?**

**उत्तर** : खरे पाहिले असता सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देण्याइतका आपला शेतकरी खंबीर आहे. पण एखादी परिस्थितीच अशी येते की त्याचा धीर खचतो. एक उदाहरण याबाबतीत फारच बोलके आहे. एक शेतकरी कर्जबाजारी होता. पण त्याचे मधे हिम्मत होती. तो सर्व परिस्थितीला खंबीरपणे तोंड देत होता. त्याचे जवळ एक बैलजोडी होती. तिला सांभाळणे त्याला जड जात होते तरी तो तिला सांभाळत होता. पण शेवटी त्याला खूपच अडचण आल्यामुळे त्यांने ती एकाला सांभाळायला दिली. त्याच्या एका नातेवाईकाचे निधन झाले तिथे अंत्यविधीसाठी तो तालुक्याच्या गावाला गेला. प्रेतयात्रा रस्त्याने जात असतांना काही जनावरे

खाटकाकडे नेतांना त्याला दिसली. त्यापैकी त्याचा बैल त्यात होता. मालकाला पाहून बैल हंबरला व त्याच्या लक्षात आले की आपला बैल खाटकाकडे चालला आहे. यामुळे त्याचा स्वतःचे मनावरील ताबा सुटला व त्या दुःखापोटी आत्महत्या करायला तो प्रवृत्त झाला. शेवटी, माणूस परिस्थितीचा गुलाम असतो हेच खरे.

**प्रश्न : या संदर्भात कोकणात कोणते काम करायची तुमची कल्पना आहे ?**


**उत्तर** : कोकणात वारेमाप पाऊस पडतो. इथे अति पावसामुळे मांणूस मरतो तर शेजारीच सह्याद्रीच्या पलिकडे माणूस पाण्याशिवाय मरतांना आपण पाहतो. आपल्याला मंगळावर जाण्यासाठी पैसा आहे पण कोकणातील पाणी अडवून ते सह्याद्री पलिकडे नेण्यासाठी पैसा नाही हे एक न उलगडणारे कोडे आहे. हे पाणी इतर भागात नेण्याची सरकारची काय योजना आहे ? इगतपुरी जवळ डोंगराचा एक भाग आहे, तो फोडून पाणी पलिकडे सहजपणे नेले जाऊ शकते. त्यासाठी जास्त खर्चही येणार नाही. आपल्याजवळ तंत्र आहे पण त्याचा वापर करण्याची आपली इच्छा शक्ती नाही. मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो, कोणाला मरावेसे वाटते हो ?

कोकणातल्या नद्या समुद्रला मिळतात. पूर्वी खाड्यातून जहाजे कितीतरी आत येत होती. पण आता मात्र खाड्या गाळाने भरुन गेल्या आहेत. समुद्राचे खारे पाणी खाड्यातून आत येवून शेतीत शिरते व जमिन नापिक बनते. यासाठी सरकारची काय उपाय योजना आहे हा प्रश्न आम्हाला विचारावासा वटतो. थोडक्यात काय तर कोकणातले शेतकरी जात्यात तर इतर ठिकाणचे शेतकरी सुपात असलेले आढळतात. त्यांना वाचवणे हा कार्यक्रम हाती घ्यावा असे आम्हाला वाटते.

*****



# सत्र पहिले - निर्सगस्नेही जीवन पध्दती





सूत्रसंचालक

**अध्यक्ष : डॉ.प्रमोद मोघे**
**वक्ते : सौ. मंजुषा ओक व श्री. सतीश कामत**

**पर्यावरणीय जीवन पद्धती :**

निसर्गाने आपल्याला जगण्यासाठी जे नियम घालून दिले आहेत ते आपण धाब्यावर बसवल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. हे असेच चालू राहिले तर आपल्याला विनाशाला सामोरे जावे लागेल म्हणून पर्यावरणीय जीवन पद्धती काय आहे हे समाजाला कळावे म्हणून या सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रास अध्यक्ष म्हणून पुण्यातील एन.सी.एल. या संस्थेमधील निवृत्त ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मोघे यांना पाचारण करण्यात आले. त्याचबरोबर या विषयातील अभ्यासक जीवित नदी या संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीमती मंजूषा ओक व कोकणातील प्रसिद्ध पत्रकार श्री. सतीश कामत या सत्रात भाग घेण्यासाठी उपस्थित होते. या लेखात त्यांनी मांडलेल्या विचारांचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

डॉ. प्रमोद मोघे :

सत्राची सुरवातच त्यांनी एका विचित्र माहितीने केली. १२५ कोटी लोकसंख्या असलेल्या देशात फक्त ८००० शास्त्रज्ञ असून त्यापैकी फक्त ३०० हे पाणी या विषयाशी निगडीत आहेत. या शास्त्रज्ञांनी जमा केलेले ज्ञान समाजासमोर पाहिजे त्या प्रमाणात पोहोचतच नाही ही खरी शोकांतिका आहे. पाण्याबद्दलच बोलायचं झालं तर पिण्याला शुद्ध असलेलं पाणी कशाला म्हणायचं हा प्रश्न उपस्थित केला तर हे किती जणांना माहित असेल याबद्दलच शंका आहे.



जागतिक आरोग्य संस्थेनी पाणी शुद्ध आहे की नाही हे पाहण्यासाठी ४० निकष तयार केले आहेत. पुण्यासारखी महानगरपालिका , जी देशात तुलनेने शुद्ध पाणी पुरवण्यासाठी प्रसिद्ध समजली जाते ती सुद्धा यापैकी फक्त १०च निकष पूर्ण करते असे सांगितले तर तुम्हाला धक्का बसल्याशिवाय राहणार नाही.

पाणी शुद्धीकरणासाठी आपण तीन गोष्टींची निवड करतो. त्या तीन गोष्टी म्हणजे चुना, तुरटी व क्लोरीन या होत. सतत १० वर्षांपेक्षा जास्त काळासाठी आपण आवश्यक त्या प्रमामापेक्षा तुरटीचा जास्त वापर केला तर माणसाला विस्मृती सारख्या विकारांना तोंड द्यावे सागते. पाणी शुद्धीकरणासाठी क्लोरीनचा वापर केला तर त्या वापरापासून ८ उपपदार्थ तयार होतात. ते मानवी प्रकृतीला अत्यंत घातक असतात. या पासून विविध प्रकारच्या कँसरला तोंड देण्याची पाळी समाजावर येते. पिण्यासाठी एक कुटुंब दररोज १० लिटर्सपेक्षा जास्त पाणी वापरत नाही. पण त्याच्या घरी पोहोचणा–या १०० टक्के पाण्याला शुद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो हे निश्चितच हास्यस्पद आहे. यासाठी दररोज प्रत्येक माणसासाठी ६०० रुपये अनावश्यक खर्च होत असतो. ही पद्धती वर्षानुवर्षे सुरु आहे यावरुन आपण किती पैसा वाया घालवला असेल याची कल्पना करा. एन.सी.एल.ने या विषयावर संशोधन करुन जे तंत्रज्ञान विकसित केले आहे त्याचा वापर करुन शुद्ध केलेल्या पाण्याला लिटरमागे एक रुपया सुद्धा खर्च येत नाही. जगात तुरटी व क्लोरीन तयार करणा–या ज्या संस्था आहेत त्यांचा दबावाखाली त्यांचे तंत्रज्ञान वापरले जाते. त्यामुळे त्यांचे खिसे भरतात व आपल्याला विनाकारण विविध रोगांना सामोरे जावे लागते. आम्ही विकसित केलेले तंत्रज्ञान वापरुन पाणी शुद्ध केले तर लिटरमागे एक रुपयाही खर्च येणार नाही. आमचे तंत्रज्ञान वापरुन पुण्यातील काही संस्था अशा पद्धतीने पाणी वितरित करीत आहेत.

ग्रामीण भागासाठी तर आमचे म्हणणे आहे की हेही तंत्रज्ञान वापरण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी ग्रामीण वनस्पतींचा वापर करुनही पाणी १०० टक्के शुद्ध केले जाऊ शकते. ग्रामीण भागात निर्मळी नावाची एक वनस्पती वाढते. या वनस्पतीच्या बिया पाणी शुद्ध करण्यासाठी खूपच उपयुक्त ठरतात. आपणा सर्वांना शेवग्याच्या शेंगा परिचित आहेत. वाळलेल्या शेंगातील बियांची भुकटी करुन ती पाण्यात मिसळली तरी पाणी पूर्णपणे शुद्ध होवू शकते. आपण विकसित केलेले हे तंत्र जगातील कित्येक देश वापरतात. दुर्दैव हे आहे की भारतातच याचा वापर होत नाही.

जगाने दिलेली जलशुद्धीकरणाची तत्वे पाळली गेली नाहीत तर त्यांचेशी व्यापार करणेही जड जाणार आहे. याचे कारण असे की अशुद्ध पाणी वापरुन तयार केलेल्या भाजीपाल्यात वा फळांमध्ये प्रदूषणाचा काही हिस्सा जातो व तो राहिला तर जगाची बाजारपेठ आपला माल स्विकारत नाही. आपल्या सध्याच्या जीवनपद्धतीत प्रत्येक शहरी नागरिक जवळपास ४० ग्राम रसायने सांडपाण्यात मिसळत असतो. ते पाणी प्रवाहाने पुढे जात असते. त्याचा परिणाम पुढील लोकांच्या आरोग्यावर होतो याचे भानही आपल्याला राहात नाही. आपली जीवन पद्धती बदलली तर या पैकी बरेचसे दुष्परिणाम आपण टाळू शकू. ही जीवन पद्धती कशा प्रकारे बदलली जाऊ शकते याची माहिती आपल्याला श्रीमती मंजूषा ओक देणारच आहेत. एका शास्त्रज्ञाला आपले मत मांडण्यासाठी आपण आमंत्रित केले त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

**श्रीमती मंजूषा ओक :**

मी स्वतः गेल्या तीन वर्षांपासून नदीचं पुनरुजीवन या संकल्पनेशी जोडली गेली आहे. जीवित नदी चळवळीतच जीवित हा शब्द आहे याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते. सध्या नद्या मृत झालेल्या आहेत. त्यांना जीवंत करणे हे या चळवळीचे ध्येय आहे. नदी नेहेमी तीन अवस्थांमधून जात असते. पहिली अवस्था म्हणजे उगमापासून डोंगर माथ्यावरुन खळखळत ती जमिनीवर येत असते. दुसऱ्या अवस्थेत ती सपाट जमिनीवरुन वाहात असते. तिसऱ्या अवस्थेत ती समुद्राला जाऊन मिळते. समुद्राला मिळत असतांना नदीचे गोड पाणी आणि समुद्राचे खारे पाणी एकत्रित होवून तिथे वेगळ्याच वनस्पतींची वाढ होतांना दिसते. नदी जेव्हा डोंगरमाथ्यावरुन खाली वाहात येते त्यावेळी तिच्या पाण्यात वेगवेगळया न्युट्रीयंटचा भरणा होत असतो. पण जेव्हा ती मानवी वस्तीत शिरते तेव्हा तिच्यासमोर प्रदूषणाचे संकट उभे राहाते. त्यामुळे पाण्याचा वापर करतांना निसर्गाच्या जलसंपत्तीचा ऱ्हास न होता एक सुवर्ण मध्य गाठणे आवश्यक




ठरते.

मानव पाण्याचा वापर प्रामुख्याने शेती, औद्योगिकरण व घरगुती वापर या तीन कारणांसाठी करीत असतो. हे करीत असतांना निर्माण झालेली विविध रसायने तो नदी पात्रात बिनदिक्कतपणे सोडत असतो. त्यामुळे जल प्रदूषण ही समस्या वाढीस लागते. यापैकी आपण आपले लक्ष घरगुती पाणी वापरावर केंद्रित करु या. डॉ. मोघे साहेबांनी आपल्या भाषणात प्रत्येक माणूस दररोज ४० ग्रॅम रसायने पाण्यात मिसळत असतो असे विधान केलेले आपल्यास स्मरतच असेल. तोंड धुतांना वापरली गेलेली पेस्ट, दाढी करतांना वापरले गेलेले साबण, आंघोळ करतांना वा कपडे धुतांना वापरलेले गेलेले साबण, शांपू, सौंदर्य प्रसाधनांतील रसायने, फरशी पुसत असतांना वापरली गेलेली द्रव्ये वापरलेल्या पाण्यात मिसळली जातात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जल प्रदूषण होते. आपले पूर्वज या सर्व क्रिया करीत होते पण त्या करीत असतांना जी साधने वापरली जात होती ती पर्यावरण पूरक होती. त्यामुळे हा प्रश्न त्याकाळी भेडसावत नव्हता. पण आज मात्र या गोष्टींचा अतिरेक झाल्यामुळे प्रदूषणात वारेमाप वाढ झालेली आहे.

नगर प्रशासन हे प्रदूषण कमी करत असल्याचा दावा करते. पण या संबंधात त्यांचे प्रयत्न फारच तोकडे पडतात. शहराला आवश्यक असणारी यंत्रणाच त्यांचेजवळ उपलब्ध नाही. शहरातील वीज जेव्हा बंद असते त्यावेळी हे आलेले प्रदूषण मिश्रीत पाणी तसेच नदी नाल्यात सोडले जाते व त्याचा व्हायचा तो परिणाम होतोच होतो. या मुळे प्रवाहाच्या खालच्या बाजूला असलेले लोक या प्रदूषणाचे शिकार बनतात. हे आपण आपली जीवन शैली बदलून थांबवू शकणार नाही का हा खरा प्रश्न आहे. वर वापरले जाणारे जे पदार्थ आहेत त्या प्रत्येकाला पर्यावरण पूरक पर्याय आहेत. रिठे, शिकेकाई, व्हिनेगार, मीठ, बेकींग सोडा, दंत मंजन, वनस्पतीपासून तयार केलेली तेले यासारखे खूप पर्यावरण स्नेही पर्याय आपल्याजवळ उपलब्ध आहेत. काळाने त्यांची उपयुक्तता सिद्ध केलेली आहे. हे सर्व बदल आपण एकदमच केले पाहिजे असा माझा आग्रह नाही. हळूहळू आपण आपल्या जीवन पद्धतीत बदल करुन या मार्गांचा वापर वाढवू शकतो. त्याद्वारे नदीचे स्वास्थ्य सुधारणे आपल्याला शक्य् होईल.

नागरिकांना या मार्गाने नेण्यासाठी आम्ही पुणे शहरात एक जीवित नदी नावाची चळवळ उभी केली आहे. या चळवळीत रिव्हर फेस्टिवल, रिव्हर वॉक, शाळा व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना या चळवळीशी जोडून घेणे, पूररेषा काय आहे याची लोकांना माहिती देणे, कीर्तनाद्वारे पर्यावरणाचा संदेश लोकांपर्यंत पोहोचविणे, नदी काठावर चित्रकला व फोटोग्राफी स्पर्धा आयोजित करणे अशा प्रकारचे उपक्रम राबवित असतो. आपणही आपल्या गावात अशा प्रकारची चळवळ सुरु करुन आपले पर्यावरण प्रेम दाखवू शकता अशी मी आपल्याला विनंती करते.

**श्री. सतीश कामत** :




आपण ज्या पद्धतीने जीवन जगत होतो व पर्यावरणीय जीवन पद्धती २५–३० वर्षांपूर्वी एकच होत्या. गेल्या काही वर्षातच या दोहोत फरक पडायला सुरवात झाली आहे. याचे कारण म्हणजे या पर्यावरण स्नेही पद्धतींपासून आपण फारकत घेतली आहे. शहरीकरण झालेल्या भागातील नद्या जाऊ द्या, पण कोकणातील छोट्या छोट्या गावातून वाहणाऱ्या नद्याही आता गटारगंगा झालेल्या आढळतात. पुन्हा निसर्गाकडे वळायचे झाल्यास आपल्याला फार मोठे काही करायची आवश्यकता नाही, कोणतेही क्रांतीकारक बदल करण्याची आवश्यकता नाही तर छोटे छोटे बदलही आपण सहजपणे करुन आपण आपले साध्य गाठू शकतो.

या संबंधात काही छोटी उदाहरणे उपयुक्त ठरु शकतील. प्लास्टिक कॅरी बॅगचेच उदाहरण घ्या ना. त्या वापरण्याऐवजी कागदी बॅग वापरणे फार काही कठीण नाही. आमच्या बचत गटाच्या महिला दर महिन्याला १०००० कागदी पिशव्या गेल्या ६–७ वर्षांपासून बनवीत आहेत. फक्त नगरपालिका अथवा सरकारी

अधिकाऱ्यांनी दुकानदारांना सांगण्याची आवश्यकता आहे की तुम्ही प्लास्टिक बॅग ऐवजी कागदी बॅगमधे ग्राहकांना माल द्या. हा बदल होणे सहजशक्य आहे. पण राजकीय इच्छा शक्तीच्या अभावाने असे घडत नाही व आपण प्लास्टिक बॅगच्या फेऱ्यात अडकत चाललो आहोत.

दुसरे उदाहरण आपण विजेच्या वापराचे घेवू शकतो. आवश्यकता नसतांना दिवे व पंखे चालू असतात. त्यांची खरेच आवश्यकता आहे की नाही हा प्रश्न फक्त आपल्या मनाला विचारणे आवश्यक आहे. तो आपण विचारण्याचे धाडस करीत नाही म्हणून विजेचा अवास्तव वापर वाढत चालला आहे. विजेची काटकसर म्हणजेच विजेची बचत हे सरळ साधे सूत्र आपण विसरुन गेलो आहोत.

सायकल वापराचेच उदाहरण घ्या ना. सायकल वापरणे ही गोष्ट आपण प्रतिष्ठेला जोडून घेतली आहे. मी सायकल वापरतो म्हणजे मी कोणत्या उत्पन्न गटात आहो असा विचार व्हायला लागला आहे. मुलगा महाविद्यालयात गेला म्हणजे त्याला सायकल वापरणे त्याच्या प्रतिष्ठेला बाधा आणते व तो मला दुचाकी हवी असा हट्ट करतो व आपणही त्या हट्टाला बळी पडून त्याला दुचाकी घेवून देतो. पुण्यासारख्या मोठ्या शहरात दुचाकी वापरण्याची अपरिहार्यता मी समजू शकतो पण रत्नागिरी अथवा चिपळूण सारख्या छोट्या शहरात सायकल वापरणे मुळीच गैर नाही. पायी चालणे तर आपण जवळपास बंदच करुन टाकले आहे. थोडे अंतर कापायचे असले तरी आपल्याला दुचाकी हवी असते. ही मानसिकता आपण बदलणार की नाही? आधुनिकीकरणाला माझा मुळीच विरोध नाही पण आवश्यक तिथेच ते केले जावे अशी मी अपेक्षा बाळगतो.

जलसाक्षरता हाही आजकाल कळीचा मुद्दा झालेला आहे. एका माणसाला दिवसभरासाठी १३५ लिटर पाणी कशासाठी लागते हा माझेसमोर प्रश्न आहे. यापेक्षा कितीतरी कमी पाण्यात तो आपला दिवस व्यतीत करु शकतो. चिपळूण सारख्या शहरात दिवसातून दोनदा पाणी कशासाठी द्यावे हेच मला समजत नाही. जनतेला काही चांगल्या सवयी लावायच्या की समाजाचे रंजन करण्यासाठी त्यांची दोनदा पण्याची मागणी मान्य करायची हा खरा प्रश्न आहे. जलसाक्षरतेच्या प्रसारासाठी कोणीतरी माझे घरी यावे व माझ्या घरातील नळाचे वॉशर बदलावे हे कशासाठी? मला ते बदलण्याची आवश्यकता का वाटू नये हा माझेसमोर प्रश्न आहे.

एका गावात डोंगरमाथ्यावर एक २५ लाख लिटरचे शेततळे बांधण्यात आले व त्यातून ४० शेतकऱ्यांना पाणी देवून त्यांचा प्रश्न सोडविण्यात आला ही बातमी वाचून आनंद झाला. हे गावोगाव का होवू नये? प्रत्येक गावात टेकड्या व छोटेछोटे डोंगर असतातच. त्यांचा वापर अशा कामासाठी झाला तर पाणी प्रश्न चांगल्या प्रकारे सुटू शकेल. शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत कोणतीही शक्ती न वापरता पाणी आपोआप पोहोचू शकेल. आपल्याकडे असे डोंगर सरकारच्या लाल फितीत बंद असल्यामुळे असे काम होवू शकत नाही याचा खेद वाटतो.

सरकारी योजनांना माझा विरोध नाही. पण बहुतांश सरकारी योजना या गावाची लोकसंख्या किती आहे यावर आधारित असतात. कोकणातील विखुरलेल्या वाड्या लक्षात घेता या योजना कोकणासाठी कुचकामाच्या ठरतात. सरकारी योजनांत पैसा कसा वापरला जाातो हे आपल्याला चांगले माहित आहे. खाजगी पद्धतीने काम झाले तर अर्ध्या पैशात काम होवू शकते हे लातूरने दाखवून दिले आहे. महाराष्ट्राचा इतर भागातील पाणी प्रश्न व कोकणातील पाणी प्रश्न अगदीच भिन्न आहेत. इथे अति पाणी ही समस्या आहे. त्यामुळे इतर ठिकाणचे मापदंड इथे लागू शकणार नाही हे मला सांगावेसे वाटते.

या सत्राचे सूत्रसंचलन श्रीमती प्राची जोशी यांनी केले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे या सत्रात सहभागी होणाऱ्या डॉ. शीतल चोपडे सभा स्थानी येवू शकल्या नाहीत याबद्दल खेद व्यक्त करण्यात आला. सत्रात भाग घेणाऱ्या सर्व मान्यवरांचा यथोचित सन्मान करुन सत्र संपल्याचे घोषित करण्यात आले.

*****



# सत्र दुसरे - कोकणातील जलसाठवणूक



सूत्रसंचालक

**अध्यक्षः डॉ. दि.मा.मोरे**
**वक्तेः श्री. विनय महाजन, श्री. विजय जोगळेकर, श्री. चेतन गोगावले**
**सुत्र संचलनः सौ. अंजली बर्वे**

कोकणात भरपूर पाऊस पडतो पण त्यापैकी बराचसा समुद्रात वाहून जातो. त्याचा परिणाम म्हणून उन्हाळ्याचे काही महिने कोकणात पाणी टंचाई जाणवते. असे का होते हा खरे तर संशोधनाचा विषय ठरतो. या वर्षीचे जल साहित्य सम्मेलन चिपळूण येथे असल्यामुळे या विषयावर चर्चा होणे आवश्यक होते. म्हणूनच कोकणातील जल साठवणूक हा विषय इथे चर्चेला घेण्यात आला. कोकणातील एक उद्योजक श्री. विनय महाजन, डिफ्युजर तंत्राचे प्रसारक श्री. विजय जोगळेकर आणि नवीन तंत्रज्ञानाने जल साठवणूकीचा पुरस्कार करणारे श्री. चेतन गोगावले यांना या सत्रासाठी वक्ते म्हणून पाचारण करण्यात आले. पाणी क्षेत्रातील अग्रणी नाव असलेले डॉ. दि. मा. मोरे यांनी या सत्राचे अध्यक्षस्थान भूषविले. विविध तज्ञांनी मांडलेली मते येणेप्रमाणेः

**श्री. विनय महाजन** :

मी मुळचा कोकणातला. बरीच वर्षे कामानिमित्त मुंबईत मुक्काम होता. पण नंतर कोकणात काही काम करावे म्हणून गेल्या काही वर्षात कोकणात परतलो. कोकणात भरपूर पाऊस पडतो हे सर्वांना माहितच आहे. दरवर्षी सुमारे तो १० फूट पडतो. याचा अर्थ असा की वर्षभर पडलेल्या पावसाचा थर जमा केला तर तो १० फूट उंचीचा राहील. इतका पाऊस पडूनही उन्हाळ्यातील काही




महिने पाण्याची टंचाई निर्माण होणे ही एक विचित्रच बाब दरवर्षी अनुभवायला मिळते. हे असे का म्हणून घडते? पूर्वी अशी पाणी टंचाई कोकणात नव्हती. लोकसंख्या वाढ या साठी कारणीभूत आहे का? मुळीच नाही कोकणाची लोकसंख्या वाढलेली

नाही, उलटपक्षी ती घटत चालली आहे. पाऊस कमी झाला आहे का? तसेही नाही. वाढते औद्योगिकरण त्यासाठी जबाबदार आहे का? मुळीच नाही कारण औद्योगिकरणाला तसा वेगही दिसत नाही. मग हे असे का म्हणून दिसते?

पूर्वीचे काळी जवळपास प्रत्येक डोंगरावर नांगरट होत असे. शिवाय ठिकठिकाणी एक मीटर उंचीचे बंधारे होते. त्यामुळे पाणी अडायचे. डोंगरावरील वाहते पाणी व मुरलेले पाणी यात मोठा भेद आहे. वाहते पाणी वेगाने खाली येते पण मुरलेले पाणी खाली यायला वेळ लागतो. मुरलेलं पाणी खाली यायला पन्नासपट जास्त वेळ लागतो. या शिवाय नद्यावरपण बंधारे होते. त्यांना अडलेले पाणी आजूबाजूच्या जमिनीवर पसरुन मुरत होते. नदी पात्रातले पाणी जसजसे कमी होत होते तरसते हे मुरलेले पाणी पुन्हा नदीत परत येत असे. आज ही परिस्थिती राहिलेली नाही म्हणून अशा प्रकारच्या पाणी टंचाईला आपल्याला तोंड द्यावे लागते.

कोकणातील काळा कातळ फोडून काढण्यासाठी सुरुंग लावले जातात. त्यामुळे खड्डे तयार होतात. त्यात पाणी जमते पण त्या खड्ड्याला ज्या चिरा, फटी असतात त्यातून पाणी पाझरुन जाते. त्या ठिकाणी खिळखिळे झालेले दगडांचे तुकडे काढून टाकले आणि दरडा भरुन टाकल्या तर तिथेही चांगल्या प्रकारे पाणी साठवून ठेवले जाऊ शकते . शिवाय माथा ते पायथा एक मीटर उंचीचे बंधारे बांधले तरी त्यामधे पाणी टिकून राहील.

हे झाले पाणी साठवण्याबद्दल. पण साठवलेले पाणी कसे वापरायचे यावरही धरबंध असावा. यासाठी समाज जलसाक्षर असणे गरजेचे आहे. आजची जीवन पद्धती आपल्याला अवास्तव पाणी वापरण्यासाठी प्रवृत्त करते. आपण आपल्या सवयी बदलायला हव्यात. नसता साठवलेले पाणी कमी पडल्या शिवाय राहणार नाही.

**श्री. विजय जोगळेकर :**

कोकणभूमी ही एक वैशिष्ट्यपूर्ण भूमि आहे. जलसाठवणूकीचे इतर प्रदेशातले नियम इथे लागू शकत नाहीत. जवळपास संपूर्ण कोकणात जमिनीखाली ५ ते ७ फूटांखाली काळा कातळ पसरलेला आहे. त्यामुळे इतर महाराष्ट्रात जसे पाणी मुरु शकते तसे कोकणात घडू शकत नाही. महाराष्ट्रात इतर ठिकाणी यशस्वी झालेले नाला खोलीकरण व रुंदीकरण सुद्धा इथे यशस्वी ठरु शकत नाही कारण काळ्या कातळामुळे असे खोदकामही या ठिकाणी शक्य नाही.

कोकणात एखूण २२ प्रमुख डोंगर रांगा आहेत. त्या कळल्या म्हणजे कोकणातील पाणी प्रश्न कसा सोडवायचा हे लक्षात येईल.कोकणात ६००० गावे डोंगरालगत आहेत.




याशिवाय ६५००० वाड्या आहेत, यात लोकसंख्या विखुरलेली आहे. कोकणातील ज्या भागात आज पाणी भरते ती पूर्वी सगळी बंदरे होती. गाळाने भरलेल्या येथील खाड्यांची पाणी वाहून नेण्याची क्षमता कमी पडते. या कारणानी कोकणात गरजेनुसार पाणी अडविण्याच्या पद्धतीत बदल करुन त्या वापराव्या लागतील. कोकणात पाणी मुबलक आहे पण साठवणूक बरोबर नाही. त्याच बरोबर कोकणात शेती पद्धतीचीही वानवा असून ती विकसित करण्याचीही गरज आहे. खरी गरज आहे ती म्हणजे पाणी वापर तंत्रज्ञान विकसित करुन आपण यशस्वी शेती करु शकतो. त्यासाठी डिफ्युजर तत्वज्ञान पाण्याची उत्पादकता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरु शकते.

**श्री. चेतन गोगावले :**



चेतन गोगावले यांनी कायम दुष्काळी तालुका असलेल्या पुरंदर तालुक्यातील पिंगोरी या गावातील तलावाच्या यशस्वी पुनर्भरण होण्यामागील वापरलेल्या तंत्रज्ञानाची माहिती आपल्या भाषणात दिली. रोटरी क्लबच्या माध्यमातून या गावात दोन तलाव बांधण्यात आले. एका तलावात प्लास्टिक आंथरुन पाणी जमा करण्याचा प्रयत्न

करण्यात आला. दुसरा तलाव आकाराने मोठा व खोल होता. त्याठिकाणी प्लास्टिकचा वापर करुन पाणी जमा करणे शक्य नव्हते. त्या तलावाचा आकार २१५ बाय २१५ बाय ५५ फूट एवढा होता. त्या तलावात केमिकल वापरुन पाणी जमा करण्याचं काम आम्ही हाती घेतलं. त्या तलावात एका बाजूला मातीचा थर तर दुस-या भागात कच्चा मुरुम होता. अशा ठिकाणी वॉटर प्रूफिंग शक्य नव्हते. तिथे काय करावे यासाठी आम्ही सतत तीन महिने झटत होतो. शेवटी आम्हाला मार्ग सापडला. त्या ठिकाणची लूज स्ट्रक्चर्स आम्ही काढून टाकली. त्या ठिकाणच्या क्रॅक्स व जॉइंट्स आम्ही आपल्या मटेरियलने भरुन काढल्या. आणि त्यावर आम्ही आमच्या मटेरियलचे कोटिंग केले. जो मातीचा भाग होता त्याठिकाणी आम्ही चांगल्या प्रकारे पिचिंग केले. या ठिकाणी सिमेंटचा वापर शक्य नव्हता कारण नंतर त्या ठिकाणी सिमेंट वाळल्यानंतर पुन्हा क्रॅक्स तयार झाल्या असत्या. आम्ही तिथे भरलेले मटेरियल वेगळ्या प्रकारचे होते ज्या ठिकाणी अशा क्रॅक्स पडणार नव्हत्या. त्यावर आम्ही केमिकलचे कोटिंग केले. आम्हाला हे सर्व काम कॉस्ट इफेक्टिव्ह करायचे होते. हे कोटिंग करण्यासाठी आम्हाला पारंगत मजूर नको होते. तो खर्च परवडण्यासारखा नव्हता. म्हणून आम्ही तिथले स्थानिक अपारंगत लोक पकडले व त्यांचे कडून कोटिंगचे काम करुन घेतले. त्यांना समजेल अशा पद्धतीने त्यांचेकडून काम करुन घेतले.

पावसाचं वाहून जाणारं पाणी आम्ही या तळ्यात जमा केलं. ते जवळपास अडीच कोटी लिटर होतं. पंचावन दिवस आम्ही त्या जमा झालेल्या पाण्याची नोंद ठेवत होतो. त्यापैकी काहीही पाणी लीक झाले नाही असे आमच्या लक्षात आले. आमचा प्रयोग यशस्वी झाला होता. या गावात गावकऱ्यांनी एक नर्सरी तयार केली होती. त्या नर्सरीमधील जवळपास ५०००० झाडे १० जुलैला या परिसरात लावण्यात आली. या सर्व झाडांना ड्रीपने पाणी देण्याची योजना गावकऱ्यांनी आखली होती. हा सर्व खटाटोप त्या झाडांना पाणी देण्यासाठी करण्यात आला होता. या तलावातून पंपाने पाणी काढायचे नाही असा नियम करण्यात आला. प्रयोग म्हणून या तलावातील पाण्याने २० एकर तुरीला ठिबकने पाणी देण्याचा प्रयोगही करण्यात आला. तयार झालेली तूर, दाळ तयार करुनच बाजारात न्यायची असेही ठरवण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित असलेले श्री. उल्हास परांजपे यांची मदत घेवून फेरो सिमेंटच्या टाक्या बांधण्यात आल्या. या तलावातून पाणी उपसून ते या टाक्यात भरण्यात येते व तिथून ठिबकने ते लावलेल्या झाडांना दिले जाते. या गावात NRVC (Non resident villagers club) नावाची एक संस्था स्थापन करण्यात आली. या गावातील पण पुणे, मुंबई या सारख्या बाहेरगावी राहणारे नागरिक या क्लबचे सभासद आहेत. ते गावाप्रती असलेल्या प्रेमापोटी गावाला आर्थिक मदत करीत असतात. या प्रयोगाला जी आर्थिक मदत झाली ती या क्लबने केली. आम्हाला हे काम करण्यासाठी लिटरमागे फक्त ६ पैसे खर्च आला. खोदकाम विचारात घेवून तो जास्तीतजास्त १४ पैसे येवू शकेल.

डॉ. देशकर या गावाशी निगडीत आहेत. त्यांनी आम्हाला हाच प्रयोग कोकणात राबविता येईल का याचा विचार सांगण्यासाठी या ठिकाणी बोलावले व आपले विचार मांडण्याची संधी दिली. कोकणातील जमिनीचा थर लक्षात घेता इथे तर हा खर्च आणखी कमी येवू शकतो. आम्ही सध्या प्रयोगशील अवस्थेत आहोत. कोकणातील लोकांनी आम्हाला संधी दिली तर आम्ही असा प्रयोग कोकणातही करायला तयार आहोत.




**डॉ. दि. मा. मोरे :**

कोकण भागात शासनाच्या माध्यमातूनही सिंचन व्यवस्थांची कामे झालेली आहेत. पण पाऊस जास्त असल्यामुळे व दुष्काळाची शक्यता नसल्यामुळे ही कामे प्राधान्याने झाली नाहीत. जलयुक्त शिवाराची कामे कोकणात याच कारणांमुळे आढळत नाहीत. या भागातील मांज-या खडकाबद्दल जास्त बोलले जाते पण माझ्या अंदाजाप्रमाणे फक्त १५ टक्के भागात हा खडक प्रामुख्यांने दिसून येतो. बाकीच्या ठिकाणी बॅसाल्ट दगडाचेच प्राबल्य दिसून येते. कोकणातील जल साठवणूक करतांना या बाबींचा विचार करणे आवश्यक ठरते.

या विभागात नद्यांची २२ खोरी आहेत प्रत्येक खो-यात असलेल्या नद्या व उपनद्या विचारात घेता या पट्ट्यात कमीतकमी १२५ नद्या आहेत. या भागात पाण्याची कमतरता नाही तर पाणी शहाणपणाने कसे वापरायचे हा खरा प्रश्न आहे. त्याला श्री. जोगळेकर यांनी योग्य उत्तर शोधून काढले आहे.

पाण्यापेक्षा पाण्याची उत्पादकता महत्वाची आहे ही बाब जोगळेकरांनी ओळखली व त्यांनी स्वतः तयार केलेले डिफ्युजर तत्वज्ञान वापरुन शेतक–यांना विचाराची नवीन दिशा दिलेली आहे. या तंत्राने फळांचे उत्पादन एकरी एक टनापासून १० टनांपर्यंत वाढवले जाऊ शकते व त्याद्वारे पाण्याची उत्पादकता वाढीस लागू शकते.

या भागात तयार होणारी फळे नाशीवंत असल्यामुळे शेतक–यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग वाढीस लागणे ही काळाची खरी गरज आहे. यासाठी जैन इरिगेशनने या ठिकाणी योग्य पाऊल उचलून आंबा या पिकासाठी मोठे योगदान देण्याचा संकल्प केला आहे. जैन इरिगेशनचे संचालक व कर्मचारी वर्ग येथे मोठ्या प्रमाणावर उपस्थित आहे. यी भविष्यातील विचारांची नांदी ठरावी.


रायगड किल्ल्यावरचे जलसंधारण आपल्या सर्वांच्याच परिचयाचे आहे. या ठिकाणी खदानी खोदून काढलेला दगड हा तटबंदी उभारण्यासाठी वापरण्यात आला व त्यामुळे निर्माण झालेले खड्डे तलावांत रुपांतरित करुन किल्ल्यावरील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यात आला. जर या पद्धतीने जमा केलेले पाणी एका राजधानीला पुरु शकते तर ते शेतीला का पुरु शकणार नाही ?

यच पाण्याचा वापर करुन आपण कोणता रोजगार वाढविणार आहोत याचाही विचार करणे आवश्यक ठरते. आज साखर उद्योगाला पश्चिम माहाराष्ट्राचा आर्थिक कणा समजले जाते. या उद्योगाने निर्माण केलेले उस तोडणारे मजूर ज्या पद्धतीचे हलाखीचे जीवन जगत आहेत तसा रोजगार आपल्याला निर्माण करायचा आहे का? याचाही विचार सूज्ञांनी करायचा आहे. या सत्रात कोकणातील जलसाठवणूकीसाठी फारच उपयुक्त विचार मांडण्यात आलेत त्यांचे कौतुक करावेसे वाटते.

*****



# पाणी आणि ग्रामविकास



**मुलाखत : डॉ. प्रसाद देवधर**
**संवादक : श्री. धनंजय चितळे**

डॉ. प्रसाद देवधर यांचे सिंधूदुर्ग जिल्ह्यात भगीरथ या संस्थेमार्फत ग्रामविकासाचे मोठे काम उभे आहे. १७७ गावात या कामाचा प्रसार झाला असून ग्रामस्थांची जीवन शैली बदलण्याचा हा एक आगळा वेगळा प्रयत्न आहे. जल साहित्य सम्मेलनास उपस्थित असलेल्या प्रतिनिधींना या प्रयत्नाची ओळख व्हावी या उद्देशाने सम्मेलनात त्यांची मुलाखत आय़ोजित करण्यात आली. श्री. धनंजय चितळे यांनी ती मुलाखत घेतली. मुलाखत देणारा व घेणारा हे दोघेही तगडे गडी असल्यामुळे मुलाखत खूपच रंगली. त्या मुलाखतीचा हा वृत्तांतः

**धनंजय : प्रसाद, तुझं ग्राम विकासाचं काम भरपूर वेगानं चालू आहे. जवळपास १७७ गावांना तुझ्या कामानं व्यापलं आहे. असं काम करण्याची प्रेरणा तुला कधीपासून व कोणामुळे मिळाली ?**

**च्साद** : तसं पाहू गेल्यास मला ही प्रेरणा मी अकरावीत असतांना पासून मिळाली. पण त्याला खतपाणी घातलं गेलं, मी जेव्हा गुजराथमधील भूकंपाच्या पुनर्वसनाच्या कामाला गेलो होतो तेव्हापासून. तिथे या कामासाठी नेदरलँडमधून काही कार्यकर्ते आले होते व स्वतःला पुनर्वसनाच्या कामात पूर्णपणे झोकून काम करतांना दिसत होते. त्यांना जेव्हा विचारण्यात आलं की तुम्ही हे काम आणखी किती दिवस करणार ? त्यांचे उत्तर ऐकल्यावर मला धक्काच बसका. त्यांचं उत्तर होतं unless and until, the total social and economic rehabilitation of the people is complete, we will never quit India. मी माझ्या मनाला प्रश्न विचारला, त्यांचं आपल्याशी कोणतं असं नातं आहे की त्यांना आपल्याबद्दल इतकी कळकळ वाटावी ?

धनंजय, माझं म्हणणं असं आहे की डॉक्टरला दुःखाच्या जितकं जवळ जाता येतं तितकं इतरांना जाणं शक्य नसतं. आणि त्यातही माझ्या सारखा संवेंदनशील डॉक्टर असेल तर तो पाच वर्षापेक्षा जास्त प्रॅक्टीस करुच शकत नाही कारण समाज त्याला आपल्याकडे येण्यासाठी खुणवत असतो. माझेकडे आलेले सर्व पेशंट हे शेतकरी कुटुंबातले. मी त्यांना

प्रश्न विचारायचो, तुम्ही काय करता? बस, काही नाही, शेती करतो हे त्यांचे उत्तर असायचे. मला दुःख एकच होचे की हा शेतकरी सतत निगेटीव्ह विचारांची पेरणी करत असतो. सकारात्मक विचार करण्याची त्याची मनोधारणाच नाही. तेव्हाच मी ठरविले की मला या समाजासाठी काही तरी करायचे आहे. मला एका परदेशी अर्थशास्त्रज्ञाचे वाक्य आठवले, इतकी नैसर्गिक संपत्ती असलेला भारत देश गरीब राहूच शकत नाही. त्याचा विचार डोळ्यासमोर ठेवून मी माझ्या कामाची आखणी केली व यांची गरीबी दूर करण्यासाठी कंबर कसली. मी माझ्या पत्नीचा सल्ला घेतला, तिला माझे विचार समजाऊन सांगितले आणि तिची संमती घेवूनच पुढचे पाऊल उचलले. तिचा सहकार्य मिळाले नसते तर मी काहीच करु शकलो नसतो.

**धनंजय : तुमच्या कामाची सुरवात तुम्ही बायो गॅस प्रकल्पापासून कशी काय सुरवात केलीत?**

**प्रसाद** : डॉ. माधवराव चितळे यांचे पासून मी WEHAB हा शब्द प्रयोग ऐकला होता. हा शब्द water, energy, health, agriculture and biodiversity या पाच इंग्रजी शब्दांच्या अद्याक्षरापासून बनलेला आहे. या सर्वांना चालना देणारा शब्द म्हणजे एनर्जी. शक्ती उपलब्ध झाली तर आपोआप सर्व गोष्टींना चालना मिळू शकते ही बाब लक्षात आल्यावर मी माझा मोर्चा ग्रामीण भागाला सर्वात स्वस्त शक्ती मिळवून देणाऱ्या बायो गॅस कडे वळवला. त्यातही माझ्या लक्षात आले की यंत्राचा डोम बनविताना लोखंडी सळ्या आणि चिकन मेश यांचा वापर हा ग्रामीण भागाला परवडण्यासारखा नाही. याला काही पर्याय असू शकतो काय असा प्रश्न मी माझ्या मनाला विचारला असता माझेसमोर बांबूचा पर्याय आला. मृत माणसाच्या अंत्ययात्रेसाठी तिरडी बांधतांना बांबूचा वापर सर्रास केला जातो. मृताचे वजन कितीही असले तरी रस्त्यात तिरडी मोडली आहे, असे आजपर्यंत कधीही घडले नाही, म्हणून बांबूचा पर्याय मला पसंत पडला. त्यातही माझ्या लक्षात आले की बारीक बांबू ची ताकद ही जाड बांबूपेक्षा जास्त असते. म्हणून त्याचा वापर करुन मी एक मॉडेल बनविले, त्याचेवर वेगवेगळे लोड देवून बघितले आणि मगच माझा निर्णय पक्का केला. कर्जासाठी जेव्हा मी नाबार्डला माझा प्रस्ताव दिला तेव्हा त्यांनी तो सपशेल नाकारला. बुद्धीवंतांना सामान्य माणसे मूर्ख वाटतात पण सामान्य माणसेच असामान्य काम करुन दाखवितात. शास्त्री आणि मिस्त्री यांची सांगड घलता आली तर बरीचशी कामे सोपी होवू शकतात असे माला वाटते. आता पावेतो आमच्या टीमने ६००० चे वर बायोगॅस प्लँट याच पद्धतीने तयार केले. हे सर्व प्लँट योग्य पद्धतीने चालू आहेत. माझे लक्ष्य २०००० आहे. तशी गरज विचारात घेतली तर या भागात ६०००० चे वर प्लँट असू शकतात अशी माझी धारणा आहे.




**धनंजय : कोकणाच्या विकासाला मोठे कारखाने व त्यांचे द्वारे होणारा विस्तार खरेच आवश्यक आहे काय याबद्दल तुझे काय मत आहे?**

**प्रसाद** : कोकणची शेती तुकड्यातुकड्यात विभाजित आहे. या शेतकऱ्याला स्वतःच्या पायावर उभे करणे हा माझा ध्यास आहे. त्यांची गरीबी हटवण्यासाठी त्याच्या आवाक्यातील प्रकल्पच त्याची सोडवणूक करु शकतील असा माझा विश्वास आहे. हीच थीम धरुन मी माझ्या संस्थेची कार्यकक्षा निश्चित केली आहे. एका व्यापाऱ्याने मला जेव्हा सांगितले की कर्नाटकातील होस्पेट इथून इथे दररोज दोन लाख अंडी आयात केली जातात तेव्हा मला धक्काच बसला. मी जेव्हा मागणीचा अंदाज घेतला तेव्हा असे लक्षात आले की कोकण व गोवा मिळून दररोज १० लाख अंड्यांची गरज आहे. हे लक्षात आल्याबरोबर आम्ही व्यंकटेश हॅचरीज, भगीरथ, जिल्हा बँक आणि व्यापारी याचे एक एमओयू तयार केले आणि आज आम्ही यात खूप यश संपादित केले आहे. एका एका गावात तीन लाख पक्षी ही आमची योजना आहे.

जी गोष्ट कोंबड्यांची तीच गोष्ट शेळ्यांची. आज दुर्दैव हे आहे की ज्यांचे जवळ शेळ्या आहेत त्यांचेजवळ शेती नाही व ज्यांचेजवळ शेती आहे त्यांचेजवळ शेळ्या नाहीत. शेळीपालन हा शेतीचा अविभाज्य भाग बनला पाहिजे असे माझे मत आहे. शेळीचे अर्थशास्त्र शिकणे ही काळाची गरज आहे. किती शेळ्या

पाळल्या तर तो व्यवसाय आर्थिक दृष्ट्या परवडू शकतो हे गणित शेतकऱ्याच्या गळी उतरवले पाहिजे. आमच्या अभ्यासाप्रमाणे २० शेळ्या अधिक एक बोकड असतील तर ते अर्थशास्त्रीय दृष्ट्या फायदेशीर ठरते. एमबीए च्या विद्यार्थ्यांना आम्ही प्रोजेक्ट देवून या निष्कर्षावर आलो आहोत. निव्वळ आमच्या अहवालावर जिल्हा बँक शेतकऱ्याला १ लाख रुपये कर्ज देते. आता पावेतो २२ लाख रुपयांचे कर्जवाटप जिल्हा बँकांनी केले आहे. सरकारी अधिकारीही आता आमचेवर विश्वास टाकायला लागले आहेत. सर्वच सरकारी अधिकारी वाईट नसतात. त्यांचेपैकी राजहंस कोण हे मात्र आपल्याला शोधून काढावे लागते. आमच्या पुरस्कारावर आतापर्यंत ६ कोटी रुपयांचे एकूण कर्ज वाटप झाले आहे.

**धनंजय : शेतकरी प्रशिक्षणात तुम्ही मोठी आघाडी घेतली आहे. तुमचे प्रशिक्षण महागडे असून सुद्धा शेतकरी तिथे गर्दी करतात असा अनुभव आहे. त्यावद्दल आम्हाला माहिती सांगा ना.**

**प्रसाद** : या प्रशिक्षणाचे संदर्भात आम्ही उत्कृष्ट नियोजन केलं आहे. बायो गॅस , कोंबडी पालन, शेळी पालन या क्षेत्रात हे प्रशिक्षण असतं. आम्ही यासाठी १५०० रुपये फी आकारतो. शेतकरी ती देतात कारण त्यांना त्याची उपयुक्तता पटली आहे म्हणून. आमचा जो मास्टर ट्रेनर आहे त्याला आम्ही १००० रुपये मानधन देतो. विद्यापीठात एका भाषणाचे २५० रुपये दिले जातात. जशी फी तसा शिक्षणाचा दर्जा. आम्ही वेळेचे काटेकोरपणे पालन करतो. आम्ही आमच्या कामाला प्रोफेशनल स्वरुप दिले आहे, कमर्शियल नाही.

आमचे कडे खूप मोठ्या प्रमाणात व्हिझीटर्स येत असतात. आमचे प्रोजेक्ट हे काही पिकनिक स्पॉट नाही. कोणीही यावे व आमचा वेळ वाया घालवावा याला आम्ही पायबंद घातला आहे. आम्ही त्यांचेकडूनही फी आकारतो. पहिली १५ मिनिटे आम्ही कोणतेही शुल्क आकारत नाही पण त्यानंतर मात्र आम्ही ६०० रुपये शुल्क आकारतो. आम्ही आमचा बँड निर्माण करण्यात यशस्वी ठरलो आहोत.

आम्ही मुलींसाठी सायकल प्रशिक्षण सुद्धा सुरु केलं आहे. गावातील मुलींपैकी फक्त १० टक्के मुलींनाच सायकल चालवता येते हे लक्षात आल्यावर आम्ही हा प्रयोग सुरु केला. मुलींना फुकट सायकली वितरण केले जाऊ नये असे आमचे मत आहे. त्यांना कर्ज द्या, वाटल्यास व्याज माफ करा अशी आमची सूचना आहे. जिल्हा बँक व सारस्वत बँकेनी आतापर्यंत २००० मुलींना सायकल कर्ज मंजूर केले आहे. विकासाची कोणतीही प्रक्रिया ही स्त्री केंद्रित करावी असे आम्हाला वाटते. स्त्रीचे वैशिष्ट्य असे आहे की तिला १० रुपये खर्च करायला दिले तर ती २ रुपये वाचवते तर पुरुषाला १० रुपये दिले तर तो ते खर्च करुन २ रुपयांची उधारी करुन येतो.

आम्ही एखादे गाव जेव्हा आमचे कामासाठी निवडतो त्यावेळी सुरवातीला त्या गावाला १५००० रुपयांचे एक पॅकेज देतो. त्या गावात कॅरम, बुद्धीबळ, व्हॉलिबॉल या सारख्या खेळांचे वाटप करतो. तिथल्या शाळांना डिजिटल करतो. शाळांना परिवर्तित करा, गावात आपोआप बदल दिसून येतील.

गावाने पर्यटन विकासावर लक्ष केंद्रित करावे अशी आमची योजना आहे. तीन महिन्याचे पीक जेवढे पैसे देते तेवढे पैसे पर्यटक एका दिवसात देतो हे आपल्याला कधी कळणार?

**धनंजय : जलसंधारणाबद्दल आपण जास्त जागरुक आहात. या क्षेत्रात आपण काय काम केले?**

**प्रसाद** : आमची श्री. उल्हास परांजपे यांची भेट फारच मोलाची ठरली. अत्यंत कमी खर्चात पाणी कसे जमवायचे हे आम्हाला परांजपे यांनी शिकवले. इतके वयस्कर असून सुद्धा त्यांचा उत्साह तरुणांना लाजवणारा आहे. आमच्या गवंड्यांनी त्यांचे तंत्र इतके अवगत केले आहे की एक गवंडी आजकाल २.५ लाख रुपये कमवायला लागला आहे. या कामासाठी लिटरमागे येणारा १ रुपया खर्च शेतकऱ्यांना परवडणारा आहे. आमचा एक गवंडी विमानाने उत्तराखंडला जाऊन तिथे काम करुन आला. एका गवंड्याने केलेला हा पहिला विमान प्रवास फारच बोलका आहे. आज हिंजेवाडीचे आयटी सेक्टरमधले एखादे कार्यालयसुद्धा एवढे पॅकेज आपल्या कर्मचाऱ्याला देवू शकत नाही. काही गवंड्यांनी तर २ लाख लिटरच्या पाण्याच्या टाक्या बांधलेल्या आहेत.

ग्रामीण विकासाला आम्ही एक नवीन दिशा देण्यात यशस्वी ठरलो आहोत असे मला शेवटी म्हणावेसे वाटते.




*****

# कवी संमेलन





सूत्रसंचालक

**अध्यक्ष : श्री भीमराव धुळमुळे**
**सूत्रसंचालक : श्री. अरूण इंगवले**

दहाव्या जलसाहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रातील सायंकाळ एक वेगळा माहोल बनवून गेली. चिपळूण येथील वीरेश्वर मंदिरासमोर स्व. भवरलाल जैन नगरातील कृषीभूषण स्व. रणजीत खानविलकर व्यासपीठावर जलकाव्याचे मेघ बरसले.

या संमेलनात एकूण पंधरा कवी सहभागी झाले होते. केवळ जगण्यावरच्या प्रेमाचा सौंदर्यवादी दृष्टीकोन आणि कलात्मक अनुभव देणारी कविता कवीची मन:शांती टिकवू शकत नाही तर जगण्याच्या धडपडीत अनुभवाला आलेले वेगवेगळ्या पातळ्यांवरचे अनुभव शब्दबध्द केल्यावरच अस्वस्थ कवी थोडा स्वस्थ होतो आणि ती कविता ऐकणारे रसिक अस्वस्थ होतात. हा अनुभव या पंधरा कवींनी श्रोत्यांना दिला.

पुण्यातून आलेल्या विनिता पिसाळे यांनी ‘आजकाल भरवसा राहीला नाही – पावसा तुझा सुध्दा’ असं म्हणत अनियमित पावसाबद्दलच्या स्त्रीच्या भावना व्यक्त केल्या. ‘सावकाराच्या फेऱ्यातून गंथण तरी सुटलं ’ असं म्हणणारी भावूक तरीही आशावादी स्त्री त्यांनी रेखाटली. संतोष गोंडभले यांनी कोकणातल्या कुणबी भाषेतला गोडवा असणारी कविता श्रोत्यांची पसंती घेवून गेली. डोंबिवलीच्या नारायण लाळे, यांनी विहीरीचं शब्दचित्रच रेखाटलं. गूढता, नैराश्य आणि त्यातून विहीरीला जवळ करून आयुष्य संपवणारी अनेक माणसं यात ते रूदन काव्य होतं. ‘खूप कोसळतोय पाऊस आणि वाहून जातय जित्राप’ असं सांगत मोहन कुंभार यांनी ओलीवीना निस्तेज होणारी पुढच्या पिढीची स्वप्न रेखाटली. गुहागरचे कवी ज्ञानेश्वर झगडे यांनी शहर आणि खेड्यातल्या जीवनाची तुलना करत विदारक सत्य रेखाटलं.

इश्वरचंद्र हलगरे यांनी विदर्भातल्या नव्या नवरीची मन:स्थिती रेखाटली. पाण्यासाठी ‘लाज’ सोडून ती घराबाहेर हिंडते आहे. रानोमाळ हिंडतांना जीव घालमेला । दुष्काळात जीव बाई लई स्वस्त झालं, पाण्याचं महत्व सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी केवळ --------------- हा काव्यसंग्रह लिहिणारे




जलसंवादचे प्रकाशक श्रीधर खंडापूरकर यांनी शिक्षण व्यवस्थेचा आणि जीवनजगण्याचा कसा संबंध राहिला नाही त्याचं विदारक सत्य आपल्या काव्यातून मांडले. 'गल्ली बोळात पिकल्या शाळा, दूर करू शकल्या नाही अजूनी दुष्काळा' शासनाच्या योजनांना सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी कवितांना गीतमूल्य देणारे कवी राष्ट्रपाल सावंत. संगीतकार विठ्ठल उमप यांनी त्यांच्या काव्याला चाल दिली आणि अतिशय सुरेल आवाजात हे गीत कर्णमधुर झालं.

झालं ओसाड माळरान । आता कळाया लागलं।
पाणी, पाणी, पाणी करून । शेत सुकाया लागलं।।

प्रा. मनाली बावधनकर यांनी निसर्गाच्या बिघडवणाऱ्या माणसाच्या वर्तनावर प्रश्न निर्माण करणारी कविता ऐकवली.

काव्यसंध्येच्या या मैफिलीत कवी चंद्रकांत पोतदार यांच्या काव्याने शेरोशायरीची जागा घेत प्रक्षकांची मनं जिंकली. इहवादी जीवनदृष्टीचं तत्वज्ञान मांडतांना स्त्रीच्या व्यथा त्यांनी तरल उपमातून व्यक्त केल्या. त्यांच्या काव्यातील स्त्री म्हणते 'एका एका थेंबासाठी जणू आयुष्य दळते' रडण्यासाठी आता डोळ्यातही पाणी नाही, हे वास्तव श्रोत्यांना अस्वस्थ करून गेलं. पाण्याची विविध स्थलं, रूपं, भावना व्यक्त करणारी दीर्घ कविता आयुष राठोड यांनी ऐकवली.

प्रेक्षकांचा ताणतणाव हलका व्हावा यासाठी सूत्रसंचालक लेखक, कवी, पत्रकार असलेले अरूण इंगवले यांनी आपल्या 'पावसाची बायको' या कवितेतून विनोदाचा शिडकावा केला. शेवटी पावसाची बायको म्हणते मी माणूस नाही, नाहीतर यांना विकून मालामाल झाले असते.

राजेंद्र आरेकर यांनी आर्तता, व्याकुळता व्यक्त करत पाण्याची याचना केली.

नंतर, कवी, कादंबरीकार श्रीराम दुर्गे यांनी सादरीकरणाचा आदर्श दाखविला. मराठावाड्यातील बोलीभाषेतील त्यांची कविता पूर्वीचं पाण्याचं वैभव आणि सद्यस्थिती यावर प्रकाश टाकणारी 'धरणीमायचं वस्त्रहरण' – महाभारतातल्या प्रसंगाहून भीषण ! शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं दुःख त्यांनी 'शेकडो कुंकू पुसतात, चुडे फुटतात' या शब्दात केलं.

शेवटी अध्यक्षीय भाषणात मीरजेचे भीमराव धुळमुळे यांनी या काव्यसंध्येचा आढावा घेतला. हे वायूरूप सत्र, मेघवर्षावा सारखं ठरलं असं म्हणत त्यांनी पाण्यासारख्या विषयासाठी कवीसंमेलन घेणाऱ्या लोकमान्य टिळक वाचनालयाला धन्यवाद दिले. काव्यकल्पना सत्यात उतराव्यात, केवळ हे बोबडे बोल न ठरता संशोधन प्रक्रिया व्हावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अनेक अंकांमधून त्यांच्या कविता प्रसिध्द होतात, आकाशवाणी साठीही लेखन करणारे भीमराव अनेक ठिकाणी निमंत्रित कवी, अध्यक्ष या नात्याने सहभाग घेतात.

घन व्याकुळ होवून रडतो। की पाऊस आहे पडतो।
रूजवावे ज्याने बीज। तो फुल कळ्यांना खुडतो।

असं म्हणत त्यांनी निसर्गचक्र बिघडल्याचे सूचित केले. व्यासपीठासमोर कावेरी, सिंधू, नर्मदा, झमझम, ब्रम्हपुत्रा, वशिष्टी



अशी विविध भारतभरातील पंचवीस नद्यांतील जल कलशांमध्ये मांडलेलं पाहून ते म्हणाले की भारतातल्या नदीजोड प्रकल्पाची ती नांदी ठरावी.

अशा प्रकारे या कवी संमेलनात आपापल्या वृत्तीप्रवृत्तीतून पहिल्या पावसाच्या मृगंधाचा दखल पसरवला आणि पंचेंद्रीयांना माणसाच्या विवेकबुध्दीला आणि कृतीशीलतेला आवाहनही केले. या कविता हलक्या फुलक्या नव्हत्या किंवा धुंदफुंद प्रेमाच्या नव्हत्या. तर जीवनविषयक वास्तव स्वीकारण्यासाठी सर्वांना नेणीवेतून जाणीवेत नेणाऱ्या होत्या.

भयकारी विरूपाचा कलात्मक साक्षात्कार देणारा हा कवीसंमेलनाचा अनुभव नक्कीच आगळावेगळा ठरला.

सूत्रसंचालक अरूण इंगवले यांनी प्रसिध्द कवींच्या काव्यांची जोड देत आणि समिक्षणात्मक टिपा देत रसिकांची अपेक्षा पूर्ण केली.




या कार्यक्रमांला डॉ. माधवराव चितळे, डॉ. दत्ता देशतर, चतुरंग कार्यकर्ते विद्याधर निमकर, विजय जोगळेकर, डॉ. दि.मा. मोरे, उल्हास परांजपे, आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

*****



# फेरोसिमेंट टाकीचे प्रात्यक्षिक

**श्री. उल्हास परांजपे**
**चिपळूण, मो : ०९८२०७८८०६१**



कोकणात पाणी साठवणूक वाढवण्यासाठी जे प्रयत्न होत आहेत त्यापैकी फेरोसिमेंटपासून बनवलेली पाण्याची टाकी हा एक मार्ग असू शकतो या विषय़ावर मुंबईचे श्री. उल्हास परांजपे गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. गावोगाव जाऊन ते प्रात्यक्षिकाच्या सहाय्याने या मार्गाने जल साठवणूक कशी केली जाते हे समजाऊन सांगण्यासाठी शहरी त्याच प्रमाणे ग्रामीण भागात भ्रमण करीत असतात. नुकतीच त्यांनी या संबंधात एक मार्गदर्शक पुस्तिका पण तयार केली आहे जी वाचून विनासायास सामान्य माणूसही या पद्धतीचा अवलंब करु शकतो. जल साहित्य संमेलनाच्या आयोजकांनी संमेलनात या तत्वाचा प्रचार व्हावा या उद्देशाने श्री परांजपे यांना पाचारण केले होते. भाषण देण्य़ापेक्षा त्यांना प्रत्यक्ष टाकी बांधण्याबद्दल विनंती करण्यात आली. पद्धतीतील सोपेपणा सामान्य माणसाला उमजावा या उद्देशाने त्यांनी हे आमंत्रण स्विकारले व सम्मेलनाच्या परिसरातच त्यांनी अत्यंत कमी वेळात टाकी बांधून सुद्धा दाखविली.

सामान्य माणसाला ही कल्पना नवीन असल्यामुळे उपस्थित प्रतिनिधींनी साइटवर गर्दी केली होती व त्यांचे डोळ्यासमोर हळूहळू टाकी प्रत्यक्ष रुप धारण करु लागली. एक चौथरा बांधायचा, त्या चौथऱ्यावर तारांची जाळी उभी करायची, च्या जाळीला सिंमेंट व रेतीचा मिश्रण लिंपायचे, व सांगाडा स्थिर झाल्यावर त्यावरुन गिलावा (प्लॅस्टर) करायचा इतकी ती सोपी पद्धत होती. इतक्या कमी खर्चात सहजपणे टाकी बनत असेल तर आपल्या परसात अशी टाकी बांधून पाणी जमा करायला काय हरकत आहे असा विचार प्रत्येकाच्या मनात आल्याशिवाय राहिला नाही.

टाकीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर उपस्थितांच्या प्रश्नांना श्री. परांजपे यांनी समर्पक उत्तरे दिली. एकत्र येवून काम करण्यासाठी भारतीय ग्रामीण मन सहसा तयार होत नाही म्हणून व्यक्तीगत पातळीवर पाणी जमा करण्यासाठी काय करता येईल याबद्दल श्री. परांजपे यांनी विचार केला व त्यातून ही टाकी बांधण्याची कल्पना त्यांना सुचली. आपल्या अंगणात अत्यंत कमी खर्चात जर आपण ४–५ हजार लिटर पाणी जमा केले तर आपली पूर्ण जरी नाही तरी अंशत: गरज पूर्ण करु शकलो तर पाणी प्रश्नाला बगल देवू शकू हा विश्वास लोकांच्या मनात निर्माण करण्यात आपण यशस्वी झालो आहोत याची ग्वाही त्यांनी दिली. येणारा खर्च तरी किती हो? जमिनीच्या खाली टाकी बांधली तर लिटरमागे २–३ रुपये, जमिनीच्या वर बांधली तर ३–४ रुपये व घुमटाकार टाकीसाठी लिटरमागे ४–५ रुपये इतका हा कमी खर्च सामान्य माणसाला सहज परवडू शकतो असे त्यांचे मत पडले.

या टाकीचा वापरही वेगवेगळ्या मार्गांनी केला जाऊ शकतो हीही एक जमेची बाजू त्यांनी सांगितली. पाणी साठवण्यासाठी या टाकीचा वापर तर होतोच होतो पण स्वच्छता गृहासाठी, स्नान गृहासाठी एवढेच काय तर गांडुळ खताच्या निर्मितीसाठीही अशा टाक्या कामी पडू शकतात यावर त्यांनी भर

दिला. महाराष्ट्रात आतापावेतो त्यांनी २०० च्या वर अशा टाक्या बांधून जनतेचे जलप्रबोधन केल्याचे त्यांनी सांगितले. टाकीचा आकार काय असावा या बाबत व्यक्तीच्या गरजेप्रमाणे आकार हे माझे सूत्र आहे, पहिले आपली गरज काय आहे हे ठरवून मगच प्रत्यक्ष कामाला हात घालावा असे त्यांचे म्हणणे दिसले. रायगड जिल्ह्यात कोंडाणे (तालुका: कर्जत) येथे त्यांनी एक म्यझियमसुद्धा उभारले आहे ही माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली.

सहसा संमेलनात, चर्चासत्रात भाषणे होतात पण प्रत्यक्ष प्रयोग अभावानेच आढळतात. त्यांना आयोजकांनी अशी संधी उपलब्ध करु दिली त्याबद्दल त्यांनी आयोजकांचे आभार मानले.

*****



## दिनमहात्म्य

**फेब्रुअरी २: जागतिक पाणस्थळ दिवस :**

सन २ फेब्रुवारी १९७१ ला पाणस्थळ जागा वाचवण्यासाठी आणि त्यांचा विकास करण्यासाठी रामसार या इराण मधील शहरात भरलेल्या जागतिक परिषदेत पाणस्थळ जागा आणि त्यातील जैवविविधता टिकवण्यासाठी झालेल्या कराराची आठवण सर्वांना रहावी म्हणून २ फेब्रुवारी दिवस पाणस्थळ दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो.

रामसार हे शहर कॅस्पियन समुद्राच्या काठावर इराणमध्ये आहे. जागतिक पाणस्थळ दिवस १९९७साली सर्वात प्रथम साजरा करण्यात आला होता.१९९७ पासून परिषदेच्या वेबसाईटवर जगभर घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिलेली असते. हादिवस साजरा करण्याचा प्रमुख उद्देश आहे लोक जागृती करण्याचा. पाणस्थळ जागा या जैवविविधतेचे आगर असल्याने त्यांच्या संरक्षणाची, संधारणाची आणि संवर्धनाची नितांत गरज आहे. हे काम लोक सहभागाशिवाय होणे कठीण आहे. आप्ल्या देशात ही अनेक चांगल्या पाणस्थळ जागा तलाव, नद्या आणि खाड्यांच्या रुपाने अस्तित्वात आहेत. पण आपण त्यांच्याकडे निव्वळ कचरा आणि सांडपाणी निर्गतीच्या जागा म्हणूनच पहात असतो. हा विचार बदलण्यासाठीच तर २ फेब्रुवारी हा दिवस जागतिक पाणस्थळ दिवस म्हणून साजरा केला जातो.

**फेब्रुवारी २१– आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन :**

ढाका विद्यापीठ, ढाका , बांगला देश च्या आवारात शहिद मिनार नावाचे स्मारक आहे. ते स्मारक २१ फेब्रुवारी १९५२ ला ज्या लोकांनी ढाका, बांगला मातृभाषेसाठी बलिदान दिले त्यांचे स्मरणार्थ बांधण्यात आले आहे. १७ नोव्हेंबर १९९९ला युनेस्कोने २१ फेब्रुवारी हा दिवस आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. त्यानंतर त्याचा स्विकार युनोनेही केला त्याबाबत जनरल असेंब्लीत ठरावही केला.

# सत्र तिसरे - कोकणातील पाणी आणि पर्यटन विकास



सूत्रसंचालक

**अध्यक्ष : डॉ.चंद्रकांत मोकल**
**वक्ते : कॅप्टन दिलीप भाटकर, इंजि.गजानन देशपांडे**
**सूत्रसंचालक : धीरज वाटेकर**

**१० वे जलसाहित्य संमेलन, चिपळूण जि.रत्नागिरी**
**दिनांक १३ ते १५ जानेवारी,२०१७**
**कोकणच्या पर्यटन विकासात देशाला समृध्द करण्याची ताकद**

गेल्या दहा पंधरावर्षांपूर्वीपासून "पर्यटन विकास" हा कोकणामध्ये परिवलीचा शब्द बनला आहे. कोकणचं पर्यटन दिवसांगणिक वाढत जाणारं आहे. कोकणात पाणी भरपूर आहे, जेथे भरपूर पाणी आहे, तिथे समृध्दी ही अधिक असते. या समृध्दीच्या ओढीच्या दिशेने संपूर्ण जगभरातील पर्यटक नागरिक कोकणात येत असतात. येणाऱ्या या पर्यटकांना सामावून घेणे, त्यांना अधिकाधिक चांगल्या सुविधा देणे हे काम कोकण म्हणून सर्वांना करायच आहे. उपलब्ध असलेल्या पाण्याचा पर्यटनांच्या विकासामध्ये कसा उपयोग करुन घेता येईल या धारणेतून या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी वक्त्यांनी या विषयाचे अनेकविध पैलू उलगडत पर्यटन व्यवसायातील संधी आणि मर्यादा लक्षात आणून दिल्या..

कोकणात पाणी भरपूर आहे. कोकणातील पर्यटन व्यवसाय पाण्याला धरुन वाढतोय. मात्र जागतिक दर्जाचे पर्यटक कोकणात येत नाहीत. पर्यटनविषयक मान्यताप्राप्त जागतिक स्थळांमध्ये कोकण कुठेही दिसत नाही. पर्यटन व्यवसायाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या विविध मानकांची पूर्तता केली तर कोकणचा झेंडा या ठिकाणी फडकविता येऊ शकतो. त्यामुळे कोकणामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटक अधिक संख्येने येऊ शकतील. वास्तविक पाण्याची प्रचंड संपत्ती कोकणात आहे, ती ताकद जगापुढे आणण्याची गरज आहे. परदेशातून भारतात येणाऱ्या पर्यटकांपैकी सर्वात प्रथम मुंबईत येणाऱ्या पर्यटकांची संख्या सर्वाधीक असते. या पर्यटकांना कोकणाकडे वळविले तर पाणी आणि पर्यटन यांचा खऱ्या अर्थाने विकास होऊ शकतो, असे विवेचन सत्राच्या प्रारंभी धीरज वाटेकर यांनी केले. पुढे चर्चासत्रात सहभागी झालेल्या वक्त्यांनी हाच धागा पकडत पर्यटन विकासाचे आशादायक चित्र निर्माण केलं.

**माजी आमदार डॉ.चंद्रकांत मोकल :**


सुवर्णदुर्ग शिपींग ॲण्ड मरीन सर्व्हिसेस या कंपनीचे प्रमुख दापोलीचे माजी आमदार डॉ. चंद्रकांत मोकल हे या चर्चासत्राचे अध्यक्ष होते. जिल्हातंर्गत फेरी बोट वाहतुक व्यवसायामध्ये चंद्रकांत मोकल यांचे योगदान मोठे आहे. मुंबई-गोवा या नियोजित जलवाहतुकीसाठीही डॉ. मोकल यांचा अहर्निश पाठपुरावा सुरु आहे. कोकणात आधुनिक मसाला बाग उभारणीत ते आघाडीवर आहेत. आपल्या भाषणात त्यांनी पर्यटन व्यवसायाच्या अनुषंगाने कोकणातील सामर्थ्यस्थळांचा उहापोह केला. त्याचवेळी आपल्या दाराशी आलेल्या पर्यटकांशी "चांगले" बोलावे लागेल आणि ते मात्र आपल्याला शिकावे लागेल, असा डोस डॉ. मोकल यांनी कोकणवासीयांना दिला. काश्मिर, अंदमान-निकोबार, लक्षव्दीप, केरळ येथील पर्यटन स्थळांचा अभ्यास करुन कोकणवासीयांनी पर्यटन व्यवसायात बदल घडवून आणले पाहिजेत. स्वच्छ व मुबलक पाणी, समुद्र , मासे, खाडी, बेट, देवस्थाने, सह्याद्रीसारखा पर्वत, रेल्वे मार्ग, हायवे आणि काही ठिकाणी विमानतळ असा खजिना उपलब्ध आहे. मात्र अपेक्षित संख्येने पर्यटक येत नाही. दाभोळ खाडीसारखी खाडी चीनमध्ये असती तर संपूर्ण राज्याचं बजेट चालविलं असत, असं एका चीनी उद्योजकाने आपणास सांगितल्याचं ते म्हणाले.

**पर्यटकांशी गोड बोलावे लागेल :**

पर्यटकाला काय लागते? पर्यटकाला शांतता हवी असते. चांगलं जेवण हवं असतं. करमणूक आणि राहण्यासाठी चांगली जागा हवी असते. त्याला समुद्र बघायचा असतो, मासेमारी करायची असते. दुष्काळी भागातील लोकांना तर येथील पावसाचेही आकर्षण असते. पाऊस पाहण्यासाठी देखील पर्यटक येतात. हे सर्व निसर्गाने आपल्याला भरपूर दिलय. कशाचं भांडवल करायचं हे मात्र आपल्या हातात आहे. या सर्व गोष्टींची माहिती करुन द्यावी लागेल, यासाठी खूप काम करावे लागेल. आलेल्या पर्यटकांशी गोड बोलावे लागेल. पर्यटन हा शंभर टक्के नफ्याचा उद्योग आहे. त्यासाठी स्थानिक मंडळींनी त्वेषाने पुढे आले पाहिजे. दुसऱ्याच्या अंगावर वस्त्र टाकून पर्यटन विकास साधणार नाही. गुंतवणूकीची क्षमता असलेल्या मंडळींना हेरुन त्यांना पर्यटन व्यवसायातील संधी पटवून देण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता डॉ. मोकल यांनी व्यक्त केली. ज्या चिपळून नगरीत हे जलसाहित्य संमेलन होतोय त्या चिपळून नगरीला बारमाही वाहणाऱ्या वासिष्ठी नदीची देणगी लाभली आहे. दाभोळ-गोवळकोट अशी फेरी बोट सुरु करता येईल. प्राचीन देवस्थाने या परिसरात आहेत. पर्यटन विकासासाठी हे भांडवल पुरेसे आहे, ज्या लक्षव्दीप बेटावर पर्यटन व्यवसाय दिवसेंदिवस वाढतोय त्या बेटावर केंद्र सरकारने बोटी उपलब्ध करुन दिल्या आहेत. कोकणातील बोट वाहतुक पुन्हा सुरु करायची असेल ,तर केवळ लायसन्स देऊन उपयोग होणार नाही. यासाठी आवश्यक असलेली गुंतवणूक वैयक्तिक पातळीवर अवघड आहे, शिवाय कोकणात सहकार रुजत नसल्यामुळे या मार्गानेही भांडवल उभारणी देखील अशक्यप्राय ठरते. त्यामुळे चिपळून खाडीचा विकास हे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन ठोस उपाययोजना केल्या तर पर्यटन विकासाला चालना मिळेल. त्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा यासाठी जनमताचा दबाव निर्माण होणे आवश्यक आहे, त्यासाठी जलसाहित्य संमेलनाचे व्यासपीठ प्रबोधनाचे काम चांगल्यापध्दतीने करु शकते, असे प्रतिपादन डॉ.मोकल यांनी केले.

**कॅप्टन दिलीप भाटकर :**

मरीन इंजिनिअर असल्यामुळे जगातील २७ देशांमध्ये भटकंती केलेल्या आणि गुहागर तालुक्यात काताळे येथे स्वत:चे बंदर असलेल्या कॅप्टन दिलीप भाटकर यांनी कोकणातील पाणी पर्यटन याविषयी अत्यंत व्यावहारिक पातळीवर विचार व्यक्त केले. कॅ.भाटकर यांनी मरीन सिंडीकेटस् कंपनीच्या माध्यमातून जयगडच्या खाडी किनाऱ्यावर "फ्लोटिंग डॉक" उभारला असून येत्या पंधरा दिवसात तो कार्यान्वित होणार आहे. गोवा फक्त दोन नद्यांमुळे संपन्न आहे. मांडवी नदीने पर्यटनाच्या माध्यमातून तर झुवारीने खनिज संपत्ती वाहतुकीच्या माध्यमातून गोव्याच्या वैभवात भर घातली आहे. आपल्या कोकणातील एकट्या रत्नागिरी जिल्हयात पाच सुंदर नद्या आहेत. परंतू आपण एकाही नदीचा विचार केलेला नाही. कुणी पुढे सरसावला तर मोर्चा काढण्यात कोकणी माणूस पुढे असतो. मला परदेशातील बंदरांमध्ये आढळले नाही ते कोकणातील बंदरांमध्ये आढळले. कोकणात पूर्वी गाजलेली बंदरे होती. आता हे वैभव लुप्त झाले आहे. पूर्वीप्रमाणे जहाज वाहतुक सुरु झाली तर, पर्यटन विकासाला चालना मिळू शकते. आर्थिक अडचणी आहेत, सबसिडी किंवा अन्य पॅकेज देऊन शासन मदत करु शकते.



रत्नागिरी–गणपतीपुळे–पावस या दरम्यानच्या किनाऱ्यावर क्रूझ बोट आली तर पर्यटक आकर्षित होऊ शकतात. भाट्याची निसर्गरम्य खाडी येथे उपलब्ध आहे. चिंचखेडीचे सुंदर मंदिर तेथे आहे, शिवाय शिंपल्यांपासून चुना करण्याचे काम तिथे चालते. हे सौंदर्य पर्यटकांना दाखविता येईल. या खाडीचा विकास करणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाच्या पर्यटन विभागाने पुढाकार घेतला पाहिजे, शिवाय आपणही पुढे आलं पाहिजे, असे मत त्यांनी नोंदविले. कोकण किनाऱ्यावरील बंदरांचा आवाका लक्षात घेऊन येथे छोटी छोटी बंदरे विकसित केली पाहिजेत. कोकणात उपलब्ध असलेल्या नद्या आणि खाड्या जर पश्चिम महाराष्ट्राला मिळाल्या तर त्यांनी सोनं केलं असते. कोकणातील खाड्या आणि किनारा संपूर्ण देशाला समृध्द करु शकतो असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपला मरीन सिंडिकेट समुह कोकणच्या पर्यटनासाठी सतत काम करतो,यापुढेही अधीक जोमाने करीत राहणार आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. परंतु आपल्या पर्यटन विकासाच्या नौकेचे शीड कुणीतरी टाकायला तयार व्हावे हे, असे आवाहन त्यांनी केले.





**इंजि. गजानन देशपांडे :**

निवृत्त अभियंता तसेच भारतीय जलसंस्कृती मंडळाचे सचिव गजानन देशपांडे यांचे या सत्रात अतिशय अभ्यासपूर्ण भाषण झाले. पर्यटन उद्योग विषयक आकडेवारीची लीलया पखरण करीत एकूणच पर्यटन उद्योग, उलाढाल आणि जीडीपीमधील वाटा यासंबंधीचे विश्लेषण त्यांनी केले. भारतात पर्यटनाची प्राचीन परंपरा आहे. चारधाम यात्रा, तीर्थांटन या धार्मिक श्रध्दांच्या मागे पर्यटन हाच हेतू होता. जागतिक पर्यटन संघटनेच्या एका अहवालानुसार १९५० मध्ये पर्यटकांची संख्या अवघी अडीच कोटी होती, ती सन २०१५ मध्ये ११३ कोटीच्या घरात गेली आहे. जगातील काही देशांचे पर्यटनाच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न जीडीपीच्या ९ टक्के आहे. भारताचा क्रमांक ४० आहे. देशपातळीवर भारताने पर्यटनाचे महत्व ओळखले आहे. अनेक सुधारणा केल्या. परंतू महाराष्टाने नेमकं काय केलं? महाराष्ट्र पर्यटन महामंडळाचं नेमकं काही धोरण आहे काय? कोकणातील खाड्या, नौकायन, जलक्रीडा या साठी सुविधा वाढवाव्या लागतील. आमच्या सारख्या दुष्काळी भागात राहणाऱ्यांनी वाहती नदी कधी पाहिली नाही, त्यांना कोकणातील बारमाही वाहणाऱ्या नद्याचं आकर्षण असतं. आमच्यासाठी कोकण हे स्वप्न आहे. वाशिष्ठी नदी, निर्मळ खाड्या हे सुख फक्त कोकणातच आहे. भरती–ओहोटी या गोष्टी घाटावरच्या लोकांना माहितच नाहीत. या ओढीने कोकणात आलेल्या पर्यटकाला दर्जेदार सुविधा देण्याचा वेग वाढवावा लागेल. कोकणच्या पर्यटन विकासाचा पाणी हा आश्वासक स्त्रोत आहे, तो सध्या मुबलक आहे. नियोजनपूर्वक त्याचा उपयोग व्हावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. चर्चासत्राच्या प्रारंभी या सर्व मान्यवरांचे स्वागत लोकमान्य टिळक स्मारक मंदिराच्या संचालिका वसुंधरा पाटील यांनी केले.




*****

# सत्र चवथे - कोकणातील पाणी आणि औद्योगिकीकरण





सूत्रसंचालक

**अध्यक्ष : श्री.संजय यादवराव**

**वक्ते : विनोद रापतवार डॉ.दत्ता देशकर, डॉ.अनिलराज जगदाळे**

**सूत्रसंचालक : सौ.मनिषा दामले, सौ. प्राची जोशी, मो.९८२३५२१९६२ -चिपळूण**

**१० वे जलसाहित्य संमेलन, चिपळूण जि.रत्नागिरी**
**दिनांक १३ ते १५ जानेवारी,२०१७**
**रविवार दिनांक १५.१.२०१७ - सकाळी ते ११ ते १.००**

कोकणला विकासाचा पहिला हप्ता आला तो लोटे परशूराम, पाताळगंगा, महाड एम.आय.डी.सी., रोहा एम.आय.डी.सी. या निमित्ताने. या विकासाचा परिणाम असा झाला की सावित्री नदीचं पाणी कोकाकोला सारखं दिसायला लागलं. शिवाय जगबुडी आणि वाशिष्ठी नदी या सुंदर नद्यांची वाताहत करण्याचं काम विकासाच्या या पहिल्या हप्त्यानं केलं. केमिकल्स इंडस्ट्रीज कोकणाला दिल्या गेल्या. त्या अन्य ठिकाणी नेता येणं शक्य होतं. मात्र कोकणाकडे त्या वळविण्यात आल्या. त्यामुळे शासनाकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला. कोकणवासीयांची मानसिकता नकारात्मक का? या प्रश्नाचं उत्तर गेल्या तीस-चाळीस वर्षांपासून सातत्याने घडणाऱ्या अशा स्वरुपाच्या घटनांमध्ये आहे. त्यामुळे काही आलं तरी विरोध करायचा अशी मानसिकता निर्माण झाली. याचा फटका दहा हजार जणांना रोजगार देण्याची क्षमता असलेल्या प्रकल्पांस देखील बसतोय. जे वाईट आहे ते थांबवावं लागेल आणि जे चांगलं आहे ते स्वीकारावे लागेल. या चर्चासत्राच्या निमित्ताने सुवर्णमध्य निघावा असा आशावादी व सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन मान्यवरांनी विधायक चर्चा केली.





**संजय यादवराव :**

"कोकणातील पाणी आणि औद्योगिकरण" या विषयाच्या अनुषंगाने चर्चेची दिशा अत्यंत

मोजक्या शब्दात या चर्चासत्राचे अध्यक्ष संजय यादवराव यांनी प्रारंभीच मांडली. सॉप्टवेअर इंजिनिअर असलेल्या संजय यादवराव यांनी लठ्ठ पगाराची नोकरी सोडली आणि अनेक वर्षांपासून उराशी बाळगलेले कोकण विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी नियोजबध्द प्रयत्न सुरु केले. "कोकण भूमी प्रतिष्ठान" या संस्थेच्या माध्यमातून संजय यादवराव यांचे कार्य सुरु आहे. ते म्हणाले : गावागावांमध्ये बदल घडवून आणणाऱ्यांची आज गरज आहे. माणसाला नदीशी जोडणे महत्वाचे आहे. शेतकऱ्याला धरणाशी जोडणे महत्वाचे आहे. अर्जुना, गांधारी, जगबुडी, जानवली या नद्यांच्या किनाऱ्यावरची गावे जलसमृध्द करुन आर्थिक समृध्दी आणायला हवी. कोकणात पाणी खूप आहे, परंतू समृध्दी ही हा विचारही कृती आणायला हवा. लोटे येथील औद्योगिकरणामुळे प्रदूषण वाढलं आहे. नद्या प्रदूषित झाल्या आहेत. अशा उद्योगांना खतपाणी घालू नका. ते थांबवा. पर्यावरणाशी सुसंगत असा विकास व्हायला हवा. भविष्यात पुरेसे रस्ते, बंदरे, शिक्षणसंस्थांचा विकास व्हायला हवा. जलसाठ्यांचा विकास आणि स्थानिक संसाधनाचा उपयोग करुन उद्योगांची वाढ होणे अपेक्षित आहे. सकारात्मक दृष्टीकोन बाळगून सर्वंकष विकास योजना तयार होण गरजेचे आहे, असे मत संजय यादवराव यांनी व्यक्त केले.

**विनोद रापतवार :**




त्यानंतर जैन इरिगेशनचे ज्येष्ठ अधिकारी यांनी विचार व्यक्त केले. निसर्ग वैभवाचं लेणं लाभलेल्या कोकणातील विकास प्रक्रियेच्या परिवर्तनाची तीन टप्प्यांमध्ये त्यांनी विभागणी केली. ब्रिटिश राजवटीत १८५२ मध्ये ठाण्यापर्यंत रेल्वे सुरु झाली. त्या रेल्वेच्या चाकांनी कोकणचा चेहरा पहिल्यांदा बदलला. स्थलांतराला साधन मिळाले. विकासाची आशा जागविली. दुसरा टप्पा कोकण रेल्वेचा. १८८० मध्ये पहिल्यांदा आराखडा तयार झालेल्या या योजनेची अमलबजावणी शंभर वर्षांनंतर झाली. त्यानंतर १९९५ मध्ये प्रथमच सत्तेत आलेल्या युतीच्या राजवटीत कोकणविकासाचा तिसरा टप्पा सुरु झाला. सिंधू महोत्सवाच्या भव्य दिव्य आयोजनामुळे पर्यटन विकासाला दिशा मिळाली. मात्र सरकार बदललं. अमलबजावणी करणारी च्शासकीय यंत्रणा तिच असली तरी प्रकल्प थांबले. असे टप्पे का थांबतात याची उकल या व्यासपीठावर होण्याची आवश्यता आहे. कुणालाच कुठलेही काम करु द्यायचे नाही चर्चेचं गुऱ्हाळ मात्र सुरु ठेवायचं. १९९८ ते २०१७ या कालखंडावर नजर टाकली तर याची प्रचिती येते. या व्यवस्थेला छेद देणार कोण? हा खरा प्रश्न आहे. कोकणातील लोकांच्या अंगात काम नाही, असा आरोप होतो. छरंतु त्यात तथ्य नाही. येथील किल्ले, दुर्ग येथील लोकांनीच उभारले आहेत. ब्रिटीशांनी रेल्वे मार्गाची उभारणी केली, त्यांनी मजूर काही इंग्लंडमधून आणले नव्हते. बाहेरच्या माणसांनी येऊन येथे काम केलेले नाही. कोकणवासींच्या श्रमातून, घामातूच या प्रकल्पांची उभारणी झाली आहे. या पार्श्वभूमीवर परिवर्तनाची आस आतून प्रज्वलित झाली पाहिजे, अशी अपेक्षा रापतवार यांनी व्यक्त केली.

**डॉ.दत्ता देशकर :**

जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष, जलअभ्यासक डॉ.दत्ता देशकर यांनी कोकणातील पाणी आणि औद्योगिकीकरण या विषयावर अभ्यासपूर्ण विवेचन केले. देशाच्या विकासाचे मर्म उद्योजकतेत आहे. येथील तरुणाईने तंत्र आणि मंत्र याची कास धरायला हवी. आपल्या देशाला समुद्र किनाऱ्याचं वरदान लाभलं आहे. अवघ्या दोन अडीच तासांचा विमान प्रवास करुन अरब देशात पोहोचता येतं.



त्यामुळे समुद्रीय पदार्थ अरबदेशात पाठवून कोकणातील चलनवलन वाढविण्यास मदत होऊ शकते. यासाठी बंदरांचा उपयोग करता येईल. कोकणची भूमी सुजलाम् आहे. भाजीपाल्याची लागवड वाढवून, भाजीपाला निर्यात करण्याची चांगली संधी आहे. अर्थात भाजीपाला नाशवंत आहे हे मान्य. परंतू कांद्याची भुकटी करुन तसेच अन्य टिकावू पदार्थ तयार करुन ते परदेशी बाजारपेठेत पाठविता येणे शक्य आहे. कोकणसारखास सागरी किनारा लाभलेल्या त्रिवेंदममुळे केरळ मधील बहुसंख्य मंडळी आज अरब देशात स्थायिक होऊन तेथील व्यापार उदीमात योगदान देत आहेत. त्याप्रमाणे कोकणमधील किती जण आज अरब देशात स्थायिक होऊन व्यापार उदीम वाढवित आहेत? असा सवाल डॉ.देशकर यांनी उपस्थित केला. येथील उपलब्ध संधीचा लाभ घेत, उत्तम दर्जा राखत कमीत कमी वेळेत येथील पदार्थ अरब देशात कसे पाठविता येतील आणि कोकणचे अर्थकारण कसे बदलविता येईल असे विचार करणारे तरुण उदयोजक पुढे येणे आवश्यक आहे, असे मत डॉ.देशकर यांनी व्यक्त केले. उदयोजकतेच्या अवकाशात भरारी घेण्यासाठी कोकणवासीयांना जहाजे आणि बंदरे यांचे वरदान लाभले आहे. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीपेक्षा अत्यंत स्वस्त, कमी वेळेत मुंबईच्या बाजारात माल पाठविण्याचा पर्याय कोकणवासींसाठी उपलब्ध आहे. त्यामुळे तेथील स्पर्धेतच्या वातावरणात किंमत ठेऊन व्यवसाय करणे कोकणवासीयांना शक्य आहे. पर्यावरणाला कमीत कमी धक्का लागेल याची काळजी घेत जंगल आणि पाणी यांचा कुशलतेने वापर करत भरारी घ्या असे आवाहन त्यांनी कोकणवासीयांना केले. कोकणवासीयांना धोक्याचा इशारा देतांना ते म्हणाले जर तुम्ही हे काम केले नाही, तर बिहार, उत्तर प्रदेश आणि राजस्थान येथील माणसं येथे येऊन हे काम करतील. त्यावेळी तुमच्या हातात फक्त पश्चाताप करणे असेल, असा गर्भित इशारा त्यांनी दिला.

**डॉ. अनिलराज जगदाळे :**

प्रख्यात जलअभ्यासक प्राचार्य डॉ.अनिलराज जगदाळे म्हणाले : विकास म्हणजे जीवनमान उंचावण्याची संधी मिळणे. आपल्या भाषणात प्रारंभीच कोकणला लाभलेल्या समृध्दीची जाणीव करुन दिली. कोकणात भरपूर पाणी आहे. शेतीयोग्य जमीन आहे. खनिजसंपत्ती आहे. वीजनिर्मितीचे प्रकल्प येथे आहेत. मनुष्य बळाची ऊर्जा आहे. मंडळी हुशार आहेत. मात्र अभाव आहे, तो उद्योजकतेचा. या सर्व घटकांचा उपयोग करुन औद्योगिक विकास करायला हवा.




सध्या झालेले औद्योगिकीकरण तुटपुंजे आहे. पायाभूत सोयी सुविधांचा सध्या दर्जा समाधानकारक नाही. तो वाढवायला हवा. आधी पायाभूत सोयी सुविधा विकसित होणे गरजेचे आहे. येथील तरुणांनी नोकरीची मानसिकता बदलली पाहिजे. शहरात जाऊन चाकरी करण्यापेक्षा आपल्या बुध्दीमत्तेचा वापर करुन स्वत: उद्योजक होण्यासाठी पाऊल उचलं पाहिजे. समृध्दीचं साधन असलेलं पाणी आहे. त्यामुळे समृध्दी आलीच पाहिजे. कृतिशील मनुष्यबळ आहे. पाणी असूनही समृध्दी का नाही? यासाठी जलसाहित्य संमेलनासारख्या व्यासपीठांच्या माध्यमातून चिंतन मनन झालं पाहिजे. कोकणला निसर्गसंपदा लाभली आहे, मात्र जंगलतोड मोठ्याप्रमाणावर सुरु असल्याची चर्चा होत असते. या जंगलात अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती आहेत. स्थानिक वैदूंना या वनस्पतींची माहिती असते. त्यांना एकत्र आणून विश्वासात घेऊन त्यांच्या पारंपारिक ज्ञानाचा उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीने पावले उचलण्याची गरज आहे. पारंपारिक विकासाच्या योजना आता सोडल्या पाहिजे. पर्यावरण पूरक, निसर्गाशी सुसंगत विकास असला पाहिजे असे मत डॉ.जगदाळे यांनी व्यक्त केले.




With Best Wishes from....

**Shirke Consultants**

**Lion Dr. Suresh Shirke**
M.Tech(Lon), DIC (Lon) FIE, MIIPA

suresh18840@yahoo.com, sureshshirke@gmail .com
www.shirkeconsultants.com Cell: 98220 24203
Tel: 91020- 24226107,
Kaumudi Dnyaneshwar Society Sant Nagar, Pune, 411009. INDIA

# सत्र पाचवे - जलसाक्षरता प्रचार आणि प्रसार



सूत्रसंचालक

**अध्यक्ष : डॉ. श्री.विश्वास येवले**

**सहभाग : श्री.सतीश खाडे श्री.अभिजित घोरपडे**
**डॉ. उमेश मुंडले**

**सूत्रसंचालक : श्री.मधुसूदन केतकर, सौ. प्राची जोशी, चिपळूण**
**मो.९८२३५२१९६२**

**१० वे जलसाहित्य संमेलन, चिपळूण जि.रत्नागिरी**
**दिनांक १३ ते १५ जानेवारी,२०१७**
**जलसाक्षरतेचा जागर निरंतर करण्याची गरज..**
**रविवार दिनांक १५.१.२०१७ – ३ ते ५**

अक्षर साक्षरता आणि जल साक्षरता एकमेकांच्या विरोधात प्रवास करताना दिसतात. पूर्वी अक्षर साक्षरता नसताना आपण जेवढे जलसाक्षर होतो, त्या तुलनेत आपल्या पदव्या वाढलेल्या असताना आपण जलसाक्षर झालेलो आहोत का? असा प्रश्न निर्माण होतो. जलसाक्षरता सामाजिक पातळीवर आवश्यक आहे, तशी बुध्दीवंतांच्या पातळीवर देखील अपेक्षित आहे. तसेच साक्षरता ही धोरणकर्त्यांची देखील अपेक्षित आहे. शासन, स्वयंसेवी संस्था आणि जलअभ्यासक यांनी एकत्र येऊन जलसाक्षरतेचा वेग वाढवावा लागणार आहे, तरच पुढच्या काही वर्षांमध्ये जलनिरक्षर समाज आणि जलसाक्षर समाज यातील दरी कमी होईल असा सूर या चर्चासत्रातून निघाला.

**श्री.सतीश खाडे :**

भचरतीय जलसंस्कृती मंडळाने गेल्या दहा वर्षांपासून जलसाहित्य संमेलन आयोजित करण्याचा परिपाठ सुरु केला आहे. या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी सुरु असलेल्या उपक्रमांचे सतीश खाडे यांनी कौतुक केले. जलसाक्षरता हा विविध पैलू असलेला सखोल विषय आहे. यासाठी पूर्णवेळ काम करावे लागणार आहे. जलसाहित्य



संमेलनाच्या निमित्ताने, या चळवळीसाठी व जलसाक्षरतेचे पालखी वाहून नेण्यासाठी आपण एकटे नाहीत, समविचारी मंडळी आपल्या सोबत आहेत याची जाणीव होते. त्यामुळे हुरुप वाढतो, असे खाडे यांनी सांगितले. जलसाक्षरता सामाजिक पातळीवर आवश्यक आहे, तशी बुध्दीवंतांच्या पातळीवर देखील अपेक्षित आहे. साक्षरता हा शब्द गौण अर्थाने घेऊ नये, साक्षरता ही धोरणकर्त्यांची देखील अपेक्षित आहे, कारण औद्योगिकीकरणाचे धोरण ठरविताना विकासाचे कोणते मॉडेल पुढे आणतोय, याचे भान असणे गरजचे आहे. मुंबई, पुणे आणि नाशिक या शहरांवर लक्ष केंद्रीत करुन होणारे औद्योगिकरण, या शहरांची वाढती लोकसंख्या आणि एकूणच नागरी सोयी सुविधांवर पडणारा ताण, सांडपाणी, प्रदुषित पाणी या सर्व प्रश्नांनी आज गंभीर स्वरुप धारण केले आहे. प्रशासकीय पातळीवर देखील साक्षरता जागविणे आवश्यक आहे.पन्नास वर्षांपूर्वी बांधलेले कालवे, बंधारे दुरुस्त केले नाहीत. त्यामुळे अपेक्षित पाणीपट्टी वसुली होत नाही. वसुल झालेल्या पाणीपट्टीचा हिशेब नाही. गुजरातमध्ये सरदार सरोवराच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या २५० टीएमसी पाण्याच्या वितरणातून साडेसात हजार कोटी रुपये पाणी पट्टी वसुल होते, असे आपण वाचले आहे. आपल्याकडे निश्चितच जास्त पाणी उपलब्ध आहे. परंतू पाणीपट्टी वसुलीचा हिशेब नाही. वसुलीत काटेकोरपणा नाही. आरटीओ अथवा प्रॉपर्टी टॅक्सवसुलीप्रमाणे संगणकीकरण करुन पाणीपट्टी वसुलीचे धोरण ठरविण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची साक्षरता करणे गरजेचे आहे. या शिवाय शेतकऱ्यांना देखील साक्षर करणे आवश्यक आहे. एक घनमीटर पाण्यापासून किती उत्पादन घेता येईल. ऊस घेतला तर किती पैसे मिळतील. डाळींब घेतलं तर किती पैसे मिळतील. पाण्याची उत्पादकता हा साक्षरतेचा विषय होऊ शकतो. याकडे सतीश खाडे यांनी लक्ष वेधले.

**अभिजित घोरपडे :**

कोकणात आणि चिपळूणच्या परिसरात शुध्द व निर्मळ पाणी पुरवठा करणाऱ्या सुमारे दोनशे वर्षांपूर्वीच्या व्यवस्था काही वाड्यांमध्ये आजही अस्तित्वात आहे. त्याचप्रमाणे शेतीतील उत्पादनासाठी पाण्याचा अतिशय हिशेबी व काटेकोर वापर करण्याचे "डिफ्यूझिव्ह" तंत्र अमलात आणणारे विजय जोगळेकरांसारखे आधुनिक शेतकरी देखील या परिसरात आहेत. असे असताना पाण्याच्या साक्षरतेविषयी आपल्यासारख्या बाहेरुन आलेल्यांनी बोलणे उचित होणार नाही, असे मत पत्रकार अभिजित घोरपडे यांनी व्यक्त केले. तथापि वाशिष्ठी नदीत पाणी भरपूर आहे, मात्र या नदीला येऊन मिळणाऱ्या नाल्यांची अवस्था शोचनीय आढळली. दुर्गंधीयुक्त प्रदूषित पाण्याने दुथडी भरुन वाहताना दिसते. त्यामुळे जलसाक्षरतेची गरज या परिसरात देखील आहे. अक्षर साक्षरता आणि जल साक्षरता एकमेकांच्या विरोधात प्रवास करताना दिसतात. पूर्वी अक्षर साक्षरता नसताना आपण जेवढे जलसाक्षर होतो, त्या तुलनेत आपल्या पदव्या वाढलेल्या असताना आपण जलसाक्षर झालेलो आहोत का? असा प्रश्न निर्माण होतो. अक्षर साक्षरता आणि जल साक्षरता यामध्ये भांडण आहे का? ते एकमेंकाच्या विरोधी दिशेने का जातात ? असे प्रश्न अभिजित घोरपडे यांनी उपस्थित केले. अक्षरसाक्षरता वाढलेली असताना आपण पाण्याच्या संवेदनशीलतेबाबत इतके खाली जातोय हा खरा चिंतेचा विषय आहे. पाण्याबद्दल माणसाला संवेदनशील करणे आणि पाण्याची नेमकी ओळख करुन देणे हे काम विकास होत असताना सतत करावे लागणार आहे. तरीही काही जलनिरक्षर अस्तित्वात असतीलच. पाण्याबद्दलची संवेदनशीलता संपल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यापैकी सर्वात दाहक उदाहरण म्हणजे ग्रामीण भागात आड बुजवून त्याचे रुपांतर मैला साठविण्याच्या टाक्यांमध्ये करण्याचाचा सर्रास सुरु झालेला परिपाठ. पाणी हे जीवन आहे असे म्हटले जाणाऱ्या देशात, सततच्या दुष्काळाचे चटके सहन करणाऱ्यांच्या देशात पाण्याबद्दलची असंवेदनशीलता कुठून कुठपर्यंत गेलीय याचे जळजळीत उदाहरण म्हणजे प्रदुषित नद्या, ओढे आणि नाले. ही हरवलेली संवेदनशीलता जागृत करण्यासाठी जलसाक्षरतेची मात्र गरज आहे, असे अनेक दाखले देत अभिजित घोरपडे यांनी विशद केले. जेव्हा पासून बाटलीबंद पाणी सहज उपलब्ध होण्यासय प्रारंभ झाला तेव्हा पासून पाण्याचे "मूल्य" कमी कमी झाले, याकडे घोरपडे यांनी लक्ष वेधले. राज्य शासनाने जलसाक्षरता केंद्र स्थापन करुन एक पाऊल पुढे टाकले आहे. यापार्श्वभूमीवर आपल्या सारख्या स्वयंसेवी संस्था आणि जलअभ्यासक यांना एकत्र येऊन



जलसाक्षरतेचा वेग वाढवावा लागणार आहे, तरच पुढच्या काही वर्षांमध्ये जलनिरक्षर समाज आणि जलसाक्षर समाज यातील दरी कमी होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

**डॉ.उमेश मुंडले :**




सरकारी यंत्रणेमधील निर्णयांची अमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेला जलसाक्षर करण्याची सर्वात मोठी गरज आहे. कोकणात पावसाचे प्रमाण जास्त आहे, त्यामुळे तिथे जलसंधारणाची आवश्यता नाही, असा सर्वसाधारण समज आहे. तथापि सह्याद्री पर्वताची पार्श्वभूमी लाभलेल्या आणि टेकड्यांमध्ये वसलेल्या कोकणात प्रचंड वेगाने कोसळणारा पाऊस क्षणार्धात नदी नाल्यांमार्फत समुद्राला जाऊन मिळतो. त्यामुळे कोकणात डोंगरावरुन येणाऱ्या पाण्याचा वेग कमी करुन वाहून जाणारे पाणी साठविण्याच्या पध्दती अमलात आणाव्या लागणार आहेत. मात्र शेततळे, केटीवेअर किंवा अन्य साठवण ढाचे तयार करण्याचे राज्यातील मराठवाडा, विदर्भ किंवा अन्य प्रांतासाठी उपयुक्त असलेले निकष कोकणात अमलात आणणे भौगोलिक वैशिष्ट्यामुळे शक्य होत नाही. यासाठी प्रशासनातील अमलबजावणी करणाऱ्या घटकांचे प्रबोधन करुन त्यांना साक्षर करण्याची गरज आहे. पाण्याला आपण किती किंमत देतो? हे एखाद्या व्यक्तीने अफाट पैसे खर्च केले तर त्याचे वर्णन करतांना बोली भाषेत सहज वापरल्या जाणाऱ्या "पाण्यासारखा पैसा खर्च केला" या वाक्यावरुन लक्षात येते. समाजात पाण्याचे "मूल्य" किती आहे हे या वाक्यावरुन स्पष्ट होते. त्यामुळे शहरी असोत वा ग्रामीण तेथील लोकांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. सह्याद्रीच्या पश्चिम भागात पूर्वी असलेले देवराई तलाव हळूहळू लुप्त होत चालले आहे. या माध्यमातून वर्षभर हमखास पाणी उपलब्ध होत असे, बागायती शेती फुलत असे. परंतू कालौघात याबाबी लुप्त झाल्या. माध्यमांना देखील जलसाक्षर करण्याची आवश्यकता डॉ.उमेश मुंडले यांनी व्यक्त केली. दंगली, खून आणि भ्रष्टाचाराच्या बातम्यांना पहिल्या पानावर स्थान देणारी वृत्तपत्रे पर्यावरण विषयक बातम्यांना आतील पानांवर जागा देतात. समस्यांवर चर्चा होत असताना कृतीशीलतेसाठी पूरक ठरेल अशा पर्यायांवर चर्चा घडवून आणण्याची तसेच सर्वपातळीवरील जलसाक्षरतेच्या मोहिमेत लोकसहभाग वाढविण्याची आवश्यकता डॉ.मुंडले यांनी व्यक्त केली.

**डॉ.विश्वास येवले :**

या चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ.विश्वास येवले यांनी मान्यवर वक्त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा परामर्श घेतला. ते म्हणाले : प्रश्नाचं उत्तर देण्याआधी प्रश्न व्यवस्थित कळायला हवा. नाही तर भलतचं उत्तर येतं. प्रश्न कळणार कसा? जर नदीवर आपण गेलो नाही, जलसाठ्यांवर गेलो नाही तर ते नेमके काय प्रश्न करताय हे कळणार कसं?




चिपळूणकरांनी अथवा सर्वांनीच आपआपल्या परिसरातील नदी, नाल्यांचे प्रश्न प्रत्यक्ष ठिकाणावर जाऊन बघितले पाहिजेत. प्रत्येक ठिकाणचे प्रश्न वेगळे आहेत. नदीवर प्रवास केला तर, नदी आपल्याशी काय बोलते आहे, तिच्या तक्रारी काय आहेत, हे समजेल. जसं लहान बाळाचे रडणे ऐकून आईच्या लक्षात येतं बाळाचं पोट दुखतय की बाळाला भूक लागलीय. नदीचं संभाषण ऐकणं फार महत्वाचं आहे तसेच जलसाठे वाचविणं देखील अत्यंत महत्वाचं आहे. आज अशा स्वरुपाचं काम करणाऱ्या संस्था आहेत, त्यासाठी सक्षम अर्थव्यवस्था आहे, प्रकल्प आहेत, नियम आहेत. परंतू अजूनही जलसाठ्यांची अवस्था सुधारलेली नाही. कारण लोकसहभागचा अभाव. चिपळूणकरांनी वाशिष्ठी नदीवर जरुर प्रवास करावा, हितगुज साधावे, तिचे प्रश्न लक्षात घ्यावेत आणि प्रश्नाला समर्पक उत्तरे शोधावीत, असे आवाहन डॉ. येवले यांनी केले.

*****

# समारोप

**अध्यक्षः डॉ. माधवराव चितळे**
**पुरस्कार वितरणः जलगौरव पुरस्कारः श्री. शेखर निकम (हस्ते डॉ. माधवराव चितळे)**
**चिटगोपेकर स्मृती लेखन पुरस्कार : श्री. संजय झेंडे आणि श्री. विनोद हांडे**
**डॉ. माधवराव चितळे यांचे समारोपाचे भाषण**
**आभार प्रदर्शन : श्री. प्रकाश काणे**

१० वे जलसाहित्य संमेलन, चिपळूण जि.रत्नागिरी दिनांक १३ ते १५ जानेवारी,२०१७

**जल गौरव पुरस्कार श्री. शेखर निकम यांना प्रदान :**

वाशिष्ठी नदीच्या तीरावर वसलेल्या निसर्गरम्य चिपळूण नगरीत भरलेल्या दहाव्या जल साहित्य संमेलनाचा सांगता समारंभ देखील अविस्मरणीय ठरला. भारतीय जलसंस्कृती मंडळाची निर्मिती आणि या मंडळाचे विविध



उपक्रम यामागील मुख्य प्रेरणास्थान असलेले जागतिक कीर्तीचे जलतज्ञ डॉ. माधवराव चितळे यांची उपस्थिती हे या समारोप समारंभाचे खास आकर्षण. समारोप समारंभ दोन टप्प्यांमध्ये विभागण्यात आला होता. पहिल्या टप्प्यात विविध पुरस्कारांचे करण्यात आले. दुसरा टप्प्यात डॉ.माधवराव चितळे यांचे एकूणच पाणी या विषयाच्या अनुषंगाने चिपळूणपासून जागतिकस्तरापर्यंतच्या स्थितीचा वेध घेणारे अभ्यासपूर्ण भाषण झाले. भारतीय जलसंस्कृती मंडळातर्फे देण्यात देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय जल गौरव पुरस्कारचे तसेच जलसंवाद मासिकात लिखाण करणाऱ्या दोन लेखकांना कै.प्रदीप चिटगोपेकर पुरस्काराचे वितरण यावेळी करण्यात आले.

सन २०१७ चा जलगौरव पुरस्कार कोकणात शिक्षण आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या श्री.शेखर निकम यांना कापशीनदीवर जलसंधारणाचे काम केल्याबद्दल डॉ.माधवराव चितळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना शेखर निकम यांनी यापुढील काळात गावापुरताच मर्यादित

न राहता लोकसहभागातून जलसंधारण विषयक कामाचा विस्तार करण्याचा मनोदय व्यक्त केला. शासकीय विभागांनी ४० लाख रुपये खर्चाचे अंदाजपत्रक तयार केलेला बंधारा आपण लोकसहभागातून अवघ्या १० लाखात उभारला, यामागे  इच्छाशक्ती, पारदर्शकता आणि लोकांचा विश्वास याबाबी कारणीभूत असल्याचे निकम यांनी सांगितले.







श्री.निकम यांनी पुरस्काराच्या रकमेत भर घालून रुपये पंचवीस हजार रुपयांची देणगी जलसाहित्य संमेलनाचे आयोजनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडलेल्या लोकमान्य टिळक स्मारक वाचनालयास दिली.  या वाचनालयातर्फे जलसंमेलनाच्या पार्श्वभूमीवर "गळका नळ मुक्त चिपळूण" ही मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहीमेसाठी श्री. शेखर निकम यांनी ही देणगी दिली आहे. या समारोप समारंभातच जलसंवाद मासिकातर्फे "कै.प्रदीप चिटगोपेकर" पुरस्काराचे वितरण करण्यात आले. जलसंवाद मासिकात नियमित लिखाण करणाऱ्या दोन लेखकांना हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो.  यावर्षी नागपूरचे विनोद हांडे आणि धुळ्याचे संजय झेंडे यांना हा पुरस्कार डॉ.माधवराव चितळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.




जलसाहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर चिपळूण शहरात भारतीय जल संस्कृती मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी संमेलनाचे शिवधनुष्य पेलले. संमेलनाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल मंडळाचे चिपळूण शाखेचे अध्यक्ष डॉ.अनिलकुमार जोशी यांचा या वेळी  प्रातिनिधीक सत्कार करण्यात आला. लोकमान्य टिळक स्मारक वाचनालयाचे अध्यक्ष श्री. आप्पासाहेब जाधव यांनी डॉ.माधवराव चितळे यांचे स्वागत केले.  कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय चितळे यांनी केले. याप्रसंगी वाचनालयाचे कार्याध्यक्ष प्रकाश देशपांडे, प्रकाश काणे आदि मान्यवर उपस्थित होते.



# प्रमुख पाहुणे डॉ. माधवराव चितळे यांचे भाषण

**१० वे जलसाहित्य संमेलन, चिपळूण जि.रत्नागिरी   दिनांक १३ ते १५ जानेवारी,२०१७**
**समारोप समारंभ दिनांक १५ जानेवारी, २०१७**
**उपक्रमशील समाज निर्मितीसाठी प्रबोधनाची व्याप्ती वाढविणे गरजेचे.. डॉ. माधवराव चितळे**



भारताच्या आंतरिक शक्तीचा शोध पाण्याच्या क्षेत्रात घेत घेत आपली दहा वर्ष आता पूर्ण झाली आहेत. त्यामुळे एक प्रकारचा दहा वर्षांचा मोठा अनुभव आपल्या पाठीशी आहे. पहिलं जल साहित्य संमेलन नागपूरला भरवलं होतं. त्यावेळी कविवर्य ना.धो. महानोर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी रास्त शंका व्यक्त केली होती की, अशा रीतीच्या अवघड असलेल्या विषयामध्ये किती कार्यकर्ते उभे राहतील, किती प्रमाणात काम करतील,  काम मार्गाला कसं लागेल ?, पण मार्गी लागायला तर पाहिजे, एकत्र यायला  तर पाहिजे अशा प्रकारच्या अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या होत्या. अर्थातच दहा वर्षांची वाटचाल त्यांना व आपणालाही सुखद आहे. पण यानिमित्ताने प्रकर्षाने जाणीव झाली की वाटचालीला प्रारंभ केला ही गोष्ट खरी आहे,  पण रस्ता खूप लांब आहे. त्या लांब रस्त्यावर आपल्याला सगळयांना मिळून न थकता पुढची काही वर्षे एकत्रीतपणे वाटचाल करायची आहे, तरच आपण आपल्या डोळ्या समोर जे निर्मल महाराष्ट्राचं चित्र आहे, जे समृध्द महाराष्ट्राचं चित्र आहे, समृध्द व बलशाली भारताचं चित्र आहे, ते आपण खऱ्या अर्थाने हस्तगत केलं असं होऊ शकेल. जलसंवादची अभिनंदनीय वाटचाल

जलसाहित्य संमेलनाचं हे दहावं वर्ष आहे. याआधी

पाणी या विषयावर दर महिन्याला चर्चा घडवून आणणारा "जलसंवाद" नियतकालिक प्रकाशित सुरु करण्याचा उपक्रम सुरु झाला. त्यांस बारा वर्षे पूर्ण झाली आहेत. जलसंवादचे संपादक डॉ. दत्ता देशकर यशस्वीपणे न चुकता प्रत्येक महिन्याला नियमितपणे हे नियतकालिक प्रकाशित करीत आहेत, त्याबद्दल ते देखील अभिनंदनास पात्र आहेत. बऱ्याच जणांना भारतामध्ये अशा काही गोष्टी सहजपणाने होऊ शकतात, समाज असे उपक्रम उचलून धरतो, असे कार्यकर्ते मिळत राहतात हे एकदम खरे वाटत नाही. पण प्रत्यक्ष या अनुभवातून गेल्या नंतर मात्र खात्री पटते.

**समाज परिपक्व होतोय..**

योगायोगाने चिपळूणला धक्का बसला नाही, परंतु गेली दोन–तीन वर्षे आपल्या राज्यातील जो अवर्षणप्रवण प्रदेश आहे, त्या मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्रातील सीनेचं खोरं आणि विदर्भातील बुलढाणा, यवतमाळ या परिसराला पाण्याच्या टंचाईच्या परिस्थितीला तोंड द्यावं लागलं होतं. पण मी आपल्याला प्रश्न विचारु इच्छितो की, अत्यंत अवघड, पाण्याचा ताण असलेली तीन वर्ष परिस्थिती असताना सुध्दा आपण वर्तमानपत्रांमध्ये अथवा अन्य प्रसारमाध्यमांमध्ये किंवा समाजावर टीका करण्याची सवय असलेल्यांच्या लिखाणांमध्ये सुध्दा लोकांची वाताहत झाली, जनावरं विकायला लागली, काही ठिकाणी उद्रेक झाला, संघर्ष झाला. असं काही वृत्त वाचलं का? अस घडलं नाही. आपला समाज कसा परिपक्व होतोय, त्या परिपक्वतेची ही चांगली काही उदाहरणे आहेत. या टंचाईग्रस्त परिसरात हिंडण्याचा योग आला तेव्हा असं लक्षात आले की, लोकांनी ज्या समजुतदारपणाने जनावरांच्या चाऱ्यासाठी छावण्या उभारल्या, माणसांच्या बरोबरीने त्यांची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आणि आपल्या जिल्हयातील नागरिकांचं स्थलांतर होऊ नये म्हणून संघटितपणे प्रयत्न केले. हे पाहिल्यानंतर आपण वर्षावर्षाला एका विकसित अवस्थेमधून कसे जात आहोत, याचं दर्शन घडलं. तेव्हा हे दर्शन अधिकाधिक समृध्द करण्यासाठी, अधिकाधिक विस्तारीत करण्यासाठी केवळ वर्षातून एकदा होणाऱ्या अशा जल संमेलनावर अवलंबून न राहता भारतीय जलसंस्कृती मंडळाचे कार्यक्रम वेगळया जिल्ह्यात अमलात आणावे लागतील. कारण प्रत्येक जिल्ह्याच्या समस्या या वेगवेगळ्या आहेत. पाण्याचे प्रश्न हे स्थलविशिष्ट असल्यामुळे, स्थानिक विशेषत: आहे. या विषयातील ज्यांना समज आहे, त्या ठिकाणच्या समाजाचं संघटन कसं करावं याचं कौशल्य आहे, असे लोकं जेव्हा वेगवेगळया ठिकाणी पुढाकार घेतील त्यावेळेस हे बदलणारं चित्र अधिक गतीने विस्तारीत होईल.

**प्रसारमाध्यमांचे योगदान मोठे...**

आज मकरसंक्रातीचा सण आहे. त्यामुळे जसं आपण संक्रमण काळातून जातोय, तसा आपला समाज सुध्दा या परिवर्तनाच्या मोठ्या संक्रमण काळातून जातोय. ज्या बलशाली, सुखी, समृध्द जीवनाचे इतिहासामध्ये दाखले वाचतो, अनेक वर्णनं वाचतो त्या काळाकडे पुन्हा एकदा समाजाला नक्की नेऊ शकू असा आत्मविश्वास वाढतोय. आत्मविश्वास वाढत असताना काही खूण गाठा आपल्याला मनाशी बांधाव्या लागतात. आपण दोन दिवसांमध्ये अनेक कार्यकर्त्यांच्या मुलाखती ऐकल्या, निवेदने ऐकली. त्यातून एक गोष्ट स्पष्ट झाली की, पाणी ही जरी देवाची देणगी असली तरी, देवावर अविश्वास किंवा उणिवा दाखवाव्यात असा त्याचा उद्देश नाही. परमेश्वराने पृथ्वी निर्माण केली हे खरय, पण या पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करण्याचं काम मात्र माणसावर सोडलेलं आहे. देव आपणहून स्वर्ग निर्माण करीत नाही. देव माणसांना प्रेरणा देतो, देव परिश्रम करण्याची ताकद देतो, देव संघटना करण्याचं कौशल्य देतो आणि त्यातून या पृथ्वी तलावावर हा स्वर्ग निर्माण होतो. मुळात आमची समाजरचना, आचारप्रक्रियाच अशी होती की येथे स्वर्ग निर्माण होईल. त्या रस्त्यावर निघालेले आपण सगळे पथिक आहोत. याचं चित्र प्रसारमाध्यमांमध्ये दिसतय. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी पाणी या विषयावर येणारा मजकुर आणि गेल्या दोन तीन वर्षांमध्ये पाणी या विषयावर येणारा मजकुर याची जर आपण तुलना केली तर पाणी या विषयाबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रसारमाध्यमांनी मोठा हातभार लावला आहे. या सर्वांमुळे पाणी हा विषय समाजाच्या वैचारिक मंथनामध्ये सतत अग्रेसर ठेवण्याचं काम प्रसार माध्यमे वेगळ्यापध्दतीने करतात. त्यांचा सहभाग सुध्दा महत्वाचा आहे.

**पाण्याचं संतुलन सांभाळणे महत्वाचे :**

एक गोष्ट खरी आहे की दुसऱ्या महायुध्दानंतर संपूर्ण जगाचा विकास चाललाय. त्यात आपण इतर देशांच्या बरोबरीत येऊ शकलेलो नाही. देश म्हणून विचार केला तर साधारणत: आंतरराष्ट्रीय परिमाणांमध्ये सध्या आपलं दरडोई उत्पादन प्रती वर्षी साधरण ३०००/४००० डॉलर च्या मध्ये आहे. परंतू जगाची सरासरी मात्र १०००० डॉलर आहे. स्वीडन, डेन्मार्क या देशांची प्रती व्यक्ती उत्पादकता साधारण ६०००० डॉलरपर्यंत पोहोचली आहे. पाणी हा विषय हाताळताना आपल्याला ते संतुलन सांभाळायचे आहे. गेल्या तीन दिवसांच्या चर्चेत पुन्हा पुन्हा तो विषय आल्यामुळे ही जी नवीन आधुनिक तंत्र विज्ञानाची समृध्दी आहे ही काही केवळ नैसर्गिक समृध्दी नाही.

ही तंत्र विज्ञानातून निर्माण झालेली समृध्दी आहे. ती रेल्वेची वाहतुक असेल, भ्रमणध्वनीची संचार व्यवस्था असेल आपण जे दररोज दूरदर्शन चित्रण पाहतो त्याची उन्नत व्यवस्था असेल, ही आधुनिक युगाची देणगी आहे. ही देणगी सांभाळण्यासाठी नवीन समाज व्यवस्था नव्याने उदयाला आलेली आहे. या समाजरचनेला स्थैर्य देणारे जे घटक आहेत त्या घटकांचे जगातल्या अभ्यासकांनी विश्लेषण केले आहे, आपल्या सारख्या कार्यकर्त्यांनी त्याची नोंद घ्यायला पाहिजे. आंतरराष्ट्रीय वाङ्मयामध्ये WEHB वेहब हा शब्द प्रचलित झालेला आहे. WEHB या क्रमवारीबाबत संयुक्त राष्ट्र संघाचं मंथन झालं. स्थायी विकास हा कसा होईल त्यासाठी हे पाच विकासाचे घटक महत्वाचे आहेत. त्यांच्या विकासावर आपली स्थायी व्यवस्था अवलंबून आहे. त्यात पाणी हा पहिला घटक आहे. पाणी हा घटक ज्या प्रमाणात यशस्वीपणे हाताळू शकलो त्या प्रमाणात तुमची उंची जगाच्या व्यवहारात ठरणार आहे, आणि त्या उंचीच्या प्रमाणात आपण कुठे आहोत हे कळणार आहे. त्यामुळे देश म्हणून अथवा कोकण म्हणून या निकषांचं पुन्हा पुन्हा विश्लेषण करीत राहणं आवश्यक आहे.

**पाण्याच्या पुनर्वापरात आपण तळाशी...**

समाज निसर्गातून किती पाणी घेतो, निर्सगाला किती पाणी परत करतो आणि ते काय स्वरुपात परत करतो. आपण जर या ठिकाणी १०० घनमीटर पाणी आणले, तर त्यातलं १०० घनमीटर पाणी मलप्रवाहात रुपांतर करुन सोडतो की त्यातलं ८० ते ९० टक्के पाणी हे स्वच्छ करुन निसर्गाला परत करतो. त्यावरुन समाजाची उंची ठरत असते. त्यादृष्टीने, निर्धारित करण्यात आलेल्या क्रमवारीत भारताचा क्रमांक सरासरीच्या हा खाली आहे. अनेक देश आपल्या पुढे केले आहेत. सिंगापूरसारखा छोटा देश मलेशियाकडून जेवढे पाणी घेता त्यापैकी ९० टक्के पाण्याचा पुनर्वापर करतो. या देशातील हॉटेल्स किंवा अन्य ठिकाणी बाटल्यांवर New Water असे लिहिलेले असते. पाण्याच्या गुणवत्तेच्यादृष्टीने स्वच्छ, शुध्द करुन पुन्हा वापरात आणलेलं पाणी म्हणजे New Water. आधुनिक विकसित जगाच्या ज्या संकल्पना आहेत, त्या संकल्पनांच्या दिशेने क्रमश: आपल्याला जायचं आहे. ज्यांना यश मिळालं आहे, त्या देशांचे अभ्यास होत राहणं आवश्यक आहे. आपल्या पेक्षा आकाराने लहान असलेल्या नंतर स्वतंत्र झालेल्या देशांनी यासंदर्भात दिलेलं योगदान स्पृहनीय आहे. "विश्वात शोभून राहो" असं आपण म्हणतो ते योग्यचं आहे. आपल्याला विश्वात शोभून राहचय, पण आपली सामाजिक व्यवहारांची, उत्पादकतेची उंची किती असली पाहिजे याची वास्तविक जाण आपल्याला जेव्हा असेल त्यावेळेला आपण आपआपल्यात गुंग राहणार नाही. आपण आपली पाठ थोपटून घेणार नाही. जे आतापर्यंत मिळविलं त्याच्या बद्दल निश्चितच आनंद आहे. पण मिळवायचं काय राहिलेले आहे, याची ज्यावेळेला आपल्याला आठवण होत राहील तेव्हा आपण अखंड परिश्रमवादी राहू.

**संमेलने पुन्हा पुन्हा भरवायला हवी**

देश म्हणून नागरीकरणाच्या एका महत्वाच्या प्रक्रियेमधून आपण जातोय. दर दहा वर्षांनी प्रसिध्द होणारे जनगणनेचे अहवाल वाचले तर ग्रामीण भागाकडून नागरीभागाकडे येणाऱ्या लोकांच्या संख्येत सतत भर पडतेय. ही भारतभर चाललेली प्रक्रिया आहे, ती कोकणातही होतेय आणि काही प्रमाणात होत राहणार आहे. साधारण २०५० पर्यंत ही प्रक्रिया चालू राहील असा संख्याशास्त्राच्या व समाजशास्त्राच्या अभ्यासकांचा अंदाज आहे. आज आपली पिण्याच्या पाण्याची व्यवस्था काय आहे? शेतीच्या पाण्याची व्यवस्था काय आहे? ती पुरेशी आहे की नाही याच्यावर आपल्याला समाधानी राहून चालणार नाही, ही बदलती सामाजिक आणि आर्थिक प्रक्रिया साधारण २०५० पर्यंत चाहू राहणार आहे. त्यामुळे साधारण ३५ वर्षांचा आराखडा आपल्या डोळ्यासमोर स्पष्ट असला पाहिजे. त्यावेळी आपल्या गावाची लोकसंख्या किती असेल, वाहतुकीच्या गरजा किती असतील, शैक्षणिक गरजा किती असतील, त्यावेळी आपली उत्पादकता आपणला कशी ठेवावी लागेल. त्याच्याबरोबरीने या आधुनिक विकासाच्या बरोबर जी प्रदुषणाची समस्या निर्माण होते, घनकचऱ्याची समस्या , मलप्रवाहाची समस्या या समस्यांना आपण आपल्या कवेत घेऊन कसं मार्गस्थ करणार आहोत, कसं उत्तर देणार आहोत त्याच्यावर आपल्या समाजाची जागतिक उंची अवलंबून राहणार आहे. तेव्हा आपण देशाबद्दलच्या प्रेमाने भारत मेरा भारत महान म्हणत विश्वात शोभून राहो असे मनला प्रेरणा देण्यासाठी म्हणत राहिले पाहिजे. पण हे वास्तवात आणण्यासाठी काय करायला पाहिजे. त्याचं स्मरण करण्यासाठी अशी संमेलने पुन्हा पुन्हा भरवायला हवी. वेग वेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या परिस्थितीत, वेगवेगळ्या जिल्ह्यात भरवायला हवी. जलसाहित्य संमेलन वर्षातून एकदा भरवतो, महाराष्ट्राची ११ कोटी लोकसंख्या आहे या लोकसंख्येकडे पाहताना आपल्याला जर खऱ्या अर्थाने या लोकसंख्येचे प्रबोधन करायचे असेल, त्या प्रबोधनातून उपक्रमशील समाज निर्माण करायचा असेल तर,आपल्याला किती प्रमाणात विस्तार करावा लागेल याचा अंदाज येऊ शकेल.

**उपक्रमशील समाज निर्मितीसाठी :**

विकासाच्या तीन टप्प्यांमधून समाज जातो असे अभ्यासक सांगतात. प्रबोधन हा पहिला टप्पा आहे. प्रबोधन झालं म्हणजे एकदम सर्व विकास झाला असं नाही. त्या प्रबोधनानंतर दुसरा जो टप्पा आहे तो अधिक अवघड आहे. ज्याचं प्रबोधन झालय त्या लोकांचं संघटन करणं. कारण संघटित शक्ती जे करु शकते ते वैयक्तिक पातळीवर कितीही जाणकार माणूस असला, विव्दान असला तरी करु शकत नाही. या जाणकार लोकांनी संघटितपणे उभं राहिल्याशिवाय, संघटितपणे कामाच्या रचना केल्याशिवाय समाजाचा उध्दार होत नाही. प्रबोधन, संघटन आणि उपक्रम यानंतर आपल्याला समाजाचं चित्र बदललेलं दिसतं. वेगवेगळ्या देशांचे जेव्हा आपण अभ्यास केले तर त्यांना वेगवेगळ्या कालखंडामध्ये वेगवेगळ्या वर्षांमध्ये या तीन टप्प्यांमधून जायला लागलं आहे. यापैकी काही राष्ट्रांना प्रबोधनाचाच काळ ६०-६० वर्षाचा द्यावा लागला आहे. चीनने स्वातंत्र्य मिळाल्यानंतरसर्व व्यवहार चीनी भाषेमधून करण्यासाठी दोन वर्ष शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे बंद ठेवली, आणि स्वयंस्फूर्त व्यवहार व्हावा, तो आपल्या पायावर आत्मविश्वासाने उभा राहिलेला समाज निर्माण व्हावा यासाठी सहाय्ययभूत ठरु शकेल, मार्गदर्शक ठरु शकेल असे सर्व युरोपीय वाङ्मय चीनी भाषेत अनुवादीत केले. समाज आत्मनिर्भर व्हावा, परावलंबी राहू नये, परक्यांच्यादृष्टीने विचार करणारा होऊ ने म्हणून चीनने दोन वर्षांनंतर विद्यापीठे आणि शाळा उघडल्या आणि चीनी भाषेत अनुवादित केलेली पुस्तकेच वापरावीत असा दंडक केला. भारतरत्न डॉ.मोक्षगुंडम विश्वेशरय्या यांनी उत्तरकाळात म्हैसूर संस्थानचे दिवाण म्हणून काम केले. त्याकाळात त्यांनी कन्नड साहित्य परिषदेची स्थापना केली आणि अभियांत्रिकीसंबंधीची नव्या युगाची माहिती देणारी पुस्तके कन्नड भाषेत अनुवादित करुन घेतली केली. आज आयटी क्षेत्रात या प्रांतातील मंडळी पुढे दिसतात त्याची पाळंमुळं येथे आहेत. समाजाची अशी पायाभूत भरणी करावी लागते. अशी पायाभूत रचना करावी लागते. हे सर्व क्षेत्रांना लागू तेच पाण्याच्या क्षेत्रालाही लागू आहे. तेव्हा इतर देशांतील यशस्वी प्रयोगांकडून आपल्याला हे शिकण्यासारखं आहे. या सर्व टप्प्यांमधून दीर्घ पल्ल्याच्या प्रवास करुन स्वीडन सारख्या देशाने जगातील सर्वात निर्मळ देश अशी ख्याती मिळवून लोकसहभागाचे प्रेरणादायी उदाहरण जगासमोर ठेवले आहे. अशा देशांचा अनुभव डोळ्यासमोर ठेवत आणि आपल्या गरजा व त्यांचं विश्लेषण ते नीट अशा संमेलनांमधून करत राहून आपल्याला आपला मार्ग दरवर्षी पुन्हा पुन्हा तपासून पाहत,आपण योग्य दिशेने चाललो आहोत की नाही यादृष्टीने आत्मपरीक्षण कराचचं आहे. त्यामध्ये आपण दोन दिवस घालविले आहेत, यातील विचारांची, प्रेरणांची शिदोरी बरोबर घेऊन आपण प्रयाण करणार आहोत, सर्वांना शुभेच्छा.

**(संजय झेंडे)**



# तरच विश्वात शोभूनी राहो!
# चिपळून येथील जल साहित्य संमेलनाचे संचित

**श्री. विनोद रापतवार**





राज्याच्या कान्याकोपऱ्यात जल विषयक साक्षात्कार वाढावित हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून गेल्या दोन तपापासून भारतीय जल संस्कृती मंडळ कार्यरत आहे. प्रशासकीय पातळीवरच्या विविध योजनांसमवेत जो पर्यंत समाजात जागरत असलेल्या लोकशक्तीला, पाण्याच्या दृष्टिने कार्य करणाऱ्या विविध व्यक्तींना, शब्द सामर्थांच्या माध्यमातून पाणी प्रश्ना प्रति सजग करणाऱ्या लेखक, कवींना जो पर्यंत एका विचारपीठावर आपण एकत्र करणार नाही तो पर्यंत जलसाक्षरतेच्या चळवळीला खऱ्या अर्थाने दिशा भेटणार नाही हे या मंडळाचे संस्थापक ज्येष्ठ जलतज्ज्ञ माधवराव चितळे यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने ओळखून घेतले. राज्य आणि केंद्र शासनात जल व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून भरीव योगदान चितळे साहेबांनी दिले आहे. पाण्याच्या अनेक लवादांवरुन त्यांनी काम केले आहे. पाणी व्यवस्थापनाचा जागतिक आवाका त्यांच्या एवढा इतर कोणी समझून घेतला नसेल. प्रत्येक राज्यात, प्रत्येक देशात असलेल्या नद्या, त्यातील पाण्याची उपलब्धता आणि त्या त्या जलस्त्रोतांच्या काठावर असलेल्या लोक संस्कृतीचाही त्यांनी अतिशय जवळून अभ्यास केला आहे. दुसऱ्या बाजूला दिवसेंदिवस वाढणारी पाणी प्रश्नातील दाहकता, यातील तंटे सरळ न्यायालयांमध्ये पोहचल्याने न्यायालयांचाही जल व्यवस्थापनावरील अभ्यास निश्चितच वाढला गेला. पाणी प्रश्नावर अभ्यासपूर्ण मांडणीसाठी माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले. आजच्या पाणी प्रश्नावर मात करताना ऐतिहासिक काळातील जल योजनांचा सर्व प्रथम अभ्यास करणारे डॉ. रा. श्री. मोरवंचिकर, मंत्रालयाच्या जलसिंचन विभागात विविध पदावर काम करणारे डॉ. दि. मा. मोरे आदी मान्यवरांच्या योगदानातून भारतीय जलसंस्कृती मंडळाने २००२ पासून आजवर भरीव योगदान दिले आहे. या जलसाक्षरता चळवळीतील एक महत्वाचे पान म्हणजे जल साहित्य संमेलन. या संमेलनाला मला २००९ पासून साक्षीदार होता आले आहे. जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी २००९ मध्ये पुढाकार घेऊन जैन हिल्स येथे नववे जल साहित्य संमेलन घेतले होते. या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी त्यांनी माझ्यावर सुपुर्द केल्यामुळे मला चितळे साहेब, न्यायमूर्ती चपळगावकर साहेब, डॉ. मोरवंचिकर व राज्यातील इतर जल तज्ज्ञांशी जवळून चर्चा, विचार विनीमय करण्याची आणखी एक संधी मिळाली. या चर्चेतून जल साक्षरतेसाठी जी काही उपाय योजना करावी लागणार आहे त्या सर्व उपाय योजनांचा योग्य आढावा घेता आला. जळगावसह राज्यातील इतर ठिकाणीही आयोजित करण्यात आलेल्या संमेलनासाठी माझे पुढे जाणे झाले. प्रत्येक संमेलनात अनेक वेगवेगळी माणसे भेटली. अतिशय कमी साधन संपत्ती असतांनाही केवळ लोकसहभागातून किती चांगल्या प्रकारच्या योजना आपण राबवू शकतो याची अनेक उदाहरणे प्रत्येक संमेलनात अनुभवता आली. नुकतेच चिपळून येथे झालेले दहावे जल साहित्य संमेलन हे आजवरच्या या

चळवळीच्या वाटचालीतील एक महत्वाचा टप्पा म्हणून ओळखले जाईल यात शंका नाही.

मथळात महाराष्ट्रातील सर्वात अधिक पर्जन्य होणारा भाग म्हणून आपण कोकणाकडे पाहतो. पावसाळ्यात पडणारे धो–धो पाणी अवघ्या तीन तासात समुद्राला जाऊन मिळते. पावसाळा असेपर्यंत कोकणातील नद्या जिवंत राहतात. यामुळे आजूबाजूचा खेळ्यातील विहिरींची पातळी स्वाभाविकच वाढली जाते. मार्च–एप्रिल नंतर हे पाणी कातळातून फार दूरवर निघून जाते. कोकणातली जमिन ही अधिक निचरा होणारी जमिन आहे. बहुसंख्य भागात अशाच प्रकारची जमिन असल्याने जलसंधारणाच्या कसल्याही योजना आणल्या तरी खर्चाचा तुलनेत त्याची फारशी उपलब्धी होत नसल्याचे आपण पाहतो. कोकणातल्या या सर्व स्वभाव वैशिष्ट्यांना आपण डोळ्यासमोर ठेवून भारतीय जलसंस्कृती मंडळाने या दहावे जल साहित्य संमेलनाचे आयोजन करताना जल व्यवस्थानाबरोबर पाणी आणि कोकण विकासाचा एक टप्पा घेतला. तीन दिवसीय चाललेल्या या जल साहित्य संमेलनात डॉ. माधवराव चितळे, डॉ. दि.मा. मोरे, ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रमोद मोघे, श्रीमती मंजूषा ओघ, विनोद रापतवार, डॉ. दत्ता देशकर, सतीश कामत यांनी पुढाकार घेतला. याच बरोबर उल्हास परांजपे, दिलीप भाटकर, डॉ. चंद्रकांत मोकल, संजय यादवराव, गजानन देशपांडे, डॉ. विश्वास येवले, उमेश मुंडले आदींनी विविध विषयांवर आपले मार्गदर्शन केले. केंद्रीय अवजड उद्योग मंत्री अनंतराव गिते व रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. रविंद्रजी वायकर, लातूरच्या पाणी प्रश्नावर काम करणाऱ्या लोक चळवळीचे प्रणेते डॉ. अशोकराव कुकडे, जैन इरिगेशनचे अभय जैन आदींच्या उपस्थितीत या संमेलनाचा शुभारंभाचा १३ जानेवारी २०१७ रोजी झाला. ‘राज्यातील अनेक भागात एकीकडे पाण्याचे दुर्भिक्ष आहे तर दुसऱ्या बाजूला आमच्या कोकणात न थांबणारे पाणी आहे. एवढे पाणी असूनही उन्हाळ्यात कोकणाच्या वाट्याला येणारी दुर्भीक्षता थांबवायची असेल तर उच्च तंत्रज्ञानाच्या अवलंब केल्याशिवाय तरणोपाय नाही. असे स्पष्ट प्रतिपादन केंद्रीय अवजड उद्योग मंत्री अऩंतराव गीते यांनी केले. कोकणातील भूमी पाण्याचा निचरा इथली जमीन निचरा करणारी आहे. इथे धो धो पडणारे पाणी एका तासात समुद्रात जाऊन मिळते. हे वाहून जाणारे पाणी जर अडविता आले तर कोकणात उन्हाळ्यात जाणवणारी पाण्याची टंचाई संपुष्टात येईल. एकीकडे पिण्याचा प्रश्न तर दुसऱ्या बाजुला इथल्या कृषिक्षेत्राचा विकास साध्य करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगीतले. सुदैवाने जैन इरिगेशन सारखी कृषि क्षेत्रात आघाडीवर असलेली कंपनी कोकणासाठी काही करू पाहते आहे याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी जैन इरिगेशनचे अतिघनदाट आंबा लागवड तंत्रज्ञान महत्त्वाचे असून येथील शेतकऱ्यांच्या भवितव्याची बिजे यात असल्याचा गौरोद्गारही त्यांनी काढले.

कोकणात लाखो हेक्टर शेतजमीन आहे त्या तुलनेत सिंचन मात्र काही हजार हेक्टर क्षेत्रापुरतेच आहे. ही स्थिती बदलण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. कोकणातल्या केळीच्या पुनरुज्जीवनासाठी अऩेक शेतकरी आता सामूहीक पातळीवर पुढे येऊन उच्च तंत्रज्ञान अंगिकारत असून याला आम्ही चालना देऊ असे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र वायकर यांनी स्पष्ट केले.

कोकणातील शेतकऱ्यांचा विकास व्हावा यासाठी जैन इरिगेशन प्रयत्नशील असून या भागात आंबा पिकाच्या अतिघनदाट लागवड तंत्रज्ञानापासून ते प्रक्रिया उद्योगापर्यंत आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करून असे निःसंधिग्ध प्रतिपादन विपणन संचालक अभय जैन म्हणाले.

लातुरला आजही आठवड्यातून एकदा पाणी गत वर्षाच्या मार्चपासून नळ बंद. २० हजार बोअर पैकी ४ हजार बोअर शिल्लक. पाण्याची टंचाई ही मनुष्यांनी निर्माण केलेला आजार आहे, हे पाणप लक्षात घेतले पाहिजे. आम्ही १६ कि.मी. मांजरेचे पात्र लोकसहभागातून मोकळा केला. शासनाचे अंदाजपत्रक होते ४० कोटी. आम्ही हे काम केले ८ कोटी रुपयांमध्ये. ३० बुलडोझर दिवसरात्र सुरू, गाळ काढायला मला हवा हे मोठे ट्रक, कोणी पावत्या मागीतल्या नाहीत पण आम्ही रोज व्हाटस्अपवर हिशेब दिले. लोक जागे झाले तर कोणत्याही आव्हानांवर मात करता येते हे कुकडे यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले.

या संमेलनातील जे काही ठराव होतील ज्या शिफारशी होतील त्याची सरकार पातळीवर अंमलबजावणी केली जाईल याची मी हमी देतो. इथल्या प्रकल्पांसाठी आम्ही दक्ष आहोत. एका बाजूला आपण पाण्याच्या नियोजनाकडे व दुसऱ्या बाजूला साक्षरतेकडे लक्ष दिले पाहिजे असे स्वागत अध्यक्ष तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र वायकर यांनी स्पष्ट करुन या संमेलनातील ३ दिवस चालणाऱ्या जलमंथनाच्या गुणवत्तेला अधोरेखित केले.

जलचळवळीला चालना मिळावी या उद्देशाने आपण हे संमेलन घेत असल्याची माहिती जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. दत्ता देशकर यांनी दिली. हे संमेलन आजवर आम्ही विविध भागात घेत असल्याने त्या त्या भागातील पाणी विषयक प्रश्नांना वाचा फुटली असे ते म्हणाले. जलसाक्षर समाज झाला तरच या देशाची

भवितव्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाणी ही देवाची देणगी आहे. या पृथ्वीची निर्मिती ईश्वराने केली. आजवर या ईश्वर निर्मीत पृथ्वीने हजारो स्थित्यंतरे अनुभवली. हे बदल माणसानेही त्या–त्या काळात अनुभवली. या संक्रमण काळातून पुढ जात माणसाने पाण्याशी असलेले आपले नाते समजून घेत मार्ग काढला. आजचा काळही संक्रमणाचाच काळ आहे. यातून मार्ग काढीत जर खऱ्या अर्थाने येथे स्वर्ग निर्माण करायचा असेल तर समाजातील सर्व घटकाने पाण्याला अधिक पावित्र्याने समजून घेण्याशिवाय दुसरा मार्ग नसल्याचे जागतिक जलतज्ज्ञ तथा भारतीय जलसंस्कृती मंडळाचे मार्गदर्शक डॉ. माधवराव चितळे यांनी या संमेलनाच्या समारोपात स्पष्ट केले. समाज निसर्गाकडून किती पाणी घेतो व निसर्गाला किती परत करतो यावर त्या समाजाची गुणवत्ता अवलंबून असते. सिंगापूर सारखा छोटा देश ९० टक्के पाण्याचा पुर्नवापर करतो. निसर्गाचा विभिन्न रचना व विभिन्न पिक पद्धती लक्ष्यात घेत आपण आता जल बचतीसाठी नवतंत्रज्ञानाचा मार्ग अंगीकारला पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले. भारताला पर्यायाने आपल्याला विश्वात शोभूनी राहायचे असेल तर पाणी वापराबाबत अधिक गंभीर असलेल्या समाज व्यवस्थेचे निर्मिती आपण केली पाहिजे. घन कचरा मल व्यवस्थापन हे नदीच्या मुळावर येणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे असे त्यांनी स्पष्ट करुन या संमेलनाला एक नवी दिशा दिली.

चिपळूनच्या ऐतिहासिक असलेल्या लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदीराने या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी यशस्वीपणे पेलून दाखविली. यात महत्वाचा भाग म्हणजे या चळवळीला चालणा देण्यासाठी ज्यांनी सतत पुढाकार घेतला त्या जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांचे नाव या संमेलनाच्या स्थळाला देण्यात आले. माधवराव चितळे व भवरलालजी जैन यांचा स्नेह व्यक्तीगत पातळीवर जेवढा जवळचा होता तेवढाच तो जल साक्षरतेचा जागतिक विस्तारासाठीही व्यापक होता. जैन ठिबक सिंचन, सूक्ष्मसिंचन, टिश्यूकल्चर, फळ व भाजीपाला प्रक्रिया, पीव्हीसी व एचडीपीई पाईप निर्मिती आदींच्या माध्यमातून भवरलालजी जैन यांनी वैश्विक पातळीवर आपल्या कार्याचा अपूर्व ठसा उमटविला. त्यांचे जल बचतीतले हे योगदान संमेलन स्थळाच्या नावातून खऱ्या अर्थाने संमेलनाचा गौरव करणारे ठरले.

# जलसाहित्य संमेलनातून जलप्रबोधनास चालना !

**धीरज वाटेकर**





कोकणच्या सांस्कृतिक राजधानीत, चिपळूणात, स्व. भवरलालजी जैन नगरीत, कृषिभूषण स्व. रणजित खानविलकर व्यासपीठावर, भारतीय जलसंस्कृती मंडळाचे दहावे जलसाहित्य संमेलन नुकतेच दिनांक १३, १४ आणि १५ जानेवारीला संपन्न झाले. येथील लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराचे नेटके आयोजन, त्याला महाराष्ट्रभरातील अभ्यासू तज्ज्ञांची मार्गदर्शक साथ आणि जिज्ञासू श्रोते यांच्या उपस्थितीपूर्ण त्रिवेणी संगमाने, जलसमस्या, जलसंवर्धन व जलसाक्षरता या संबंधातील जलप्रबोधनास चालना मिळाली. जलदुर्भिक्ष्यावर कोकणातही जलशिक्षणाच्या माध्यमातून कायमस्वरूपी जलजागृती चळवळ उभारण्याची आवश्यकता या संमेलनातील विचार मंथनातून–चिंतनातून पुढे आली, त्या आश्वासक संमेलनाचा धावता आढावा...!

हवामानखात्याच्या मान्सूनबद्दलच्या अंदाजाकडे बघण्याचा सामान्यांचा वर्तमान सकारात्मक दृष्टीकोन हा आज परिस्थितीत झालेला स्वागतार्ह बदल असला तरी वाढत्या प्रदूषित वातावरणात दरवर्षीच्या पर्जन्यमानाचा नेमका व अचूक अंदाज बांधणे हे दिवसेंदिवस कठीण बनले आहे. आजही उन्हाळा सुरू झाला की राज्यभरातील वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरून तीव्र पाणीटंचाईच्या बातम्या आपले लक्ष वेधून घेतात. दरवर्षी उन्हाळ्यात संपूर्ण महाराष्ट्रात पाणीटंचाईच्या तीव्र झळा जाणवतात. पूर्वी हे भयाण संकट ग्रामीण भागापुरते मर्यादित असे परंतु अलीकडे हे लोण शहरी भागातही फार मोठ्या प्रमाणात पसरत आहे. बिकट पाणी परिस्थितीने राज्याला ग्रासले असताना जेथे धुंवाधार पाऊस कोसळतो अशा कोकण प्रदेशातही पाणीपुरवठ्यासाठी सर्वाधिक टँकर्सचा वापर करण्याची वेळ शासनावर आल्याने आगामी गांभीर्य आणि विसंगती याबाबत अंतर्मुख होवून परिणामकारक योजना राबविण्याची गरज ओळखून येथेही पाणी या विषयावर चिंतन करण्याच्या दृष्टीने हे संमेलन झाले. पाण्याच्या बाबतीत केवळ शासनावर १०० टक्के विसंबून राहून चालणार नाही. जनसामान्य म्हणून आपलेही काही प्राथमिक कर्तव्य असते. मोठ्या प्रमाणात विविध क्षमतेची धरणे बांधून जलसंचयाची जबाबदारी शासनाची असली तरी छोटी शेततळी, विहीरी बांधून जलसंचय करणे व वाढविणे, पर्जन्यसंचयासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग सारख्या वैयक्तिक स्तरावरील योजना राबवून भूजलपातळीत वाढ करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी ठरते आहे. पाऊस मुबलक असताना त्याचे यथायोग्य जलव्यवस्थापन आणि तो नसताना उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने योग्य वापर ही काळाची गरज आहे. निसर्गातील वेगवेगळ्या घटकांची काळजी घेत पर्यावरणासाठी वेगवेगळी माणसं जगभर लढत आहेत. जागतिक कीर्तीचे जलतज्ज्ञ, स्टॉकहोम वॉटर प्राईज विजेते डॉ. माधवराव चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या निवृत्तीच्या कालखंडात भारतीय जलसंस्कृती मंडळ, सिंचन सहयोग व सरोवर संवर्धिनी या तीन संस्था स्थापन झाल्या. पैकी भारतीय जलसंस्कृती मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी हे जलसाहित्य संमेलन होते. पाण्याला केंद्रित करून भारतीय जलसंस्कृती मंडळ कार्यरत आहे. पाणीटंचाई

गंभीर झाल्यानंतर उपाययोजनांसाठी अरूण्यरूदन करण्यापेक्षा टंचाईच निर्माण होऊ नये यासाठी लोकसहभागाच्या योजनांची खरी आवश्यकता ओळखून संमेलनात मार्गदर्शन करण्यात आले.

जलसाहित्य संमेलनाला जलदिंडीने प्रारंभ झाला. दिंडीत भारताच्या विविध खंडातील नद्यांच्या पाण्याचे २५ जलकुंभ सहभागी झाले होते, तर जलदिंडीच्या पालखीत सिंधू व वाशिष्ठी नदीचे पाण्याचे कुंभ ठेवण्यात आले होते. झांज पथकातील ढोलताशाचा जागर, पालखी, मराठमोळे पेहराव, सहभागी झालेले जलसाहित्यप्रेमी, पाणी बचतीचा संदेश देणारे विद्यार्थी अशा प्रसन्न वातावरणात दिंडी यशस्वी झाली. दिंडीत 'पाणी म्हणजे जीवन हेच आपले स्पंदन, आस धरा कास धरा पाणी बचतीचा ध्यास धरा, नवीन पिढीचा नवा मंत्र कमी पाण्यात ज्यादा सिंचन क्षेत्र, स्वच्छ गाव शुध्द पाणी आनंदाची खरी पर्वणी, उपयोगात आणू सांडपाणी परसबाग फुलवू अंगणी, थोडे सहकार्य थोडे नियोजन पाणी फुलवी आपले जीवन' आदि घोषवाक्यातून जलजागृतीचा संदेश देण्यात आला.

लातुरातील भीषण पाणीटंचाईमागे मानवाच्या चुका आहेत. तेथे एक दिवसाआड पाणी दिले जाते. ही पाणीटंचाई दूर करण्यासाठी मांजरेचे पात्र १६ कि.मी. मोकळे केले गेले. मोठी यंत्रणा त्यासाठी कार्यरत झाली. अवघ्या आठ कोटींमध्ये हे काम झाले. ३० बुलडोझर रात्रंदिवस काम करीत होते. आम्ही काम केले, पण कुणी पावत्या मागितल्या नाहीत. पारदर्शकपणे काम केले. रोजच्या कामाचे हिशेब व्हॉट्सअपवर प्रसारित केला जाई. यास्तव चांगले काम शक्य झाले, लोकसहभाग वाढला, असे संमेलनाचे अध्यक्ष डॉ.अशोक कुकडे यांनी नमूद केले. राज्यात अनेक ठिकाणी पाण्याची समस्या आहे. कोकणात जोरदार पाऊस असतो पण पाण्याचे दुर्भिक्ष्यही असते. कोकणातील जमीन पाण्याचा निचरा करणारी आहे. धो धो पडणार्याव पावसाचे पाणी अडविता आले तर उन्हाळ्यातील पाणीटंचाईची समस्या दूर होईल. ही समस्या थांबवायची असेल तर उच्च तंत्रज्ञानाची मदत घ्यावी लागेल, असे मत केंद्रीय अवजड उद्योगमंत्री ना. अनंत गीते यांनी या संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. उद्घाटन समारोहास रत्नागिरीचे पालकमंत्री रवींद्र वायकर, संमेलनाध्यक्ष डॉ. अशोक कुकडे, जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.दत्ता देशकर, आमदार सदानंद चव्हाण, जैन इरिगेशनचे विपणन प्रमुख अभय जैन उपस्थित होते.

कोकणातील शेतकऱ्यांपुढे खाडीलगत असणाऱ्या शेतजमिनीत खारे पाणी जावून शेती नापिक झाली आहे. या समस्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी नाम आता कोकणावर लक्ष केंद्रित करणार असल्याचे मत नाम संस्थेचे प्रतिनिधी राजाभाऊ शेळके, गणेश थोरात व समीर जानवलकर यांनी नोंदवले. इतरांना सल्ला देण्यापेक्षा आपणहून स्वत: पुढाकार घेऊन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला मदतीचा हात देत त्यांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना स्वहक्काचे जीवन जगता यावे आणि त्यांचे खचलेले त्यांचे आयुष्य पुन्हा उभे रहावे या सामाजिक जाणिवेतून चाललेल्या नामच्या कामाचा आढावा त्यांनी घेतला.

कोकणात पाऊस भरपूर पडत असून कोकणात दुष्काळ पडण्याची शक्यता नाही. एप्रिल–मे महिन्यात कोकणातील काही भागात पाण्याचा तुटवडा जाणवतो मात्र संपूर्ण महाराष्ट्राशी तुलना करता त्याची तीव्रता कमी आहे, अशी भूमिका महाराष्ट्र सिंचन परिषदेचे अध्यक्ष डॉ. दि. बा. मोरे यांनी मांडली. राज्याच्या एकूण सरासरीच्या ४६ टक्के पाऊस कोकणात पडतो. आणि कोकणाचे राज्याच्या तुलनेत एकूण क्षेत्रफळ १० टक्के आहे. कोकणाची पाणी साठवणूक क्षमता ६–७ टक्के आहे. ती वाढविल्यास कोकणाचा पाणी प्रश्न आणि इतर अनेक विकासाचे प्रश्न सुटतील. कोकणाची भौगोलिक स्थिती कोकणातही एक सारखी नाही. त्यामुळे त्यामुळे कोकणात भौगोलिक स्थितीनुसार विचार करून लहान, मोठे, मध्यम आणि साखळी पद्धतीचे बंधारे बांधून पाणी अडवावे लागेल, असे मोरे म्हणाले. कोकणातील डोंगरात बांधबंधिस्तीद्वारे जलसाठवणूक यशस्वी करणारे विनय महाजन म्हणाले, पावसाचे एक इंच कोकणातील पाणी डोंगरावरून वाहून जायला जितका वेळ लागतो, त्याच्या ५० पट अधिक वेळ तेच पाणी डोंगरात झिरपून वाहायला लागतो. आपण कोकणात उघड्यावर कोकणात पाणी साठवले तर ३० टक्के पाण्याची वाफ होते. कोकणात बंधारे बांधताना ब्लास्टिंग करणे कसे योग्य नाही हे त्यांनी मांडले. पूर्वी आपल्याला कोकणात पाणी पुरायचे आज ते पुरत नसल्यामागे आपण जलसाक्षर नाही हे कारण असल्याचे महाजन म्हणाले. जलतज्ज्ञ विजय जोगळेकर यांनी सांगितले की, कोकणातल्या जमिनीखाली भरपूर कातळ आहे. महाराष्ट्राच्या इतर भागातील पद्धतीनुसार येथील प्रश्न सुटणार नाहीत. नाला रुंदीकरण–खोलीकरण येथे चालणार नाही. कोकणात एकूण २२ प्रमुख डोंगररांगा आहेत, त्या कळल्या म्हणजे कोकणाचे प्रश्न समजून घेता येतील. कोकणातील सहा हजार गावे डोंगरालगत आहेत. येथे ६५ हजार वाड्या–वस्त्या आहेत, वाडीश: वस्ती आहे. फारसे डोंगर एकमेकांना जोडलेले नाहीत. सन १९६५ पूर्वीपर्यंत चिपळूणला कापसाळच्या धरणाने पाणी पुरविले. त्यानंतर कोयना प्रकल्प झाला. कोकणातील ज्या भागात आज पावसाचे पाणी भरते ती

सगळी पूर्वी बंदरे होती. गाळाने भरल्याने येथील खाड्यांची पाणी वाहून नेण्याची क्षमता कमी पडते. यास्तव कोकणात गरजेनुसार पाणी अडविण्याच्या पद्धतीत बदल करून त्या वापराव्या लागतील. कोकणात पाणी मुबलक आहे पण साठवणूक नाही. बरोबर कोकणात यशस्वी शेती पद्धतीचीही वानवा असून ती विकसित करण्याची गरज त्यांनी बोलून दाखविली. पाणी वापर तंत्रज्ञान वापरून आपण यशस्वी शेती करू शकतो, असेही यावेळी जोगळेकर म्हणाले. चेतन गोगावले–उल्हास पवार यांनी कायम दुष्काळी तालुका असलेल्या पुरंदर तालुक्यामतील डोंगराच्या कुशीत वसलेल्या पिंगोरी गावातील तलावाच्या यशस्वी पुनर्भरण होण्यामागील वापरलेल्या तंत्रज्ञानाची माहिती दिली. आपण पित असलेल्या शुद्ध पाण्याच्या तपासणीची ४० शास्त्रीय परिणामे आहेत. सर्वसाधारण स्तरावर जल शुद्धीकरणासाठी वापरण्यात येणाऱ्या तुरटी, क्लोरीन आदि घटकांच्या निर्मितीतही खूप प्रदूषण होते. त्यामुळे सरसकट साऱ्या पाण्याचे शुद्धीकरण न करता पिण्यासाठी आवश्यक पाण्याचे शुद्धीकरण तर इतर पाणी तसेच वापरुन मोठा खर्च आणि प्रदूषण आपण वाचवू शकतो अशी भूमिका निसर्गस्नेही जीवनपद्धती या विषयावरील परिसंवादात संशोधक डॉ. प्रमोद मोघे यांनी मांडली. पिण्याच्या पाण्यात अति तुरटी वापरल्यास साधारणतः १० वर्षांनंतर स्मृतीभंश आजार बळावतो. ८० टक्के शारीरिक रोग पाण्यामुळे होतात. आपण दैनंदिन ज्या जीवनशैलीचा वापर करीत आहोत त्यामुळे त्यामुळे शहरात माणशी ४० आणि गवत २०–२५ ग्राम प्रतिदिन केमिकल पाण्यात मिसळले जाते, हा सारा प्रकार निसर्गस्नेही जीवनपद्धतीच्या नेमका उलटा सुरु आहे, असेही ते म्हणाले. पुण्याच्या जीवित नदी संस्थेच्या मंजुषा ओक यांनी यावेळी घातक–रसायन–विरहित जीवनशैली या बाबत मार्गदर्शन केले. आपल्याकडे आज नदी ही फार मोठी समस्या बनली आहे. नदीतील ७०% पेक्षा जास्त प्रदूषणाचा वाटा घरातून जाणार्यी सांडपाण्याचा आहे. घरातून जाणारे सांडपाणी दैनंदिन घरगुती उत्पादनातील घातक रसायनांमुळे प्रदूषीत होते. टूथपेस्ट, साबण, शैंपू, डिटरजंट, सौंदर्य प्रसाधने इ. सारख्या दैनंदिन घरगुती उत्पादनांमध्ये विविध घातक रसायने तसेच वेगवेगळ्या प्रकारची सुगंधी द्रव्ये आणि नाशके असतात. ही घातक रसायने / विषद्रव्य आपण रोज सांडपाण्यातून नाल्यांमध्ये आणि पर्यायाने नदीत व इतर जलस्त्रोतांमध्ये तसेच जमीनीत सोडतो. नदीचे पाणी निसर्गचक्रात सतत शुद्ध होत असते. पण मानव निर्मित अश्या या विषद्रव्यांचे नदीत शुद्धीकरण/विघटन होत नाही. ती कायमस्वरूपी नदीत राहातात असे ओक म्हणाल्या. या प्रदूषित पाण्याचा उपसा शेती साठी केला जातो. या पाण्यातील घातक रसायने पीकांमाध्ये शोषली जातात आणि अशा प्रकारे ती अन्न साखळीत प्रवेश करतात. याने सगळ्या जीव सृष्टीला हानी पोहोचते. हेच पीक धान्य, फळे आणि भाज्या आपण अन्नाद्वारे ग्रहण करतो. या घातक रसायनांमुळे कँसर सारखे रोग, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, श्वसनाचे विकार, वंध्यत्व इ. होऊ शकतात. यामुळे आपण जीवनशैलीत बदल करून निसर्गस्नेही जीवनपद्धतीकडे वळण्याची गरज असल्याचे ओक यांनी सांगितले. कोकणातील संगमेश्वर तालुक्यातील राजवाडी गाव परिसरात निसर्गाच्या साथीने यशस्वी विकास साधणारे ज्येष्ठ पत्रकार कामत यांनी मनुष्याच्या दैनंदिन अगदी साध्यासाध्या निसर्गविषयक वागण्यातील मुद्यांवर बोट ठेवून आपली भूमिका स्पष्ट केली. नैसर्गिक आणि अनैसर्गिक जीवनपद्धती हा भेद गेल्या २५ वर्षांत आपणच निर्माण केला असल्याचे ते म्हणाले. प्लास्टिक पिशवीचा अनिर्बंध वापर, वीज वापर, सोलर एनर्जीचा वापर, सायकलचा वापर, अपार्टमेंट शेजारी किमान झाडे, पार्किंगला सोलर दिवे अशा अगदी छोट्या–छोट्या मुद्यांतून त्यांनी आपली भूमिका मांडली. कोकणातील नद्यांच्या शेजारी जमिनी असलेल्यांना काही करायला नको आणि यास्तव इतरांनाही पाण्याशिवाय काही करता येत नाही अशी स्थिती आहे. डोंगरावर शेतातली उभारणे गरजेचे असून सरकारी योजनेवर अवलंबून राहून नियोजन करणे योग्य नसल्याचे कामत म्हणाले. कोकणात झाराप येथे बायोगसच्या माध्यमातून ग्रामविकासाची यशस्वी चळवळ उभारणारे डॉ. प्रसाद देवधर यांची धनंजय चितळे यांनी घेतलेली मुलाखत प्रत्यक्षदर्शींना अंतर्मुख करून गेली. जलविषयक काव्यसंमेलनाने वातावरण भारले गेले. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी रात्री डॉ. वीरा राठोड यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन पार पडले. त्याचे सूत्रसंचलन कवी अरुण इंगवले यांनी केले.

संमेलनाच्या अखेरच्या दिवशी सकाळी उल्हास परांजपे यांनी फेरो सिमेंट टाकीचे बांधकाम याचे प्रात्यक्षिक दाखविले. कोकणातील पाणी आणि पर्यटन विकास या विषयावर डॉ. चंद्रकांत मोकल, मरिनर दिलीप भाटकर यांनी मते मांडली. भारतीय जलसंस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. दत्ता देशकर यांनी, विकासाला उद्यमशिलतेची गरज आहे. मात्र, ही उद्यमशिलता कोकणात अभावानेच दिसते. कोकणात मुबलक संसाधन संपत्ती असूनही उद्यमशीलतेचा अभाव असल्याने कोकणचा विकास रखडल्याचे मत 'कोकणातील पाणी आणि औद्योगिकीकरण' चर्चासत्रात नोंदवले. जल अभ्यासक विनोद रापतवार म्हणाले, कोकणला

निसर्गसंपन्नीतेचे वैभव आहे. ब्रिटीश काळात रेल्वेमुळे कोकणच्या विकासाचा टप्पा सुरू झाला. कोकण रेल्वेची सर्वप्रथम संकल्पना व आराखडा ब्रिटीशांनी १८८८ मध्ये तयार केला होता. मात्र, टप्प्याटप्प्याने कोकण विकासाकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले. जगदाळे यांनी म्हणाले, कोकणात पायाभूत सुविधा व औद्योगिक विकास अन्य भागांच्या तुलनेने कमी आहे. कोकणातील माणूस नोकरीसाठी मुंबई गाठतो. मात्र, आता कोकणी माणूस उद्योग–व्यवसायाकडे वळू लागला आहे. जिथे पाणी तिथे समृद्धी असे मुबलक पाणी कोकणात आहे. त्याचे नियोजन होणे गरजेचे आहे. संजय यादवराव यांनी कोकण विकासाची वाटचाल येथे आलेल्या रासायनिक उद्योगातून झाल्याचे मत नोंदवून यामुळे कोकणाची उद्योगाकडे बघण्याची मानसिकता नकारार्थी बनल्याचे मत नोंदवले. जलसाक्षरता प्रचार आणि प्रसार या चर्चासत्रात डॉ. विश्वास येवले, डॉ. उमेश मुंडल्ये, सतीश खाडे, भवतालचे संपादक अभिजित घोरपडे आदींनी आपली भूमिका मांडली.

जगाच्या नकाशावर देशाला उंचीवर न्यायचे असेल तर पाणी नियोजन अतिशय महत्त्वाचे आहे. जलसाहित्य संमेलनाबरोबरच कायमस्वरूपी जलसंवर्धनाबाबत जनजागृती होणे गरजेचे असल्याचे आग्रही प्रतिपादन डॉ. माधवराव चितळे समारोपप्रसंगी केले. निसर्ग आपल्याला किती पाणी देतो आणि आपण त्याला परत किती करतो, हा देशाच्या दृष्टीने संशोधनाचा भाग आहे. सिंगापूरला मलेशियातून पाणीपुरवठा होतो. मात्र तेथे पाणी वाया जाऊ न देता त्यावर प्रक्रिया करून नवीन पाणी म्हणून वापरात आणले जाते, असे अनेक देश प्रक्रिया करून पाणी वापरात आणतात. मात्र आपल्या देशात हे होताना दिसत नाही. त्यामुळे आमची उंची जगाच्या नकाशावर फारच कमी आहे. हे दहावे संमेलन आहे. आपले ध्येय गाठण्यासाठीचा रस्ता खूप लांबचा आहे. त्यासाठी एकत्रित प्रयत्न होणे गरजेचे असून तसे झाले तरच निर्मळ, समृद्ध, बलशाली भारताचे चित्र उदयास येईल. भारतीय जलसंस्कृती मंडळ हे चित्र हस्तगस्त करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. मात्र त्यांना मदत करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. देशात सर्वच ठिकाणी नागरिकीकरण वाढते आहे, हे नाकारता येणार नाही. मात्र तेवढय़ा सुविधा आम्ही नागरिकांना देऊ शकतो का, याचा विचार करण्याची गरज आहे. चिपळूण शहराचा विचार केला तर घनकचरा, मलप्रवाह याचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे अशा शहरातूनच त्यावर उपाययोजना झाल्या नाही तर आमच्या देशाची जागतिक उंची कशी वाढेल, असा प्रश्नही चितळे यांनी उपस्थित केला. संमेलनात जलनियोजनासाठी प्रयत्न करणाऱ्या सहय़ाद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष शेखर निकम, नागपूरचे विनोद हंडे, धुळेचे संजय झेंडे, विजय जोगळेकर, डॉ. अनिल जोशी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. भारतीय जलसंस्कृती मंडळाच्या स्थापनेपासून या संस्थेचे अध्यक्षपद प्रसिद्ध साहित्यिक, न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी भूषविले. सध्या जलसाक्षरतेचे पुरस्कर्ते डॉ. दत्ता देशकर हे अध्यक्ष आहेत. पाणीप्रश्नावरील विविध पैलूंचे समाजाला आकलन व्हावे, नद्यांचे बारमाहीकरण, पाण्यासंबंधातील विविध कायद्यातील सुसूत्रता, ज्येष्ठ नागरिक व जलसाक्षरता, पाणी आणि पर्यावरण आदि विशानुरूप मार्गदर्शन आणि पाणीप्रश्नाला वाहिलेले महाराष्ट्रातील एकमेव मासिक जलसंवाद असे या मंडळाचे भरगच्च काम आहे. आपल्या डिफ्युजर तंत्रप्रणालीने संपूर्ण महाराष्ट्रभर परिचित असणारे चिपळूणचे जल तज्ञ विजय जोगळेकर यांच्या सहकार्याने या मंडळाची चिपळूणात शाखा स्थापन करून अध्यक्ष प्रकाश उर्फ बापू काणे आणि लोटिस्माचे कार्याध्यक्ष प्रकाश देशपांडे यांनी असंख्य कार्यकर्त्यांच्या पाठबळावर हे संमेलन यशस्वी केले. आगामी काळात जलजागृती संदर्भात ठोस कार्यक्रम राबविण्याचेही त्यांनी जाहीर केले, जलजागृतीच्या या प्रयत्नारूपी कार्यास आगामी काळात चिपळूनसह कोकणात मोठे यश मिळो, ही ईश्वरीय प्रार्थना !

*****



# जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी
व्यासपीठ उपलब्ध करून देणारे मासिक



संपादक
डॉ. दत्ता देशकर
श्री. मुकुंद धाराशिवकर


## आम्ही वर्गणीदार होणार

मला / आम्हाला खालील चौकटीत (✓) अशी खूण केलेल्या प्रकारात आपला सभासद व्हायचे आहे

| | | |
|---|---|---|
| **वार्षिक** | रू. ३००/- | ☐ |
| **पंचवार्षिक** | रू.१२५०/- | ☐ |
| **आजीवन / दशवार्शिक** | रू.२५००/- | ☐ |

ही वर्गणी विशेपांक व पोस्टेज सह आहे.

(ग्रामीण भागातील वाचकांसाठी वर्गणीत रू.५०/- सूट देण्यात येईल)

माझा / आमचा पत्ता : ______________________

______________________

______________________

______________________

गाव ______________ पिनकोड क्र ______________

फोन ______________ मो ______________

वर्गणीचा डिमांड ड्राफ्ट/ चेक /मनिऑर्डर **जलसंवाद मासिक ए - २०१ मीराबेल अपार्टमेंट्स, पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर, पुणे - ४११ ०४५** या पत्त्यावर पाठवावा

## जलसंवाद मासिकाने प्रकाशित केलेले पाणी विषयक विशेषांक

१. पाणी आणि महिला
२. पाणी आणि संस्कृती
३. नदीजोड प्रकल्प
४. पाण्याचे प्रदूषण
५. पाण्याचे दर
६. पाण्याची गुणवत्ता
७. पाणी वितरण संस्था
८. पाण्याचे खाजगीकरण
९. पाणी आणि अन्नसुरक्षा
१०. भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या
११. पाणी आणि विद्युत
१२. स्टॉकहोम पुरस्काराचे मानकरी
१३. तिसरे जल साहित्य संमेलन विशेषांक
१४. पाचवे जलसाहित्य संमेलन - महाकाय पाणीप्रश्न
१५. ६ वे जलसाहित्य संमेलन, चंद्रपूर
१६. ७ वे जलसाहित्य संमेलन, नांदेड
१७. भूजल विशेषांक
१८. पाणी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या
१९. प्रश्न पिण्याच्या पाण्याचा
२०. कडधान्य व गळीत धान्याचे सिंचन व्यवस्थापन
२१. आठवी सिंचन परिषद, वर्धा विशेषांक
२२. जलपुनर्भरण विशेषांक
२३. पारंपारिक जलव्यवस्थापन विशेषांक
२४. प्रदीप चिटगोपेकर स्मृती विशेषांक
२५. जलकार्यकर्ता परिचय विशेषांक




मान्यवर चितळेसाहेबांचे समारोपाचे भाषण




पाहुणे व सर्व कार्यकर्ते




यंदाचे जलगौरव पुरस्काराचे मानकरी–श्री. शेखर निकम पुरस्कार स्विकारतांना

**जलसंवाद REGISTERED PERIODICAL**
Postal License No. PCW/108/2015-17(Posting at Ganeshkhind SO on 10th of every month)
RNI No. MAHMAR/2012/41686.DECL No. SDM/PUNE/SR/416/2012 ISBN No. 978-81-924949-0-6




श्री. चिटगोपेकर स्मृती पुरस्कार स्विकारतांना श्री. संजय झेंडे




श्री. चिटगोपेकर स्मृती पुरस्कार स्विकारतांना श्री. विनोद हांडे

प्रकाशक व मुद्रक: डॉ. दत्ता देशकर
फोन: 09325203109
dgdwater@gmail.com
जलसंवाद प्रकाशन
अे-201, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंट्स, पॅनकार्ड क्लबजवळ,
बाणेर हिल्स, बाणेर, पुणे 411 045